ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : नागपूर राज्य संस्थापक सेना साहेब सुभा पहिले रघूजी राजे भोंसले यांचें चरित्र

लेखक : गोपाळ दाजीबा दळवी

प्रकाशक : गोपाळ दाजीबा दळवी, नागपूर

प्रकाशन वर्ष : १९३१

मूळ ग्रंथ प्रत : महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर – २०१९

नागपूर राज्य संस्थापक

पहिले

रघूजी राजे भोंसले

यांचें चरित्र.

किंमत ॥।. आणे.

नागपूर राज्य संस्थापक
सेना साहेब सुभा

पहिले रघूजी राजे भोंसले
यांचें

चरित्र.

—×—

भाग १ ला.

लेखक व प्रकाशक—**गोपाळ दाजीबा दळवी**, महाल, नागपूर.

(संपादक माजी मराठामित्र–महाराणा राजसिंह, सती पद्मिनी, मराठा कुळांचा इतिहास भाग १ ते ३ मराठा साम्राज्याचें एक चित्र, पातिव्रत्य प्रभाव, शृंगार भुवन, मराठ्यांच्या हक्कांचें संरक्षण इत्यादि ग्रंथाचे कर्ते.)

आवृती १ ली.

सन १९३१

मुद्रक—**बापुजी कृष्णाजी घोरमारे**, प्रिंटर कालिका प्रिंटिंग प्रेस, जुम्मा तलाव नागपूर.

सप्रेम नज़र

मराठा साम्राज्य संस्थापक छत्रपति **श्री शिवाजी महाराजांस** मोंगल साम्राज्य धुळीस मिळवून मराठा साम्राज्य स्थापन करावयास ज्या रणधुरंधर **सेनापती-प्रतापराव गुजरानें** मदत केली त्यांचे वंशज **श्रीमंत समाजभूषण सरदार व्यंकटराव कृष्णराव गुजर** हे करीत असलेली मराठा समाजाच्या शिक्षण विषयक उन्नतीची निरपेक्ष सेवा व त्यांच्या हाडीं मासीं खिळलेली सार्वजनिक सेवेची अवर्णनीय लालसा इत्यादि गुणांस लुब्ध होऊन हा नागपूरकर भोंसले घराण्याच्या आद्य संस्थापकाचा चरित्रपर ग्रंथ, आदर पूर्वक अर्पण करीत आहे.

ग्रंथकर्ता.

प्रस्ताविक दोन शब्द.

श्रीमंत सेनासाहेब सुभा पहिले रघूजीराजे भोंसले यांचें हें अल्प चरित्र इतिहासप्रेमी वाङ्मयभक्तांपुढें ठेवण्यास आह्मांस अत्यंत संतोष होत आहे. महाराष्ट्राच्या इतिहासांत ज्या ज्या कर्तबगार पुरुषांनीं आपल्या आंगच्या मर्दुमकीनें उच्चस्थान संपादन केलें त्यांतीलच थोर दर्जाचे पुरुष नागपूरच्या राज्याचे संपादक पहिले रघूजी राजे भोंसले हे होते. यांनीं सबंध मध्यप्रांत, वऱ्हाडचा कांहीं भाग व बंगालच्या कटक ओरिसा प्रांतावर स्वामित्व गाजविलें. चौथाई वसूल करण्यासाठीं त्यांनीं बंगालप्रांतावर लागोपाठ अनेक स्वाऱ्या केल्या व चिकाटीनें विजय संपादन केला. त्यांनीं आपल्या सतत प्रयत्नानें क्षणभरही विश्रांति न घेतां मराठा साम्राज्य वृद्धिंगत करण्यांत श्रम घेतले. रघूजीराजे भोंसले हे मराठा साम्राज्याचे मध्यप्रदेशातील एक आधार स्तंभ होते. त्यावेळच्या इंग्रजांसही त्यांचा वचक वाटत असे. पहिले शाहू छत्रपति यांचाही त्यांजवर त्यांच्या कर्तृत्वशक्तीमुळें लोभ होता व पेशव्यांस त्यांचा मनस्वी वचक वाटत होता. अशा ह्या कर्तृत्वशाली पुरुषाचें चरित्र अनेक उपलब्ध साधनांच्या आधारें लिहिलें आहे. कांहीं वर्षांपूर्वीं वर्धेच्या सुबोध मालेंत तें त्रोटक रुपानें क्रमशः प्रसिद्ध करण्यांत आलें होतें व मालेचे संपादक यांनीं पुस्तक रुपानेंही तें प्रसिद्ध केलें होतें; त्यांत विशेष फेरफार करून, तसेंच बराचसा उपयुक्त भाग अधिक सामील करून आज हें चरित्र आम्हीं प्रसिद्ध केलें आहे. नागपूरच्या इतिहासाची साधन सामुग्री फारच त्रुटित आहे. तेव्हां जेवढी सामुग्री उपलब्ध झाली तिचा यांत उपयोग केलेला आहे. ज्या ज्या ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथाचा हें चरित्र लिहिण्याच्या

कामीं आम्हांस उपयोग झाला त्यांचे आम्हीं आभारी आहों. ह्याच ग्रंथाच्या शेवटीं नागपूरच्या भोंसलेशाहीतील प्रसिद्ध घराण्यांची संगतवार माहिती देण्याचा आमचा विचार होता व त्याप्रमाणें आम्हीं ब्राह्मण, मराठे, प्रभु, मुसलमान वगैरे अनेक घराण्यांशीं पत्रव्यवहारही केला होता; परंतु आह्मांस त्या प्रकरणीं निराश व्हावें लागलें. तरीही आम्हीं तो प्रयत्न सोडून दिला नाहीं. मिळेल तेवढी माहिती गोळा करण्याचें आमचें कार्य सुरू आहे. ती माहिती ह्या चरित्रातच दिल्यानें ग्रंथ बराच वाढला असता ह्मणून आम्हीं ती माहिती दुसऱ्या भागीं देण्याचें निश्चित् केलें आहे. त्या भागीं, **गुजर, अहीरराव, चिटनवीस, जरीपटकेवाले भोंसले, झेंडेवाले नाईक, नाईक मापारी, नाईक, शिर्के, मोहिते, खळतकर, घाटगे, पटवर्धन, मुजुमदार, घोरपडे, काळे, बक्षी, गोस्वामी, मुनशी, जामदार, लामगोडा, बोहटे, बिनीवाले, पंडीत, काळीकर, भूत, पाणतावणे, तिखे, बुटी, व्यास, जाचक, शिंदे, निंबाळकर नाईक, काटे** वगैरे अनेक इतिहासप्रसिद्ध घराण्यांची त्रोटक माहिती देणार आहों. तीन एक महिन्यांनीं हा दुसरा भागही तयार होईल. त्यापूर्वी वरील घराण्यांतील विद्यमान वंशजांजवळ कांहीं विशेष माहिती असल्यास ती त्यांनीं आम्हांस द्यावी व आपले अगर पूर्वजांचे फोटो प्रसिद्धीसाठीं पाठवावे. त्यांस अत्यानंदानें स्थळ देण्यांत येईल.

सदर चरित्रासंबंधीं ज्या कोणास विशेष सूचना द्यावयाच्या असतील त्या त्यांनीं आम्हांकडे पाठविल्यास आम्हीं त्यांचे आभारी होऊं.

नागपूर
ता. १–८–१९३१

आपला नम्र सेवक
गोपाळ दाजीबा दळवी.

नागपूर-राज्य संस्थापक
सेनासाहेब सुभा.



पहिले रघूजी राजे भोंसले.

नागपूरचे

पहिले रघोजी राजे भोंसले यांचें चरित्र

भोंसले घराण्याची कुलपरंपरा.

महाराष्ट्राच्या इतिहासांत " भोंसले " घराण्यानें अग्रेसरत्व मिळविलेलें आहे. कारण महाराष्ट्राचें नष्ट झालेलें वैभव प्राप्त करून देण्यासाठीं ह्या कुलांतील पुरुषांनीं अनेक विपत्ती भोगिल्या आहेत. ह्मणूनच ह्या घराण्यास महत्व प्राप्त होऊन हें घराणें आदरास पात्र झालें आहे. ह्या घराण्याची प्राचीन कुल परंपरा याखालीं देत आहों.

भोंसले घराण्याचें मूळ नांव " शशाद " असें होतें. ह्या शशाद वंशासंबंधानें श्रीमद्भागवतांत " शशाद इति विश्रुतः " असें ह्मटलें आहे. हा वंश " कोसल " देशांत अयोध्या नगरीमध्यें राज्य करीत होता. प्रसिद्ध श्रीराम पुत्र " लव " याचाच हा विस्तार होय. त्यावेळीं ह्या सूर्यवंशास " सुश्रुंग " कुळ ह्मणून ओळखीत असत. अयोध्येमधून हा वंश दक्षिण देशीं " अशीरी " नांवाच्या किल्ल्यांत येऊन त्यानें तेथें राज्य स्थापन केलें. त्यावेळीं ह्या कुळाच्या राज्याची सीमा नर्मदेच्या दक्षिण तीरापासून विंध्य पर्वतापर्यंत होती. त्या ठिकाणीं ह्या वंशानें १६८० वर्षें राज्य केलें. याचवेळीं शालिवाहन राजाचा पराक्रम विकास पावूं लागला होता, त्यानें ह्या वंशाचें राज्य

घेतलें. त्यामुळें राजपत्नीनें आपला पांच वर्षांचा बालक घेऊन नर्मदेच्या उत्तरेकडील मेवाड देशांत विंध्य पर्वतावर गमन केलें व तेथें कांहीं काल अज्ञातवासांत काढला. त्या ठिकाणीं त्या पुत्राला एक शिवलिंग सांपडलें. त्याची तो एकनिष्ठपणें सेवा करूं लागला. कालांतरानें त्यास तेथेंच भूमिगत द्रव्य प्राप्त झालें. त्या द्रव्यानें पर्वतावर श्री भवानी देवीजवळ त्यानें एक किल्ला बांधला. त्याचें नांव चित्रकूट असें ठेविलें. तेथपासून हें घराणें श्री एकलिंग व श्री भवानी देवी यांचें कट्टे उपासक बनलें आहे. सदर ठिकाणीं ह्या वंशानें ५०० वर्षें राज्य केलें. मध्यंतरी या वंशाचीं बरींच नांवें बदललेलीं आहेत. " सेन (बहादूर) दीत अथवा आदित्य (सूर्य) गेहलोट, अहार्या, रावळ," अशींहीं नांवें होतीं.

ह्या वेळ यवन बादशहांच्या ऊर्जितावस्थेचा होता. सकनुद्दिन नांवाच्या सुल्तानानें पिठोरे क्षत्रिय कुलापासून इंद्रप्रस्थाचें राज्य स्वाधीन करून घेतलें व त्या प्राचीन शहराला "दिल्ली" हें नांव दिलें. दिल्लीचें राज्य प्राप्त होतांच यवनांनीं सर्व रजपूत राजांस नामोहरम करण्याचा सपाटा आरंभिला व त्यांत त्यांस यशही येत गेलें. परंतु 'सुश्रुंग' कुल मात्र कधींही यवनांपुढें खालीं मान घालून बसलें नाहीं. ह्या काळांतील अनेक नररत्नांनीं यवनांशीं हमेशा मोठ्या बहादुरीनें टकरा दिल्या आहेत. बाप्पारावळ, राणा संग, राणा हम्मीर, राणा प्रतापसिंग वगैरे नररत्नें शिसोदे कुलास भूषणभूत झालेलीं होतीं व त्यांनीं शिसोदे वंशाचें प्राचीन यशोगौरव संरक्षण करून स्वातंत्र्याच्या स्वानंदांत जर यवन बादशाहीमध्यें कोणतें घराणें आनंद मानीत असलें तर तें हेंच घराणें होय. ह्मणूनच ह्या घराण्यास

राजस्थानमध्यें थोर व श्रेष्ठ पद प्राप्त झालें आहे.

इ. स. १२७५ मध्यें राणा लक्ष्मणसिंग मेवाडच्या गादीवर बसला. राण्याचा चुलता भीमसिंग यानें सिंहलद्वीपच्या राजाची मुलगी पद्मिनी इजबरोबर लग्न केलें होतें. ही पद्मिनी सर्वांगसुंदर असून तिजसारखी सौंदर्यसंपन्न स्त्री त्याकालीं तरी नव्हती अशी ख्याति होती. ह्या पद्मिनीचें सौंदर्यवर्णन ऐकून दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन यानें चितोडवर पद्मिनीहरणार्थ स्वारी केली; परंतु त्यावेळीं रजपूत आपल्या स्वाभिमानास पारखे झाले नव्हते. त्यांनीं आपलें पावित्र्य रक्षण करण्यासाठीं अल्लाउद्दीनाबरोबर १२ वर्षें लढाई दिली. शेवटीं केसरिया करून १४०० शिसोदे क्षत्रिय वीर व जोहार करून त्यांच्या स्त्रिया स्वर्गी गेल्या. (इ. स. १३०३) यावेळीं राण्याच्या अर्सिहजी व सज्जनसिंह ह्या दोन पुत्रांचा बचाव झाला होता. त्यांनीं अरवली पर्वतांतील भिल्लांच्या आश्रयानें आपलें गतवैभव कांहीं कालानें संपादन केलें. उदेपूरची स्थापना यावेळींच झाली. अर्सिहजी महाराण्याच्या वंशजांकडेच हा कालपर्यंत उदेपुरचें राजसिंहासन आहे व त्यांचाच वंश तेथें चालत आहे. लक्ष्मण-सिंग राण्याचा दुसरा पुत्र सज्जनसिंह महाराणा हा सोंधवाडा येथें आला व तेथें त्यानें राज्य केलें. ह्या सज्जनसिंह राण्याचा पुत्र दिलिपसिंह महाराणा, त्याचा पुत्र शिवसिंहजी महाराणा, व त्याचा पुत्र भोसाजी महाराणा. ह्या चार राजांनीं सोंधवाड्याचें राज्य केलें. भोंसाजी महाराण्याचा भाऊ सोंधवाडा येथेंच राहिला. तो सोंधवाडा येथील घराण्याचा संस्थापक होय. भोंसाजी महाराण्यास दोन पुत्र होते. पैकीं एक नेपाळ येथें गेला व तेथें त्यानें शिसोदे वंशाचें

राज्य स्थापन केलें. दुसरा मुलगा देवराजजी हा दक्षिणेंत आला. त्यानें येथें येतांच आपलें बापाचें " भोंस " हेंच उपनांव कायम केलें ह्मणून त्याच्या वंशजांस भोंसले हें उपनांव पडलें. भोंसले हें उपनांव कसकसें पडलें याबद्दल अनेक इतिहासकारांनीं निरनिराळ्या व्याख्या दिल्या आहेत. " चितोड शहराजवळ भोशी ह्या नांवाचा किल्ला असून त्याजवळ भोंसावत गांव आहे. सदर गांवीं आल्यापासून त्यांस + भोंसावत भोंसले असें म्हणूं लागले. पूर्वीचें शिसोदे हें नांव होतें. " असा उल्लेख आढळतो. त्याखेरीज " या कुळांतील वीर लढाईंत घुसून लढत ह्मणून * 'घोसळ' हें नांव पडून त्याचें भोंसले झालें " असेंहीं ह्मटलें आहे. कित्येक " होयसाळ " ह्या घराण्याचा भोंसल्यांच्या नांवाशीं संबंध लावतात, पण हा त्यांचा वेडेपणा आहे. होयसाळ ही यादव घराण्याची शाखा आहे हें ते विसरतात.

भोंसले घराण्याचा दक्षिणेंतील वृत्तांत.

देवराजजी महाराज यांनी दक्षिणप्रांतीं येऊन गोदा व भीमा या दोन नद्यांमधील प्रदेशांतील लोकांकडून राजकर घेण्याचा उपक्रम सुरू केला व देशमुखी आदिकरून वृत्ति पतकरून उपजीविका करूं लागला. त्यावेळीं सिंगणापूर, खानवट, हिंगणी, बेरडी, देउळगांव, वेरूळ, जिंती, वावी व मुंगी हीं त्यांच्या वृत्तीपैकीं मुख्य ठिकाणें होतीं. ज्या प्रमाणें चित्रकुटावर शिवलिंग व भवानी हीं ह्या शिसोदे कुळाचीं कुलदैवतें होतीं, त्याचप्रमाणें दक्षिणेंत सिंगणापूरचा

+ श्री. महाराज भोंसले यांची बखर पृ. १ (सातारच्या छत्रपतींच्या दप्तरांपैकीं अस्सल बखर) व भिडे यांचा अष्ट प्रधानांचा इतिहास.

* रा. डोंगरे कृत भोसले कुळाची वंशावळ.

महादेव व तुळजापूरची महिषासुरमर्दिनी देवी हीं त्यांचीं कुलदैवतें होतीं.

देवराजजी महाराज यांस दोन पुत्र होते. पैकीं एका पुत्राचें नांव इतिहासज्ञांस अद्यापहि अपरिचित आहे. हा पुत्र म्हणजे नागपूर, शंभु महादेव, देऊळगांव, वावी, केरळ आणि मंजोर येथील वंशाचा संस्थापक असें इतिहासांतील वंशवृक्षांत म्हटलेलें आहे; परंतु ती चुकी आहे. ह्या अज्ञात पुरुषास सरासरी आठ पिढ्या मागें ढकलण्यांत आलें असावें. कारण त्यावेळीं नागपूरच्या घराण्याचें अस्तित्वही नव्हतें. एवढेंच नव्हे; परंतु नागपूरचा संबंधही नव्हता. असें असतां श्री शिवाजी महाराजांच्या दहा पिढ्यांमागें नागपूरचा संस्थापक म्हणून एक अज्ञात व्यक्ति ठोकण्यांत काय फायदा आहे? ही चुकी अवश्य दुरुस्त झाली पाहिजे. देवराजजी महाराज, यांस इंद्रसेनजी महाराज, त्यांस शुभकृष्णजी महाराज, त्यांस रूपसिंहजी महाराज, त्यांस भूमींद्रजी महाराज, त्यांस धापजी महाराज, त्यांस बरहटजी महाराज, त्यांस खेलोजी महाराज, त्यांस कर्णसिंहजी महाराज, त्यांस संभाजी महाराज व त्यांस अज्ञात पुरुष एक पुत्र व दुसरा बाबजी महाराज अशी दुरुस्ती पाहिजे. ह्या अज्ञात पुरुषापासून नागपूरच्या घराण्याची शाखा सुरू झाली आहे. संभाजी महाराजांचा मुलगा बाबजी यांपासून सातारच्या छत्रपतींचें घराणें पुढें आलेलें आहे व संभाजी महाराजांच्या अज्ञात पुत्रापासून नागपूरची शाखा सुरू झालेली आहे. बाबजी महाराजांचे समकालीन नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज परसोजी भोंसले हे होत. ज्याप्रमाणें सातारकर भोंसल्यांची वंशावळ बाबजी

भोंसल्यांपासून बरोबर मिळते त्याचप्रमाणें नागपूरकर भोंसले घराण्याची वंशावळ परसोजीपासून बरोबर मिळते. यावरून कोणासही शंका घेण्याचें कारण नाहीं. हीं दोन्हीं घराणीं एकाच वृक्षाच्या दोन फांद्यांप्रमाणें आहेत. संभाजी महाराज यांचे पुत्र परसोजी महाराज व बाबजी महाराज हे होत. परसोजी महाराज यांपासून पुढें नागपूर वऱ्हाड येथें स्वतंत्र राज्य उभारिलें गेलें व बाबजी महाराज यांपासून पुढें साताऱ्याची गादी स्थापन झाली.

भोंसले घराण्याच्या ज्या अनेक शाखा आहेत त्यांचा इतिहासाशीं अत्यंत निकटचा संबंध आहे. हें कूळ महाराष्ट्रामध्यें मोठ्या योग्यतेस पाहोंचलें होतें. श्री शिवछत्रपतींनीं या घराण्यास मान्यता आणिली आणि या घराण्याचा कीर्तिदुंदुभि जगभर निनादित केला. हल्लीं या घराण्याच्या ज्या शाखा अस्तित्वांत आहेत; त्यापैकीं सातारचे छत्रपति, कोल्हापूरचे छत्रपति, तंजावरचें घराणें, मुधोळ, गजेंद्रगड, सोंडूर, कापसी, दतवाड येथील घोरपडे, वाडीकर सावंत सर देसाई, नागपूरचे भोंसले, जिंतीकर भोंसले, निरगुडी, शंभुमहादेव, मुंगीपैठण, भांबोरी, वावी, खानवट, भिलवडी, दुधवाडी, शिडगांव या ठिकाणीं आहेत. या भोंसले घराण्याच्या शाखांपैकीं, सातारचें घराणें दैवदुर्विलासाच्या फेऱ्यांत सांपडून त्याचें केवळ नांवच उरलें आहे. तंजावरचें घराणें औरस संतति नसल्यामुळें विल्हेवाटीस लागलें आहे. घोरपड्यांचीं घराणीं अद्याप चांगल्या स्थितींत आहेत. नागपूरच्या घराण्याचीही स्थिति साताऱ्च्या अस्सल राजघराण्याप्रमाणेंच झालेली आहे. वाडीकर सावंत सरदेसाई हेंही घराणें, भोंसल्यांचेंच आहे; परंतु हें

घराणें भोंसल्यांच्या पूर्वीच कोंकणांत आलें आहे. त्यासंबंधी माहिती गुलदस्तांत आहे. ह्या घराण्याचें पूर्व वैभव कायम आहे. एऱ्ही इतर घराणीं आपआपला लहान मोठा सरंजाम सांभाळून आहेत. फक्त ह्या घराण्याचें अस्सल सौभाग्य कांहीं अंशीं जर कोठें पहावयाचें असेल तर तें कोल्हापूर येथेंच पहावयास मिळेल. एऱ्हीं आशा नाहीं.

वर आम्हीं नागपूरच्या भोंसल्यांचा मूळ पुरुष परसोजी महाराज यांचें व श्री शिवाजी महाराजांचे पणजे बाबाजी यांचें बंधुत्वाचें नातें दाखविलें आहे तें ग्राह्य असेंच आहे. बाबाजी भोंसले हे आपणांस देऊळगांवकर, वेरूळकर असें ह्मणवीत असत. त्याचप्रमाणें परसोजी महाराज हे आपणांस हिंगणीकर भोंसले म्हणवीत असत. आणि नागपूरकर भोंसल्यांच्या सर्व वंशजांस हिंगणीकर असें अनेक बखरींत म्हटलेलें आहे. त्यावरून हीं दोन्हीं घराणीं एकच आहेत असें ह्मणावयास दिक्कत वाटत नाहीं. या खेरीज एका जुन्या बखरीमध्यें असें आढळलें आहे कीं, 'शिवाजीचा पणजा बाबाजी भोंसले यांस एक बंधु * होता. त्याचें नांव परसोजी असून तो 'दक्षिणेंत गुप्त.' असें म्हटलेलें आहे. हाच परसोजी नागपूरच्या भोंसल्यांचा पूर्वज होय. ह्या म्हणण्यास दुसऱ्या आधारानें पुष्टीही मिळते. ती पुष्टि हीच कीं, आपणांमध्यें आजाचें नांव नातवाला वगैरे ठेवण्याची पूर्वापार रूढी आहे. त्या रूढीप्रमाणें सातारकर भोंसले घराण्याच्या शाखांपैकीं विठूजी राजे यांच्या मुलाचें नांव परसोजी असें ठेवलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. त्या खेरीज जिंतीकर भोंसल्याचा वंश

* भारत वर्ष (विविधज्ञान विस्तारांतील रा. आचार्य कालगांवकर यांचा लेख.)

ह्मणजे शिवछत्रपतीचे वडील बन्धु संभाजी यांच्या नातवाचें नांवही परसोजी असें ठेवण्यांत आलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. आपल्या मुलांस, नातवांस पूर्वजांचें नांव देण्याची जी ही आपल्यामध्यें पद्धत आहे तीवरून आमच्या वरील ह्मणण्यास पुष्टि मिळते. या खेरीजही ह्या घराण्याचा निकटसंबंध व वरील पुरुषांचा काल यांची गोळाबेरीज करतां परसोजी हा बाबाजी भोंसल्यांचा समकालीन, परसोजीचा पुत्र बिंबाजी हा मालोजीचा समकालीन, बिंबाजीचा पुत्र मुधोजी हा शहाजीचा समकालीन व बिंबाजीचे तीन पुत्र परसोजी, बापूजी व साबाजी हे श्री शिवाजी महाराजांचे समकालीन होते. हे तीन पुरुष श्री शिवछत्रपतींच्या सैन्यांत सिलेदारी वगैरे करीत असल्याबद्दल बखरींत उल्लेख आहेत. यावरून बाबाजी भोंसले यांचा जो काल इ. स. १५३३ तोच परसोजीचा काल होय. त्यांत चारपांच वर्षे मागें अगर पुढें ढकललीं तरी हरकत नाहीं.

नागपूरकर भोंसले घराण्याचा मूळपुरुष परसोजी, त्याचा पुत्र बिंबाजी, त्यास पुत्र दोन, मुधोजी व रूपाजी व मुधोजींचे पुत्र ३ परसोजी, बापूजी व साबाजी. यांपैकीं बिंबाजीचे पुत्र रूपाजी व मुधोजीचे पुत्र परसोजी हे श्री शिवछत्रपतींच्या पागांचे सरदार होते. व हें घराणें वडिलोपार्जित सेवा करून असल्याबद्दल त्यांत उल्लेखही आहेत. या खेरीज हें घराणें सातारकर भोंसल्यांचें किती निकटचें संबंधी होतें तें खालील मजकूर वाचून ध्यानांत येईल. मुधोजीचे पुत्र साबाजी यांजकडून ते सातारकर भोंसल्यांचे निकटचे संबंधी म्हणून श्री शिवाजी महाराजांचा अंत्यविधि करविला आहे. तो मजकूर येणेंप्रमाणें “ शिवाजीची उत्तरक्रिया साबाजी भोंसले नांवाच्या

इसमाकडून राजारामास ठेवून करविण्यांत आली........' साबाजी भोंसले शिंगणापूरकर यांजकडून क्रिया झाली असें चिटणवीस ह्मणतात. सभासद ह्मणतो राजारामानें केली. "राजेरजवाड्यांचा प्रघात ध्यानांत घेतला म्हणजे वरील दोन्ही गोष्टींचा मेळ बसतो. गादीस मालक नेमल्याशिवाय मृत राजाचें शव बाहेर काढावयाचें नाहीं; आणि उत्तरक्रिया, श्राद्धें वगैरे मृतांचे विधी गादीवरील राजानें करूं नयेत, असा प्रघात असल्यामुळें ते विधी करण्याकरितां आपल्या कुळापैकीं एखाद्या कुटुंबाची नेमणूक कायमची करीत असतात. ती क्रिया करणारांस मंत्री असें ह्मणतात. राजघराण्यांतील ही चाल शिवाजीचे वेळीं अस्तित्वांत असून त्याकरितां नागपूरकर भोंसल्यांपैकीं एका कुटुंबाची नेमणूक झाली + असून साबाजी भोंसले त्यांपैकीं असावा असें वाटतें." ह्या विवेचनावरून ह्या घराण्याचा छत्रपतींच्या घराण्याशीं निकट संबंध होता हें स्पष्ट होतें.

हे साबाजी भोंसले, बापूजी भोंसले व परसोजी भोंसले यानीं श्री शिवाजी महाराजांबरोबर राहून स्वराज्य सेवेची अमोल कामगिरी केलेली आहे. ती कामगिरी लक्षांत घेऊन श्री शिवाजी महाराजांनीं साबाजी भोंसले यांस त्यांनीं विनंति केल्यावरून दोन गांव इनाम करून दिले आहेत. ती सनद येणेंप्रमाणें :—

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके पंधराशें शहाण्णव आनंद नाम संवत्सरे आश्विन बहुलदशमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा

\+ सर देसाई कृत मराठी रियासत पृ. ५४१.

१ कृष्णाजी अनंत विरचित शिवछत्रपतींचें चरित्र पृ. ८०, वि. ज्ञा. वि. पु. ९ पृ. १३४.

शिवछत्रपति स्वामी यांनीं राजेश्री साबाजी बिन मुधोजी भोंसले यांस दिलें. इनामपत्र ऐसीजे. तुम्ही स्वामींचे पुरातन सेवक एकनिष्टपणें सेवा करून स्वामींस संतुष्ट केलें. तुमचें चालविणें स्वामींस अवश्यमेव, तुम्ही विशालगडाचे मुक्कामीं दर्शनास आले ते वेळेस प्रसंगीं तुम्हीं विनंति केली कीं, आपणांस इनाम लेकरान लेकरी चालेल असा दिला पाहिजे, म्हणोन, त्याजवरून स्वामी तुम्हांवर कृपाळु होऊन तुम्हांस नूतन इनाम देऊं. कुलबाब कुलकाम खेरीज हक्कदार व इनामदार करून पूर्व मर्यादेप्रमाणें गांव तपशील.

१ मौजे राक्षसवाडी तर्फ रासिन देह १

२ मौजे पिंपरी कोल्हेर तर्फ कडेवली देह १

एकूण देहे २ रास अजरामर करून दिले असे, तरी सदरहू गांव तुम्हीं आपले मुलांलेकरी घेऊन इनाम तुम्हीं वडिलांचें वंशपरंपरेनें अनुभवून स्वामींचें सेवन मनोभावें करून सुखरूप राहणें जाणीजे. लेखनालंकार.

ह्याप्रमाणें सनद देण्यांत आली व हीच ह्या घराण्याची छत्रपतीकडून झालेली पहिली संभावना होय. ही सनद करून दिल्यानंतर लवकरच श्री शिवाजी महाराजांचा काळ झाला. व त्यांनीं आपल्यामागें गादीवर राजाराम महाराजांस बसविण्याबद्दल आज्ञा केली होती. कारण संभाजी महाराज हे जरी ज्येष्ठ पुत्र होते तरी त्यांचें वर्तन चांगल्या प्रकारचें नसल्यामुळें महाराजांनीं त्यांस पन्हाळ्यावर अटकेंत ठेविलें होतें. केवळ मराठ्यांचें राज्य बुडूं नये. एवढ्या मेहनतीनें उभारलेला स्वराज्याचा गाढा अबाधित चालून त्रस्त झालेल्या बांधवांस स्वातंत्र्य सुखाचा पूर्ण लाभ मिळावा

अशी महाराजांची प्रबल इच्छा होती आणि त्या इच्छेस अनुसरून त्यांनीं जेष्ठ पुत्राचा हक्क काढून टाकून कनिष्ट चिरंजिवांस गादीवर बसविण्याबद्दल आज्ञा केली होती; परंतु ती त्यांची इच्छा कांहीं काल तरी फलद्रुप झाली नाहीं. संभाजीनें जीं क्रौर्याचीं कामें करावयाचीं तीं केलींच. व महाराजांनीं जी स्वराज्याची मुहूर्तमेढ उभी केली होती तिला अवघ्या चारपांचच वर्षांत कीड लावण्याचा प्रसंग आणिला. आपल्या विरुद्ध कारभारी मंडळीचा कट सुरू असून आपणांस गादीवर बसविण्याच्या विरुद्ध जी जी मंडळी होती त्या सर्वांस म्हणजे सोमाजी नाईक बंकी, सुर्याजीपंत कावळा, बाळाजी आवजी चिटणवीस, सोयराबाई यांस जीवें मारिलें. शिर्के मंडळीचें तर सिरकाणच केलें. असा हा जो प्रलय चालविला त्यावेळीं परसोजी भोंसले यांनीं मात्र कोणचाही पक्ष धरिला नव्हता. त्यांस संभाजी महाराजांनीं बोलावून विचारिलें कीं "तुम्ही * प्रबुद्ध वडिलोपार्जित सेवक आहांत असें असतां तुमचे समक्ष असें व्हावें हें तुम्हांस योग्य नव्हे. असो तुम्हीं आतां येथें न राहतां कुच करून जावें." हे महाराजांचे उद्गार ऐकतांच परसोजी हे खानदेशांत गेले. या वेळीं बापूजी भोंसले व साबाजी भोंसले हे आपल्या वृत्तीवरच होते.

संभाजी महाराजांनीं जरी आपल्या वडिलांच्या इच्छेप्रमाणें न चालतां गादी मिळविली तरी शेवटीं त्यांस प्राणास मुकावें लागलें. कलुशा कबजी सारख्या दुष्ट माणसाच्या सल्ल्यानें मराठा साम्राज्याची जुळलेली घडी पार विसकटून गेली व मराठ्यांचें राज्य बुडविण्यास

---

* नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. १३.

तत्पर असलेल्या अलमगीर बादशहाकडून शेवटीं जिवास मुकावें लागलें. संभाजीच्या पश्चात् त्याचीं मुलें वगैरे बादशहाचीं बंदिवान झालीं. आणि राजाराम संभाजीच्या मुलाचा म्हणजे शाहूचा प्रतिनिधी म्हणून राज्यकारभार हांकूं लागला. संभाजीच्या दुर्वर्तनानें त्रासलेले मराठे पुनः एकत्र झाले. त्यांनीं आपली विस्काळित झालेली जूट पुनः केली आणि मोंगलांबरोबर टक्कर देऊं लागले. मराठ्यांमध्यें किती पाणी आहे व ते स्वातंत्र्याचा धडा कसा गिरवावा, हे कसे शिकले आहेत हें त्यांनीं थोड्याच कालावधीमध्यें अलमगीर बादशहाच्या निदर्शनास आणिलें. धनाजी जाधव, संताजी घोरपडे वगैरे सेना धुरंधरांनीं यवनांस तोंडांत बोट घालावयास लाविलें. सुप्रसिद्ध जिंजीमधून राजाराम पुन्हां दक्षिणेंत आला. व थोडक्याच कालांत त्याचें देहावसान झालें. त्याचा पुत्र शिवाजी हा गादी-वर बसला व राजारामाची पत्नी सुप्रसिद्ध ताराबाई कारभार पाहूं लागल्या. त्याचवेळीं शाहु महाराजांची मुक्तता झाली. त्यांस बादशहाकडून सर देशमुखीच्या सनदा मिळाल्या व फौजेसह आपल्या पित्याच्या गादीवर बसण्यास ते आले. इतक्यांत अलमगीर बादशाहाही निवर्तला. शाहू महाराज चौथाई व सर देशमुखीच्या सनदा घेऊन निघाले ते खानदेशांत आले. त्या वेळीं खानदेशांत परसोजी भोंसले होते. त्यांस हें वर्तमान समजतांच ते आपली १५००० फौज * घेऊन महाराजांस येऊन मिळतांच शाहू महाराजांस अत्यानंद झाला. व ते तेथून साताऱ्यास येण्यासाठीं निघून गंगातीरीं गोदा-वरीवर आले. इकडे ताराबाई व परशुराम प्रतिनिधि यांस हें

---

* थोरल्या शाहू महाराजांचें चरित्र पृ. १०

वर्तमान समजलें तरी त्यांनीं हा शाहू खरा नव्हे, तोतया आहे, असें कल्पून त्याला गादीचा हक्क द्यावयाचा नाहीं असें निश्चित् करून शाहू खरा कीं तोतया हें ठरविण्यासाठीं खंडेराव बल्लाळ चिटणवीस यांस पांचशें लोक बरोबर देऊन पाठविलें, त्यांनीं शाहू महाराजांची भेट घेतली, व खरी परिस्थिति पाहिली आणि हे शाहू महाराज खरे असल्याबद्दल ताराबाईस, जाधवरावांस व अष्ट प्रधानांस पत्रें पाठविलीं तरी ताराबाई व परशुरामपंत प्रतिनिधी हे आपला हट्ट सोडी-नात. शाहू महाराजांबरोबर लढण्यास फौज पाठवावी तर कोणीही अधिकारी जाईनात. शेवटीं पंतांनीं असा सल्ला काढिला कीं, " बापुजीबुवा हिंगणीकर भोंसले हे वडलांपासोन आहेत. त्यांजला पाठवावें ते खरे ह्मणतील तर राजा खरा " असें म्हणून त्यांस हजार लोक बरोबर देऊन पाठविलें. बापुजीबुवा हिंगणीकर भोंसले हे शाहू महाराजांकडे गेले. त्यांच्या भेटी झाल्या. ते आपल्या बंधूस परसोजी भोंसल्यांस भेटले व राजा खरा असल्याबद्दल त्यांची केसरकरांनीं व चिटणवीसांनीं खात्री करून दिली. शेवटीं ते उभयबंधू व शाहू महाराज एका ताटांत जेवले. एका ताटांत जेवतांच शाहू महाराज तोतये नव्हेत अशी सर्वांची खात्री झाली. नंतर धनाजी जाधवराव यांजकडून बाळाजी विश्वनाथ पहावयास आले त्यांची व राजांची भेट झाली. त्यावेळीं खंडेराव बल्लाळ चिटणवीस ह्मणाले " तुम्हीं अनमान कोणताही एक करूं नये. जाधवराव यांजला फौजेसुद्धां आणवावें व तुम्हीं आपले पथकासहित येऊन महाराजांस अनुकूल झाल्यास तुमचे जातीस पद मातबरीचें सेनापतीचे बरोबरीचें देण्यांत येईल. परशुरामपंत आजवर दौलत

आपण करित आले, तशीच करावी यास्तव हे खोटें म्हणतात याजकरितां तुह्मी यांचे म्हणण्यावर न जावें. हिंगणीकर + भोंसले उभयतां बंधु यांचे ताटांत जेवले तेंव्हां खोटें कसें म्हणाल? जाधव-राव सेनापति हेहि सोयरेच आहेत. आतां यश तुह्मीं घ्यावें."

हें वर जें आम्हीं विवेचन केलें आहे त्यावरून एका मोठ्या मुद्याचें स्पष्टीकरण होत आहे. त्याकाळीं हिंगणीकर भोंसले व सातारकर भोंसले हीं दोन्हीं घराणीं आपणांस एकाच शाखेचीं समजत होतीं हें यावरून सिद्ध होत आहे. हिंगणीकर भोंसल्यांनीं शाहू महाराजांबरोबर एका ताटांत जेवणें म्हणजे आपल्या बंधुत्वाचें नातें सिद्ध करणें होय. बापुजीबुवा व परसोजी भोंसले हे शाहू महाराजांसहित एका ताटांत जेवले यावरूनच शाहू महाराज हे तोतया न ठरतां खरे राजे ठरले. हें सिद्ध होत आहे. वर आम्हीं ह्या घराण्याच्या शाखांसंबंधानें जें विवेचन केलें आहे त्यास हाही एक पुरावा आहे. या पुराव्यावरून सातारकर व नागपूरकर भोंसले हे एकाच वंशवृक्षाच्या शाखा आहेत हें निर्विवाद सिद्ध झालें.

या खेरीजही ह्या दोन्ही घराण्याचा गोत्रसंबंध स्पष्ट दर्शवि-णारी एक प्रसिद्ध गोष्ट ऐतिहासिक वाङ्मयामध्यें प्रसिद्ध झालेली आहे. श्री शाहु महाराज निपुत्रिक होते. त्यांस संतति नव्हती तेंव्हां आपल्या पश्चात् मराठा साम्राज्याचें धुरीणत्व कोणास द्यावें याचा त्यांस विचार पडला होता, याचवेळीं श्री रघोजीराजे भोंसले यांचे चिरंजीव मुधोजी भोंसले हे सातार्‍यास शाहू महाराजांच्या भेटीस आले होते. त्यावेळीं मुधोजी भोंसले यांस दत्तक घेण्याचा शाहू

+ नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. २०

महाराजांचा विचार निश्चित झाला होता. त्यासंबंधीं खालील मजकूर लक्षांत घेण्यासारखा आहे. "बाबासाहेबांचे (रघोजी) चिरंजीव मुधोजी भोंसले देउरांत होते. तेथून साताऱ्यास राजश्रीकडे येणें जाणें गोविंदराव चिटणवीस यांजकडेस तसेंच राजे फत्तेसिंग भोंसले यांजपाशीं वहिवाट व राजश्रींचे (शाहू महाराज) धाकटे राणीचे चुलत बहिणीचे लेक त्याजला त्यांनीं लोभ विशेष करून होते. त्या प्रसंगीं गोविंदराव चिटणवीस यांचे विद्यमानें विचार ठरला व गांवांतहीं झालें कीं राजश्री दत्तक * साळीचे लेकास घेतात." ह्या प्रमाणें मुधोजी भोंसले हे दत्तक घेण्याचें ठरलें होतें; परंतु श्री. ताराबाई साहेबांनीं श्री. शाहु महाराजांस ह्या दत्तकासंबंधानें विचारतां ते म्हणाले:—'वंशांत कोणी नाहीं. आपले आप्ताचा + मूल चांगला आहे. म्हणोन हा विचार ठरविला आहे.' "महाराजांचें उत्तर ऐकून आई साहेबांस राग आला आणि बोलल्या, जो तुम्हांस भवानीचा वर आहे तो लटका कसा होईल? तुमचा प्रत्यक्ष वंश असतां हा दत्तक कशाला पाहिजे?" या प्रमाणें मजकूर आहे. श्री. ताराबाईंनीं आपला नातू रामराजा यास लपवून ठेविलें होतें. त्याचें अस्तित्व महाराजांस सांगितल्यामुळेंच मुधोजीस दत्तक घेण्याचें रहित झालें.

ह्या विवेचनावरून सातारा व नागपूर हीं दोन्हीं घराणीं एकाच वंशवृक्षाचीं आहेत हें निराळें सिद्ध करण्याची जरूरी नाहीं. येथपर्यंत ह्या घराण्याचा सातारकर भोंसल्यांशीं कसकसा संबंध पोंचतो

---

* थोरले शाहू महाराज यांचें चरित्र पृ. ९६–९९.

\+ नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. ४७.

हें आम्हीं सप्रमाण दाखविलें आहे. आतां यापुढें मूळ इतिहासाकडे वळूं.

श्री शिवाजी महाराजांच्या वेळीं * मुधोजी व रुपाजी भोंसले हे स्वराज्याची सेवा करीत होते. त्यांनीं त्यावेळीं महाराजांस स्वराज्य स्थापनेस किती तरी मदत केलेली होती. विजापूरकरांच्या बरोबर ज्या लढाया झाल्या त्या प्रत्येक लढाईंत मुधोजी व रुपाजी भोंसले हे होते. मुधोजींचे पुत्र परसोजी व साबाजी हे रुपाजीच्या पथकांत नोकरी करून होते. त्यांनीं अनेक लढायांत पराक्रम गाजविला होता. तो त्यांचा पराक्रम अवलोकन करून श्री शिवाजी महाराजांनीं त्यांस फौज वाढविण्यास सांगून नेहमीं बरोबरच ठेविलें. त्यांनींहीं श्री शिवाजी महाराजांनीं मोंगलाबरोबर ज्या लढाया मारल्या त्यांत प्रमुखत्वानें भाग घेतलेला आहे. रुपाजी भोंसले यांस बापूजी या नांवाचे एक पुत्र होते. बापूजीस राणोजी व संताजी ह्या नांवाचे दोन पुत्र होते. हे दोन्हीं पुत्र अत्यंत पराक्रमी निपजले.

मुधोजी व रुपाजी भोंसले यांचा निधनकाल केव्हां झाला या संबंधीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. श्री शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांनीं राज्यप्राप्तीप्रित्यर्थ जीं अघोर कृत्यें केलीं त्यावेळीं परसोजी भोंसले तेथें होते. त्यांस महाराजांनीं समक्ष बोलावून खानदेशांत पाठविलें होतें. यापुढील बहुतेक कामगिरी परसोजी महाराजांचीच आहे. संभाजी महाराजांच्या निधनानंतर श्री राजाराम महाराजांनीं स्वराज्याचें संरक्षण मोठ्या मिनतवारीनें केलें. त्या प्रसंगींही परसोजी महाराजांची स्वराज्यास मदत झालेली आहे.

---

* वि. ज्ञा. वि. पु. ९ पृ. १३४

परसोजी भोंसले.

स्वराज्याचें संरक्षण करण्याप्रीत्यर्थ जी अत्यंत मेहनत पडली तीमुळें राजाराम महाराज यांचें अकालीं देहावसान झालें. लवकरच शाहू महाराजांची सुटका होऊन ते खानदेशच्या वाटेनें येण्यास निघाले. इकडे ताराबाईंनीं खंडेराव बल्लाळ चिटणवीस व बापूजीबुवा हिंगणीकर यांना शाहू खरा असल्याबद्दल खात्री करण्यासही पाठविलें. धनाजी जाधवरावांकडून बाळाजी विश्वनाथ रवाना झाले. सर्वांची खात्री होऊन शाहूस, खंडेराव बल्लाळ, बाळाजी विश्वनाथ व धनाजी जाधवराव मिळाले व त्यांचा पक्ष प्रबल झाला. त्यांनीं ताराबाईबरोबर लढून आपलें राज्य स्वाधीन करून घेतलें व राज्याभिषेकही शके १६२९ सर्वजित नाम संवत्सरे माघ शुद्धपक्षीं साताऱ्यास झाला. येथपासून सातारा हीच मराठ्यांची राजधानी झाली.

यानंतर लवकरच पिंगळे यांची पेशवाई काढून बाळाजी विश्वनाथ यांस देण्यांत आली. व परसोजी भोंसले यांजला सेनापतीच्या बरोबरीचें " सेनासाहेब सुभा " हें पद व वस्त्रें बहुमान दिला आणि त्यांची पूर्वेकडे रवानगी केली. त्यावेळीं परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांस जी सनद * देण्यांत आली ती येणेंप्रमाणें. शके १६२९

१ प्रांत रितपूर व सरकार गावेल प्रांत वराड प्रांत देवगड. चांद गोंडवण.

---

* नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ २४.

१		आना गोंदी वैगेरे वराड प्रांतीचे महाल ब्रितपशील.		
	१.	सरकार गावेल महाल	....	४६
	१.	सरकार नरनाला महाल	....	३७
	१.	सरकार माहूर महाल	....	१९
	१.	,, खंडले महाल	....	२१
	१.	,, पवनार महाल	....	५
	१.	,, कळंब ,,	....	१९
२	६			१४७

एकूण सहा सरकार दरशेंकडा नऊ रुपये अकरा आणे मोकाशाचे आकारास असे.

या प्रमाणें महाल वैगेरे देण्यांत आले. परसोजी भोंसल्यांविषयीं शाहू महाराजांस अत्यंत प्रेम वाटत असे. त्यांस सेनापतीचेंच पद द्यावयाचा त्यांचा विचार होता; परंतु धनाजी जाधवराव यांजकडे तें पद असल्यामुळें व तेही कर्ते मनुष्य असल्यामुळें महाराजांनीं हें सेनापतीच्या बरोबरीचें सेनासाहेब सुभ्याचें पद नवीन निर्माण करून त्यांस दिलें. ह्या पदास सन्मान + सेनापतीप्रमाणें वस्त्रें, अलंकार, जरीपटका, चौघडा देऊन गोंडवण, देवगड, चांदे, वराड वैगेरे ज्या ज्या ठिकाणीं त्यांनीं अंमल बसविला तो सुभा त्यांस दिला.

वरील सनद प्राप्त होऊन थोडा काळ जातो न जातो तोंच त्यांस मृत्यूनें गांठलें. ते फौजेसहित गंगेपलीकडे असतां मरण पावले. त्यांचें मृत्यूचें × साल इ. स. १७१५ असावें असें वाटतें.

\+ मल्हार रामराव कृत राजारामाचें चरित्र पृष्ठ ३६-३८.

× विल्स कृत १८ व्या शतकांतील नागपूर राज्याशीं ब्रिटिशांचा संबंध पृष्ठ ६.

कान्होजी भोंसले.

परसोजी भोंसले यांच्या मरण समयीं त्यांजवरोबर त्यांचे पुत्र कान्होजी भोंसले हे होते. त्यांनीं धैर्य सोडिलें नाहीं. परसोजी भोंसल्यांस ज्या महालांच्या सनदा मिळाल्या होत्या तेथें त्यांनीं ठाणें बसविलें नव्हतें तरी ते डगमगले नाहींत. त्यांनीं फौज बरोबर घेऊन गंगाथडीस घांसदाणा वगैरे खंडण्या घेत वराडांत आले. व श्रीशाहू महाराजांच्या आज्ञेप्रमाणें एकंदर बंदोबस्त राखिला व रितपूर वगैरे वऱ्हाड प्रांतांमध्यें आपलें ठाणें बसविलें. त्याखेरीज दारवें या ठिकाणीही अंमल बसविला. पित्याच्या मरणोत्तरही दुःख विसरून कान्होजी भोंसल्यांनीं अवर्णनीय पराक्रमानें वऱ्हाडप्रांतीं मराठा साम्राज्याची सत्ता दृढ केली हें वर्तमान श्री. शाहू महाराजांस कळतांच त्यांस परमानंद झाला.

कान्होजी भोंसले यांनीं वऱ्हाडप्रांतीं आपला दरारा उत्तम प्रकारें बसविला होता. मध्यंतरी दिल्लीमध्यें अनेक उलाढाली झाल्या. सय्यद बंधूंनीं दिल्लीवर चाल केली. त्यावेळीं बादशहाच्या विनंतीवरून मराठे मदतीस आले. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या बरोबर कान्होजी भोंसले यांना जाण्याची आज्ञा झाली होती; परंतु त्यांस वेळेवर हजर राहवलें नाहीं. त्यामुळें रूपाजी भोंसले यांचे नातू राणोजी व संताजी भोंसले हे ह्या स्वारी बरोबर निघाले. सय्यद दिल्लीवर चालून येतांच संताजी भोंसल्यांनीं सय्यदाच्या फौजेवर हल्ला करून तीस हरविलें. त्या भयंकर लढाईंत ते कामास आले. ही हकीकत बादशहास कळतांच त्यांनीं संताजीचा पराक्रम पाहून तोंडांत बोटें

घातली. व संताजीचा भाऊ राणोजी यांस * 'सवाई संताजी' हा किताब देऊन कलगी व सवाई ढाल खिलात बहुमान दिला.

या अवधीमध्यें कान्होजी भोंसले स्वस्थ बसले नव्हते. त्यानीं वऱ्हाडप्रांतीं अंमल बसविल्यानंतर चंद्रपूरपर्यंत एक स्वारी केली. देवगड येथें कांहीं परगणे लुटले व ते वऱ्हाडांत आले. त्यानीं भाम हें आपलें राहण्याचें ठिकाण केलें. सेना-साहेब-सुभे अत्यंत दराऱ्यानें अंमल गाजवीत असत. त्यांनीं वडलांच्या पश्चात् संबंध सेनेस आपल्या हुकमतीखालीं ठेविले होतें. तसेंच हरएक ठिकाणाचा बंदोबस्त उत्तम केला होता. हें वर्तमान शाहू छत्रपतींस कळून त्यांनीं कान्होजी भोंसले यांस वस्त्रें × बहुमान जरीमंदिल व जरीची चादर इत्यादि नजर न घेतां पाठविली. तें पाहून सेनासाहेबांस आनंद झाला.

कान्होजी भोंसले यांचा लौकिक वऱ्हाड प्रांतीं एकसारखा वाढत होता. त्यांस सर्व सुखें अनुकूल होतीं; परंतु संततीचें मात्र सुख नव्हतें. त्यामुळें ते फार कष्टी असत. पुत्र सुखाची उणीव भरून निघावी एतदर्थ त्यांनीं बापुजी भोंसले यांचे नातू बिंबाजीचे पुत्र रघोजी यांस आपणांजवळ आणून ठेविलें. रघोजी भोंसले हे साबाजीची स्त्री रमाबाई यांजकडे होते. रमाबाईसही संतती नसल्यामुळें त्यांनीं रघोजीचा प्रतिपाळ केला होता. ज्यावेळीं रघोजी भोंसले यांस कान्होजी भोंसले यांनीं आपणांकडे आणिलें

---

* मल्हार रामराव कृत शाहूचें चरित्र. पृ. ४०-४२.

× नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. २९.

त्यावेळीं त्यांचें वय अवघ बारा वर्षांचें होतें. रघोजी भोंसल्यावर ते पुत्रवत् प्रेम करीत असत. स्वारी शिकारींत बरोबर घेऊन जाऊन त्यांस हरएक प्रकारचें शिक्षण कान्होजी भोंसले यांनीं दिलें होतें. पहिले रघोजी सुप्रसिद्धीस येण्यास त्यांस कान्होजी भोंसल्यांचेंच शिक्षण कारणीभूत झालें होतें.

कान्होजी भोंसले यांचा लौकिक वाढत्या प्रमाणांत येतांच भाऊबंदकीचें बीजारोपण सुरू झालें. यावेळीं भोंसल्यांच्या तीन शाखा अस्तित्वांत होत्या. रूपाजीचे नातू राणोजी, परसोजीचे पुत्र कान्होजी व बापुजीचे नातू रघोजी अशा तीन शाखा होत्या. साबाजी भोंसले निपुत्रिक असल्यामुळें त्यांची सर्व गांवगन्ने त्यांची स्त्री रमाबाई यांजकडे होतीं व तीं रमाबाईच्या पश्चात राणोजी भोंसले यांजकडे आलेलीं होतीं. ज्याप्रमाणें कान्होजी भोंसले हे मराठी राज्याचे सुभे होते त्याप्रमाणें राणोजी भोंसले यांजकडेही आसामी होती. कान्होजीचा वाढता काळ पाहतांच सरंजामासंबंधीं भांडणें उपस्थित झालीं. त्यावेळीं श्री. शाहूमहाराज यांनीं कान्होजी भोंसले व राणोजी भोंसले यांस सरंजामाची वांटणी करून दिली आहे. तें पत्र येणें प्रमाणेंः—

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५३ प्लवंगनाम संवत्सरे जेष्ट शुद्ध नवमी, गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री राणोजी भोंसले यांसी आज्ञा केली ऐसाजेः—

राजश्री कान्होजी भोंसले स्वामीच्या दर्शनास आले. तुम्हो

हुजूर होतेत त्यास तुम्हां उभयतांचें समाधान करून सरंजामाची वांटणी करून दिली आहे. बितपशील:—

मसूरचे मुक्कामीं राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांचे विद्यमानें सरंजाम करार करून दिला आहे. त्या पैकीं दोन तक्षिमा, (एक तक्षिम) राजेश्री कान्होजी भोंसले व एक तक्षिम तुम्हीं व रघोजी भोंसले यांसी सरंजाम—कलम १ हल्लीं पराभव नाम संवत्सरीं साता-रियाचे मुक्कामीं स्वामीनीं हुजुरून सरंजाम दिला आहे. त्यापैकीं तीन तक्षिमा राजेश्री कान्होजी भोंसले, बाकी चौथी तक्षिम तुम्हीं व रघोजी भोंसले यासी. येणें प्रमाणें सरंजामाची वांटणी करून देऊन तुह्मास, कलम, १ रघोजी भोंसले देखील राजश्री कान्होजी भोंसले यांचे बरो-बर दिल्हे आहे. तुह्मीं मान्य करून स्वामीचे पायाची शपत केलीत या उपरी सदरहु वांटणीप्रमाणें तुह्मीं सरंजाम घेऊन कान्होजी भोंसले यांचे विचारें वर्तणूक करणें, तुम्हीं त्यांचे महालांत दखल न होणें. ते तुमचे महालांत दखलगिरी करणार नाहींत. सरंजामखेरीज परमुलखांत खंडण्या होतील. त्यापैकीं सरदारी वांटा चौथाई काढून बाकी राहील त्यापैकीं तुमचे व त्यांचे फौजेबरहुकूम वाटून देतील तुम्हीं व रघोजी राजश्री कान्होजी भोंसले यांचे बरोबर राहून एका विचारें स्वामी कार्य करणें. तुमचा मुक्काम कान्होजी भोंसले यांचे बरोबर होईल. तुम्हीं सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. राजश्री कान्होजी भोंसले चालवावयास अंतर करणार नाहींत. + जाणिजे.

वरील पत्रावरून कान्होजी व रघोजी, यांची वांटणी कशी काय झालेली होती तें स्पष्ट नजरेस येत आहे. त्याच अर्थाचे

+ इ. सं. वर्ष. ६ अं. १०।११।१२.

इ. स. १७२६–२७ सालचें एक पत्र राजवाडे यांच्या ६ व्या खंडांत प्रसिद्ध झालेलें आहे. मजकूर समान असल्यामुळें तें दिलेलें नाहीं.

राणोजी तसेंच रघोजी हे कान्होजी भोंसल्यांच्या पदरीं होते हें यावरून सिद्ध होत आहे. त्यांचे आपसांत झगडे सुरू होऊं नयेत म्हणून छत्रपतींनीं त्यांची वांटणीही करून दिली होती. रघोजी भोंसले यांस जरी कान्होजींनीं पुत्रवत् पाळिलें होतें तरी त्यास ज्यावेळीं फौजेमध्यें ठेविलें त्यावेळीं त्यांजशीं एक करार केलेला होता. तो करार येणेप्रमाणें:—

॥ श्री ॥

पार्वतीकान्त विश्रांत

मनसाति यशस्विनः

बिंबात्मजस्ये मुदे.

राजेश्री कान्होजी बाबा भोंसले गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित रघोजी भोंसले रामराम विनंती सुभा सकसीन असरमया आलफ तुम्ही आम्हास फौजेमध्यें ठेविलें आणि तहनामा करून दिला बी तपशील तहबेली फौजेमध्यें आपण राहावें आणि जे महाल पेशजी नेमून घेतले आहेत त्याखेरीज आणखी जो टका पैका येईल त्यापैकीं तुम्हाकडील राजश्री राहतील त्याजकडे दोन तकसीमा द्यावा. यक तकसिम आपण घेऊन यावी, तजावत तफावत करूं नये. तुम्हाकडील जो राहील त्यांनीं दोन तकसीमा फौज ठेवावी एक तकसीम तिजाईची ठेवावी. फौजेतून कर्ज वाम होईल तरी तुम्ही मशारनिलेकडून दोन तकसी-

मावर एक तकसीम आपले फौजेस होईल तें कर्ज करू नये जोक ते राबोन तफावत तजावत करूं नये कलम (१) पेशजीचे सरंजामाखेरीज जाजती सरंजाम दरबारीतून करून घ्याल त्यास खर्च वेंच पडेल तो एक तकसीम आपण देऊन दोन तकसीमा तुम्ही घ्यावा. सरंजाम तिजाई आम्हीं घेऊन तफावत करूं नये.

कलम १

वाटणीपैकीं सरंजाम आहे त्यास दरबारांत खर्च वेच पडेल तो रूजुवातीनें एक तकसीम आपण देऊं दोन तकसीमा तुम्ही द्याव्या सरंजामांत घालमेल यकंदर गणीथाची जाली......घेणार नाहीं.

कलम १

मेमाड महाल येपैकीं नजरेचा घोडा येईल तो सरदारीचा तुम्हास घ्यावा या खर्चास टका पैका येईल तो बिना कसूर तिजाई घेऊ तुम्ही सरंजाम द्यावा तफावत करूं नये.

कलम १

गांव................येऊन झडती घेतली तेथें घोडी पिढी वस्त भाव निघेल तेथें एक घोडा नजरेचा तुम्हास घ्यावा बाकी कुल तिजाई घेऊन तफावत तजावत करूं नये कळमबार.

एकूण कलमें ५ आहे. तहनामाप्रमाणें आह्मी राहोन सेवा एकनिष्ठेनें करून तजावत तफावत करणार नाहीं. चंद्र २४ रमजान बहुत काय लिहिणें हे विनंती (मोर्तब) ह्या करारप्रमाणें रघोजी भोंसले हे कान्होजी भोंसल्यांच्या फौजेंत नौकरी करीत होते. ती नौकरी बरींच वर्षे सुरळीत चालली. कारण रघोजी भोंसले यांस

खात्री होती कीं, कान्होजीस संतती नसल्यामुळें पुढें सेनासाहेब सुभ्यांची सर्व दौलत आपणांकडेच येणार आहे; परंतु ईश्वरानें निराळेंच वर्तविलें. कान्होजीचा संततीसाठीं केलेला दानधर्म फळास आला. व्रतें वैकल्यें व गरिबांचा दुवा यामुळें त्यांचें कुटुंब गरोदर राहून योग्यकाळीं त्यांस पुत्ररत्न झालें. पुत्र प्राप्तीनंतर रघोजी भोंसल्यांच्या मनांत तेढ उत्पन्न झाली. आपला डाव साधत नाहीं असें वाटतांच त्यांच्या मनांत परकेपणा वास करूं लागला. औरस संतती प्राप्त झाल्यामुळें रघोजीवरील पूर्वीच्या प्रेमांत अंतर येणें साहजिकच आहे. तें पाहातांच रघोजी भोंसले कान्होजींकडून निघून गेले. वरील करारपत्राचा मायना जरा चमत्कारिक दिसतो. कान्होजी भोंसले हे रघूजीस बापाप्रमाणें होते. अर्थात् त्यांस दंडवत वगैरे लिहिलें पाहिजे होतें, पण करारपत्रांत "रामराम" लिहिला आहे. जणूं काय हा करार परक्या ह्मणजे बरोबरीच्या इसमांत झाला आहे असें दिसतें.

रघोजी राजे भोंसले यांस कान्होजी भोंसल्यांनीं पुत्राप्रमाणें पाळिलें. पण शेवटीं, कान्होजीस पुत्र होतांच रघोजीचें मन द्विधा होऊं लागलें. ज्या इस्टेटीवर आपला स्वार्थ होता ती इस्टेट व तें पद आतां आपणांस प्राप्त होत नाहीं असें दृष्टोत्पत्तीस येतांच रघोजीराजे एके दिवशीं कान्होजीकडून निघून देवगडचे राजे चांद सुलतान यांजकडे गेले व तेथें शंभर स्वारांनिशीं नोकरी करूं लागले. गोंड राजानेंही सेनासाहेबांचे पुतणे जाणून सन्मान केला. स्वार्थ मनुष्यास कोणती गती देईल हें सांगवत नाहीं. त्यावेळीं तो अंध बनत असतो. त्यास मान अपमान मुळींच कळत नाहीं. आपण कोण? आपला दर्जा काय? आपण कोणाची सेवावृत्ति पत्करावी हें त्यास कळत नाहीं.

यांत त्याचा अपराधही नाहीं. कारण सर्व जगच स्वार्थानें अंध झालेलें असतें तेथें रघोजीचा काय पाड ?

पण थोडक्याच अवधीमध्यें रघोजीस गोंड राजाच्या सेवावृत्तीचा तिटकारा आला. त्यांनीं ती सेवावृत्ति सोडली व ते एलिचपूरच्या सुभ्याकडे गेले. त्यांनींही त्यांस आदरें करून ठेविलें. तेथून ते श्रीमंत शाहू छत्रपति महाराजांस भेटावयासाठीं म्हणून गेले व तेथेंच राहिले. भेटण्याचें केवळ निमित्त मात्र होतें. पण आपल्या पोटापाण्याची सोय पहावी हाच त्यांतील उद्देश होता.

भोंसले घराण्याचे प्रख्यात पुरुष परसोजी यांपासून ह्या घराण्यास जें गौरवपर पद प्राप्त झालें त्याचा उपभोग परसोजींचे पुत्र कान्होजी यांना पूर्णपणेंही घ्यावयास मिळाला नाहीं. परसोजी भोंसले यांची विलक्षण कर्तबगारी भोंसले घराण्याच्या अभ्युदयास कारणीभूत झालेली आहे. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व शाहू महाराज या चार छत्रपतींची अमोल सेवा परसोजीनें केलेली आहे. त्या त्यांच्या सेवेचें फळ "सेना साहेब सुभा" ह्या पदानें श्री. छत्रपति राजाराम महाराजांच्याच वेळीं त्यांस हें पद प्राप्त झालें होतें. ती हकीकत येणेंप्रमाणें:—

इ. सन १६९९ मध्यें राजाराम महाराज साताऱ्याहून उत्तरेकडे जावयास निघाले त्यावेळीं त्यांस खानदेश, गंगथडी व वराड येथून परसोजी भोंसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, आटोळे समशेर बहादर वगैरे सरदार येऊन मिळाले व त्यांनीं

गंगथडींत शिरून चौथ सरदेशमुखी वसूल करण्याचें काम सुरु केलें. त्यावेळीं ह्या निरनिराळ्या सरदारांची वेगवेगळा वसूल करण्यासाठीं नेमणूक केली होती. त्यावेळीं श्री. राजाराम महाराजांनीं परसोजी भोंसल्यास * 'सेनासाहेब सुभा' हें पद दिलें होतें. त्याच पदाची पुनरावृत्ती श्री. शाहू महाराजांनीं आपल्या आमदानीमध्यें केली.

श्री. राजाराम महाराजांच्या अंतकाळीं परसोजी × भोंसले हेही इतर मुत्सद्यांबरोबर होते. त्यावेळीं महाराजांनीं शाहू महाराजांच्या सुटकेचा प्रयत्न करण्यास सर्वांस ताकीद केली होती. यावरून परसोजी भोंसले हे आरंभापासून स्वराज्यसेवेस साहाय्यभूत होते हें सिद्ध होतें. परसोजी भोंसले यांस वऱ्हाडचा सुभा प्राप्त होतांच त्यांनीं आपलें राहण्याचें ठिकाण + "भाम" हें केलें. हें गांव वणी तालुक्यांत यवतमाळपासून सात कोसावर आहे. त्या काळीं तेथें पांच हजार बैराग्यांचीं घरें होतीं. हल्लीं जुन्या इमारतीचे अवशेष आहेत. तुरळक वस्ती आहे. ह्या गांवास 'राजाची भाम' ह्मणत असत. भाम व उमरावती हीं गांवें परसोजीचे चुलते जे निजामशाही राज्यांत नोकर होते त्यांस नोकरीबद्दल जहागीर मिळालीं होतीं. ह्मणूनच परसोजीनें "भाम" हें गांव राहण्यास पसंत केलें.

१७०९ मध्यें परसोजीचा * काल झाल्यानंतर त्याच वर्षी त्याचा पुत्र कान्होजी यास सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें प्राप्त झालीं होतीं.

---

* मराठ्यांची बखर पृष्ठ ११५.

× मल्हार रामरावकृत राजाराम महाराज यांचें चरित्र पृष्ठ ४०

+ काळेकृत वऱ्हाडचा इतिहास पृष्ठ १७८-७९

* ग्रँड डफ १७१५ ह्मणतो भाग १ पृष्ठ ३७३, जेंकिन्स १७०९ ह्मणतो.

कान्होजी भोंसल्यांनीं स्वराज्याची कामगिरी कमी प्रतीची बजाविली असें नाहीं. त्यांनींही अनेक लढायांत आपली समशेर परजली होती. इ. स. १७२० मध्यें निजामुल्मुल्क व सैदाची जी लढाई झाली त्या लढाईत सैदातर्फे सेनासाहेब सुभे कान्होजी भोंसले व हैबतराव निंबाळकर हे प्रमुख सरदार आपापल्या लष्करासहित आले होते. ही लढाई बाळापुरास झाली. या लढाईमध्यें जरी मोंगलांस यश मिळालें नाहीं तरी मराठे लोकांनीं आपलें नांव मात्र खराब केलें नाहीं. कान्होजी भोंसले हे विलक्षण कर्तबगार होते. त्यांनीं आपल्या कारकीर्दीमध्यें वऱ्हाड प्रांतीं फारच उत्कृष्ट दरारा बसविला. त्यांनीं अनेक लढायांमध्यें भाग घेतलेला होता; परंतु इतिहासाच्या अभावामुळें त्यांच्या कर्तृत्वशक्तिविषयीं विशेष लिहितां येत नाहीं.

कान्होजी राजे यांचें वजन मराठ्यांच्या दरबारांत बरेंच होतें. त्यामुळें ते केव्हांही दरबारी गेल्यास त्यांचा यथोचित् सन्मान होत असे. व शाहू महाराजही त्यांचा विशेष गौरव करीत असत. असे प्रसंग नेहमीं येत असत.

साताऱ्यास येऊन राहिल्या नंतर रघोजी भोंसले यांचा, खंडेराव बल्लाळ यांचे तिसरे पुत्र गोविंद खंडेराव चिटणवीस, श्रीपतराव प्रतिनिधी व श्रीमंत फत्तेसिंग राजे भोंसले यांचेशीं दाट परिचय झाला. त्या परिचयाचें रूपांतर दृढ मैत्रींत झालें व तीच मैत्री त्यांच्या उर्जितावस्थेस कारणीभूत झाली.

रघोजी भोंसले यांची जात्याच स्वारीशिकारीकडे विशेष प्रवृत्ति ! कोठेंहि शिकारीस जाणें झालें तरी त्यांची तयारी ! आपल्या

बाहुबळानें मर्दुमकी गाजवून लौकिक मिळविण्याची महत्वाकांक्षा ! तीहि पूर्ण होण्याची संधि आली.

श्री. शाहू महाराजांनीं फत्तेसिंग राजे भोंसले यांजला कर्नाटकावर स्वारी करण्यास फौजेसह रवाना केलें. त्यावेळीं त्यांनीं छत्रपतीस विनंति करून रघोजी भोंसले यांजलाहि समागमें नेलें. सदर स्वारी मधील रघोजी भोंसले यांचें रणनैपुण्य अवलोकन करून त्यांनीं लढाईवरून परत आल्यानंतर शाहू महाराजांजवळ रघूजी भोंसले यांची फारच तारीफ केली. ती ऐकून महाराजांस अभिमान वाटला. व त्यांजवर त्यांची मर्जी प्रसन्न झाली. यानंतर शाहूमहाराज रघोजीस आपल्या-बरोबर शिकारीस नेऊं लागले. एके दिवशीं शिकारीस गेले असतां शाहू महाराजांवर वाघानें हल्ला केला. जागा अडचणीची होती, त्यामुळें त्यांचा उपाय चालेना. इतक्यांत रघोजी भोंसल्यांनीं घोड्या-वरून उडी मारून पट्टा खेळून वाघास जीवें मारिलें. व महाराजांचा प्राण वांचविला. ह्या प्रसंगावरून तर रघोजी राजे यांजवर शाहू महाराज फारच लोभ करूं लागले. अशाच वेळीं छत्रपतींनीं आपल्या राणीची चुल्त बहीण + शिर्क्यांची कन्या सुळाबाई ही रघूजीस देवविली.

ह्याप्रमाणें जवळचा आप्तसंबंध होतांच, छत्रपतीस रघोजी राजांचें फारच अगत्य भासूं लागलें; व त्यांस कांहीं तरी महत्वाची

+ ग्रँटडफ शिर्क्यांची कन्या ह्मणतो. नागपूरकर भोंसल्यांच्या बखरींत बुऱ्हाणजी मोहिते यांची बहीण ह्मणजे छत्रपतीची धाकटी राणी व रघोजीची बायको सुळाबाई या दोघी चुलत बहिणी असें ह्मटलें आहे. पृष्ठ ३०.

कामगिरी सांगावी असें वाटूं लागलें. तो प्रसंग फारच चमत्कारिक रितीनें घडून आला. तो येणेंप्रमाणें:—

रघोजी भोंसल्यांचे चुलते कान्होजी भोंसले हे वीर्यशाली, मुत्सद्दी व तेजस्वी होते. त्यांनीं आपल्या पराक्रमानें स्वराज्याची बहुमोल सेवा केली होती. असें जरी होतें, तरी त्यांजवर क्षुब्ध होण्यास शाहू महाराजांस खालील कारण आढळलें. त्यांस कोणी कळविलें कीं, कान्होजी भोंसले हे मराठ्यांच्या हातचें अन्न खात नाहींत. तो रोष मनांत ठेवून त्यांनीं कान्होजी भोंसल्यास बोलावणें पाठविलें. त्यावेळीं कान्होजी भोंसले राजदर्शनास आले. भेटी-अंतीं आनंद झाला.

"एके दिवशीं कान्होजी भोंसले हे फारच कडक सोंवळ्यानें वागतात. मराठ्यांच्या हातचें कधीं न जेवतां ब्राम्हणाच्या हातचें अन्नग्रहण करतात. आपल्या जातीच्या आचाराप्रमाणें न वागतां स्वेच्छ वर्तन करतात, व विनाकारण दंभ माजवितात, वगैरे जी त्यांसंबंधीं माहिती छत्रपतींच्या कानावर आली होती ती पडताळून पाहण्याचा त्यांनीं निश्चय केला. व राजवाड्यांत कान्होजी भोंसले व रघोजी भोंसले आल्यावेळीं त्यांस जेवावयास बसण्याची आज्ञा केली. कान्होजी भोंसल्यांनीं पुष्कळ टाळाटाळ केली पण त्यांचा उपाय नव्हता. शाहू महाराजांनीं त्यांची पुरीच परीक्षा पाहण्या-साठीं त्यांस आपल्या ताटांतच जेवणास बसविलें. तेव्हां दोघांनीं एका ताटांत भोजन केलें. रघोजीस भोजनाची वहिवाटच होती. जेवण होतांच कान्होजी भोंसले आपल्या बिऱ्हाडीं गेले व त्यांनीं

गरम पाण्यांत मीठ मोहरी घेऊन घशांत बोटें..............घालून × वमन केलें. हें वर्तमान समजतांच छत्रपतींचा कान्होजी भोंसल्यावर रोष झाला; व त्यांनीं हेंच निमित्त ठेवून त्यांजकडून शिक्केकट्यार मागावयास ताबडतोब मनुष्य रवाना केला. पण त्यापूर्वींच कान्होजी भोंसले छत्रपतींचा रोष उमगले, व तत्काळ निरोप न घेतां पळून स्वदेशीं आले.

× नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ ३१.

रघोजी राजे

रघोजी राजे यांचा जन्म इ. स. १६९८ मध्यें पुण्याजवळील पांडववाडीस झाला. तेथून ते आपल्या चुलत्याकडे आले. त्यावेळीं त्यांचें वय १२ वर्षांचें होतें. त्यांनीं त्यांचें पुत्रवत् पालन केलें. कान्होजीस पुत्र होतांच ते निरनिराळ्या ठिकाणीं राहून साताऱ्यास शाहू महाराजांजवळ येऊन राहिले व तेथें असतांच त्यांच्या दैवानें त्यांस अवसर देऊन शाहू महाराजांचें प्रेम संपादन करविलें व त्याचाच परिणाम त्यांस "सुभा" मिळण्यांत झाला. ती हकीकत येणेंप्रमाणें:—

कान्होजी भोंसले यांजकडून अवज्ञा होऊन ते पळून गेल्याचें समजतांच शाहूमहाराजांनीं फत्तेसिंग राजे भोंसले व गोविंद खंडेराव चिटणीस यांच्या विचारें सेनासाहेब सुभा कोणास द्यावा? म्हणून मसलत चालविली. तेव्हां त्यांनीं रघोजी भोंसल्यांची फार तारीफ करून "रघुजीबुवा भोंसले हे त्यांचे पुतणे; परंतु सरकारचरणीं लक्ष आणि सेवाही स्वामीची केली आहे. यांजला * आज्ञा व्हावी" म्हणून विनंति केली. त्यावर शाहूमहाराजांनीं संशय प्रगट केला कीं, हेही आपल्या कुटुंबासहीत तेथें गेल्यावर त्यांच्याप्रमाणेंच वर्तणूक करतील. यासाठीं यांनीं तिकडील प्रांतीं सडें जावें व कुटुंबास येथें ठेवावें. त्यांच्या चरितार्थासाठीं × देऊर हा गांव मोकासा देतों. हें छत्रपतीचें ह्मणणें रघूजीस कबूल झालें. त्याबरोबर छत्रपतींनीं रघूजीराजे यांस

---

* नागपूरकर भोसल्यांची बखर पृष्ट ३१.

× कांहीं ठिकाणीं देऊर हा गांव रघुजीच्या पूर्वजांस पूर्वींच इनाम मिळाला होता असा उल्लेख आहे.

+ सेनासाहेब सुभा हें पद देऊन वऱ्हाडची सुभेदारी सांगितली. सुभेदारीचीं वस्त्रें देतेवेळीं रघूजी राजे यांजकडून असा करार करून घेतला कीं, "नेहमीं पांच हजार स्वारांनिशीं चाकरी करावी व वर्षास नऊ लक्ष रुपये सरकार पोत्यास पोहोंचवावे, याशिवाय कधीं पेशवा मोहिमेस निघेल ते समयीं त्याजबरोबर दहा हजार स्वारांसहीत जावें." ह्या प्रमाणें करार मदार झाल्यावर वाई परगण्यांतील देऊरगांव मोकासा करून दिला; आणि रघूजीराजा-बरोबर थोर थोर * मंडळी रवाना केली. त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:— कोल्हेरराम मुजुमदार, रखमाजी गणेश प्रभु चिटणीस, गोविंदराव खंडेराव चिटणीस, भास्करराम, यशवंतराव पोतनीस, महादजीपंत प्रभु फडणीस, व्यंकाजीपंत व राघोपंत बक्षी, रघुनाथभट झिपरे, वेदमूर्ति विश्वंभर वैद्य या खेरीज सोयरे, मानकरी व मुत्सद्दी मंडळ बरेंच देण्यांत आलें होतें. सरदार मंडळी जी दिली होती त्यांचा तपशील खालील प्रमाणें:—तुळजोराम, बाबाजी घाडगे झुंजारराव, संभाजी शिर्के, जानराव गुजर, नरसिंगराव बुवाजी प्रभु, नरोजी जाचक, गिरमाजी खंडेराव, शिवाजी केशव टाळकुटे, बिंबाजी वंजाळ, आनंद-राव वाघ, रघोजी करांडे, दिनकर विनायक, त्रिंबकजी गव्हाणे, त्रिंबकराव कान्हो मोहिते. ह्या परिवारासह रघूजीराजे सेनासाहेब सुभा फौजेसह वऱ्हाडांत आले. ते जालन्याचे मार्गानें आले. त्यांस आटोळे समशेर बहाद्दर हे आडवे आले, व आपल्या मुलखांतून जाऊं

+ ही गोष्ट इ. स. १७३१ मध्यें झाली असावी.

* नागपूरकर भोसल्यांची बखर पृष्ट ३३-३४.

देईनात. त्यांस छत्रपतींचीं आज्ञापत्रें दाखवून ते लाखणवाड्याचा घाट उतरून बाळापूरचे सुमारास आले. तेथें कांहीं फौज ठेविली, व सोबत तीस हजार फौज घेऊन कान्होजी भोंसले 'भाम' येथें होते तेथें गेले. त्याबरोबर कान्होजी भोंसले वशिष्टीचे अलीकडे आले. रघूजी भोंसल्यांनीं त्यांचा पिच्छाच पुरविला, व त्यांस वणी तालुक्यांतील मंदार गांवीं आटोपलें. कान्होजी भोंसले यांची सत्ता नष्ट होतांच सोबतच्या फौजेमध्येंही फाटाफाट सुरू झाली होती. त्यामुळें रघूजीराजांबरोबर सामना देणें त्यांस अशक्य झालें. तेव्हां त्यांस रघूजी राजांनीं वेढा दिला, व चुलत्यासमोर जाऊन मुजरा केला. त्यावेळीं कान्होजी भोंसले अद्वातद्वा बोलूं लागले. तेव्हां त्यांस कैद करून सातान्यास पाठविलें. कान्होजी भोंसले हे सातान्यास बंदिखान्यांतच मरण पावले कान्होजीच्या वंशजांस " उमरावतीकर भोंसले म्हणतात.

कान्होजी भोसल्यास कैद केल्यानंतर रघूजी सेनासाहेब सुभा यांनीं वऱ्हाडप्रांतांत आपला अंमल बसविणें सुरूं केलें. प्रथम राजूरची छावणी मुक्रर केली. एलिचपूरचा सरदार पठाण सुजायत खान हा अकोला येथें होता. त्याजबरोबर सामना देऊन त्यांनीं त्याचा पराभव केला. त्या प्रसंगीं एक नौबद पाडाव करून आणली ती अद्यापहि अस्तित्वांत आहे. ह्या प्रमाणें दोनचार लढाया देऊन अंमल बसविला. इतक्यांत देवगडकर राजे चांद सुल्तान यांचे पुत्र मीर बहादर व अकबरशा व बुराणशा हे खासे आणि राखेचा पुत्र वलीशहा यांजमध्यें कलह उत्पन्न झाला. मीरबहादर यास वलीशहानें जीवें मारलें. हा प्रकार पाहून त्यांची मातोश्री राणी रतनकुंवर इनें

रघूजी राजांचें सहाय्य मागितलें. त्याबरोबर रघोजीराजे फौजेसहित निघाले ते केझरच्या घाटानें पवनी येथें आले व तें ठाणें त्यांनीं लढून घेतलें आणि भंडाऱ्यास आले व तेथें मुक्काम केला. ही बातमी वलीशहा यास कळतांच त्यानें आपला **दिवाण रघुनाथसिंग** यास फौजेसहित रघोजीराजे सेनासाहेब सुभा यांचें पारिपत्य करण्यास पाठविलें. यावेळीं रघूजीराजांचा मुक्काम मौजे शिरसघाट परगणे भानार गंगापार होता. रघुनाथसिंग फौजेसह येतांच सेनासाहेबांनीं आपल्या फौजेचे दोन भाग केले. एक भाग गिरोळी प्रगणे भानार येथें व दुसरा भाग सोनबरडीच्या लगत ठेवून रघुनाथसिंगास फौजेसहित दोन्ही भागाच्या कचाट्यांत येऊं दिलें; आणि आपण पळावयास लागले, त्याबरोबर रघुनाथसिंगाच्या गोंड सैनिकांस हर्ष होऊन ते त्यांच्या मागें लागले. मिरनगर सोनबरडी येथें एक डोह आहे. त्या डोहापर्यंत गोंड सैनिकांस येऊं देऊन रघूजीराजांनीं त्यांजवर त्वरेनें उलटून हल्ला केला. दोन्ही तुकड्यांचे मागून पुढून हल्ले होऊन मोठी मातबर लढाई झाली. गोंड राजांचें भयंकर नुकसान झालें. त्यांचा दिवाण रघुनाथ-सिंग जखमी होऊन रणांत पडला त्यास सेनासाहेबांनीं उचलून नेऊन त्याच्या जखमांवर औषधोपचार केले. तो बरा होतांच त्यांनीं त्यास आपणांकडे वळवून घेतलें आणि देवगड हस्तगत करून देण्याचें वचन घेऊन त्यास देवगडास रवाना केलें. यानंतर सेना-साहेबांनी भानार-भंडारा-घेण्यासाठीं मोर्चे बसवून लढाई सुरु केली. भंडाऱ्याचा किल्लेदार **हरी पाटील** यानें अत्यंत शौर्यानें बावीस दिवस किल्ला लढविला. शेवटीं शिकस्तीचा प्रयत्न करून सेनासाहेबाचे सरदार **रघूजी करांडे** यानीं पाटलाचा पराभव केला व त्यास धरून

आणिलें. तेव्हां त्यास जीवें मारण्याबद्दल हुकूम सेनासाहेबांनी केला पण रघूजी करांड्यांनीं विनंति केल्यावरून पाटलाचा प्राण वांचला. भंडारा काबीज केल्यावर सेनासाहेब सुभा × **रामक्षेत्रास** (रामटेकास) फौजेसह आले. तेथें आंबकुंडावर स्नान करून, कार्यसिद्धी झाल्यास गडावर रामचंद्रजीची स्थापना करण्याबद्दल निश्चय केला.

सेनासाहेब सुभे रामटेकाहून देवगडास फौजेसह आले. किल्ल्यामध्यें वलीशा होता. रक्तपात न होतां कार्यभाग व्हावा असा हेतु धरून सेनासाहेबांनीं रघुनाथसिंग दिवाणास पूर्वसंकेतानुरूप निरोप पाठविला. रघुनाथसिंग वाटच पहात होता. त्यानें वलीशास सांगून पाठविलें कीं आपल्या फौजेचा बंदोबस्त उत्तम आहे. आपण किल्ल्याबाहेर फौजेंत यावें म्हणजे लोकही हुशारीनें लढतील. हा निरोप पावतांच वलीशा किल्ल्याबाहेर आला. त्याबरोबर सेनासाहेबांनीं त्याच्या जमावास आपल्या फौजेचा वेढा देऊन वलीशास कैद केलें व रतनकुंवर राणीची भेट घेतली. त्यांचें बोलणें वगैरे झाल्यावर राणी रतनकुंवर आणि अकबरशहा व बुराणशा यांस बरोबर घेऊन सेनासाहेब नागपुरास आले. याच सुमारास ब्रम्हपुरीचें कारस्थान उद्भवलें. ब्रह्मपुरीचा किल्लेदार खमेनसिंग जमादार व त्याचा भाऊ आणीराय यांनीं पवनीच्या बाजूस उपद्रव देणें सुरू केलें होतें. त्यांजवर **रघूजी करांडे** यांस पाठविलें नंतरआपणहि कांहीं

× रामटेक हें प्रसिद्ध देवस्थान आहे. सदर देवस्थानाची व्यवस्था ट्रस्टीमार्फत चालत आहे. श्री. राजाबहादूर रघूजीराव भोंसले, राजे लक्ष्मणराव भोंसले, श्री. कुं. फत्तेसिंगराव भोंसले, श्री. माधव गंगाधर चिटनवीस हे देवालयाचे ट्रस्टी आहेत. कार्तिक महिन्यांत तेथें एक मोठी यात्रा भरते.

फौज नागपुरास ठेवून गेले. खमेनसिंगानें बारा दिवस किल्ला लढविला. पण शेवटीं सेनासाहेबांनीं मर्दुमकीची शर्थ करून किल्ला हस्तगत केला. ह्या युद्धांत खमेनसिंगास **रघूजी करांडयानें** कैद करून सेनासाहेबांसमोर आणिलें. प्रथम त्यास देहांत शिक्षा देण्याचा त्यांचा विचार होता. परंतु रघूजी करांड्याचे शिफारसीनें खमेनसिंगास जीवदान मिळून शिवाय तेथील किल्लेदारीही देण्यांत आली. इतक्यांत भंडाऱ्याकडील गडबडीचें वर्तमान समजलें. पूर्वी जीवदान दिलेला **हरी पाटील** यानें फितुरी चालविल्याचें समजतांच सेनासाहेबांनीं खमेनसिंगास भंडाऱ्याची किल्लेदारी दिली व आपण नागपुरास आले. ह्या अवधीमध्यें अकबरशहा पळून एलिचपुरास असफजहाकडे गेला. राणी रतनकुंवरनें सेनासाहेबांस सांगितलें कीं, " माझे पुत्र दोन आहेत, तिसरे तुम्हीं आहां. राज्याचे तीन हिस्से करावे." ही तिची विनंति ऐकून सेनासाहेबांनीं गोंडवन प्रांताचा एक हिस्सा यांत किल्ले पवनी, मारूड व मुलतापी वरघाट हे खांसाहेबांस संतोषानें दिले. आणि करारमदार लिहून घेऊन त्याजपासून खंडणीदाखल स्वारी खर्च दहा लक्ष रुपये घेतला.

रघोजी राजे हे स्वतः अत्यंत दिल्दार होते. शिपायांचे अत्यंत प्रेमी. त्यांजशीं ते दोस्ताप्रमाणें वागत. जवळ एक पैसाहि न ठेवतां तमाम फौजेस खर्चास देऊन संतोषवीत असत. त्यामुळें प्रसंगीं शिपाई प्राणाचीहि पर्वा न करतां लढत असत. त्यांची शिस्त वाखाणण्यासारखी असे. स्वारी करणें झाल्यास ते कोणासहि कळूं देत नसत. केव्हां कूच होईल याचा भरंवसा नसे. त्यामुळें फौज नेहमीं सावध राही. "जें राम करील तें खरें" असें ह्मणून ते

कार्यास लागत. स्वारीच्या वेळीं जातीनें पुढें होत. ऐषआराम तर त्यांस मुळींच माहीत नव्हता. घोड्यावर भाकर खावी व स्वारी करावी असा हा खंदा वीर होता. श्री. शिवाजी महाराजांच्या पश्चात् रघूजीराजासारखा दुसरा कोणताहि वीर नव्हता. त्यांनीं मनांत आणिलें कीं अत्यंत चिकाटीनें तें कार्य करावयाचेंच. मग त्यांत कितीहि श्रम पडोत, त्याची ते पर्वा करीत नसत. ह्या त्यांच्या चिकाटीचा अनुभव बंगालवरील स्वाऱ्यांच्यावेळीं चांगलाच निदर्शनास आला. रघूजीराजांनीं वरीलप्रमाणें वांटणी करून दिली, व आपलीही छावणी नागपुरास कायम केली. तोंपावेतों ते "भाम" येथेंच होते. येथपासून भोंसल्यांची कारकीर्द नागपुरास सुरू झाली. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर सेनासाहेब साताऱ्यास छत्रपतींच्या भेटीसाठीं गेले. सेनासाहेबांची मर्दुमकी ऐकून शाहू छत्रपतींनीं संतोष प्रगट केला; व शके १६६० सालीं खास फौजेच्या बेगमीदाखल आठ सुभ्यांची एक सनद दिली. तिचा तपशील येणेंप्रमाणें:—

सुभा लखनौ, सुभा मकसुदाबाद, सुभा बेदर, सुभा टाका-बंगाला, सुभा बितीयाचा, सुभा बुंदेलखंड, सुभा इलाहाबाद, सुभा हजीपूर पटणे हे आठ सुभे व प्रांत देवगड, प्रांतगढ, प्रांत बर्गड, प्रांत चांद दरोबस्त ह्या चार प्रांतांच्या चौथ मोकाशाच्या सनदा करून दिल्या.

गोंडराजे

नागपूर हीं राजधानी कायम झाल्यानंतर रघोजीच्या कारकीर्दीची पुढील हकीकत देण्यापूर्वी हें शहर ज्या लोकांनीं वसविलें व ज्यांनीं पहिल्यांदा आपली राजधानी केली त्या गोंड लोकांचा अल्पपरिचय करून देणें अवश्य आहे.

वसतिस्थान

गोंडवनांत गोंडांची वसाहत होण्यापूर्वी दुसऱ्या लोकांचीं राज्यें होतीं. त्यांच्या इमारतींचे अवशेष जबलपूर जिल्ह्यांत नर्मदेच्या काठीं, कांहीं छत्तीसगडांत आणि बस्तरच्या जंगलांत आहेत. ज्यांस हल्लीं गोंडवन म्हणतात त्यांतील बहुतेक प्रदेशाचा समावेश हल्लींच्या मध्यप्रदेशांत होतो. गोंडांची वसती बहुधा विंध्याद्री व सातपुडा डोंगरावर आणि त्याच्या पायथ्याशीं आहे. हिंदुस्थानांत प्राचीन-काळीं जे लोक डोंगराळ मुलखांत रहात होते त्यांत गोंड प्रमुखत्वें-करून होते. गोंडांच्या भाषेस संस्कृत अथवा दुसऱ्या प्राचीन भाषांचा आधार नसून ती स्वतंत्र आहे. तथापि त्यांचा हिंदु आणि मुसलमान लोकांशीं निकट संबंध आल्यापासून गोंडीभाषेंत संस्कृत, मराठी, उर्दू, तेलंगी, आणि इतर अर्वाचीन भाषांतील शब्द मिसळले आहेत. कित्येक गोंडांनीं हिंदु आणि मुसलमानी धर्मांतील कांहीं रीतिभाति घेतल्या आहेत.

राहणी.

जंगलांत राहत असल्यामुळें यांची राहणी अत्यंत सरळ होती. शेतीवर फार थोडयांचा उदरनिर्वाह होत असे. बहुतेक लोक

कंदमुळें, रानांतील फळफळावळ, भाजीपाला, खाण्याचे उपयोगांत आणीत. रानटी व पाळीव जनावरांचा भक्ष्य वस्तूंत मुख्यत्वेंकरून समावेश होई. या लोकांचें वस्त्रप्रावर्ण बेताचेंच असे. नैसर्गिक वस्तूंचे ते दागिने घालीत असत. यांचीं हत्यारें धनुष्य, बाण, भाला, कुऱ्हाड, तरवार इत्यादि असून खाद्य व हिंस्र पशूंची शिकार करण्यांत ते फार कुशल आहेत. त्यांचा स्वभाव साधाभोळा असल्यामुळें परक्या लोकांना कपट, विश्वासघात, हुशारी यांच्या साहाय्यानें यांचेवर लौकरच ताबा करितां येतो. मोहाची दारू काढून हे चैनीत रहात असत. यांच्यामध्यें वसति करून राहिलेले हिंदु लोक शेती व व्यापार करून सुखानें निर्वाह करीत होते. प्रत्येक कुटुंबाचा नेता आपल्या प्राप्तीवर सर्व परिवाराचें पालनपोषण करूं शकत असे.

हल्लींच्या गोंडांत मुख्य तीन जाती आहेत. पहिली जात प्राचीन गोंड, दुसरी राजपूत अथवा हिंदू गोंड, आणि तिसरी मुसलमान गोंड. त्यांच्या शारीरिक रचनेंत रीतीभातींत वगैरे अद्यापि म्हणण्यासारखा फरक पडला नाहीं. गोंडांचा आणि राजपुतांचा शरीरसंबंध होऊन त्यांपासून जी प्रजा उत्पन्न झाली त्या प्रजेस राजपूत अथवा राजगोंड असें ह्मणतात. ज्या गोंडांनीं मुसलमानी धर्माचा स्वीकार केला ते मुसलमानी गोंड होत. त्यांच्या लग्नकार्यांत अद्यापि गोंडी क्षत्रिय आणि मुसलमानी अशा दोन्ही धर्मांचे विधी केले जातात.

धर्म

गोंडांचा धर्म सृष्टिपूजेचा आहे. ते लोक मोठ्या देवाची पूजा करीत व गाय, बैल म्हैशी इत्यादि जनावरांचा बळी देत.

राजगोंडांची राहणी हिंदूसारखी झाली असून त्यांपैकीं कांहीं स्वतःस रजपूत गोंड ह्मणूं लागले आहेत. यांनीं मूळ गोंडांशीं आपला संबंध कायमचा तोडून टाकला आहे. हिंदूंनीं यांना इतकी मदत केली आहे कीं, यांचे उपनयन विधीही करूं लागले आहेत. असें ह्मणतात कीं, रजपूत गोंडांचे मूळपुरुष जादोराय क्षत्रियानें गोंड राजाचे मुलीशीं लग्न केल्यामुळें ते गोंड म्हणवितात. पण असेंहीं सांगण्यांत येतें कीं, त्यानें गोंड राणी रत्नावलीच्या हातचें अन्नसुद्धां ग्रहण केलें नाहीं. जादोराय गढ्यास आला तेव्हां त्यानें क्षत्रिय घराण्याशीं द्वितीय विवाह केला व या संबंधापासून झालेली संतति राज्यास अधिकारी झाली. या प्रकारानें हे लोक राजगोंड ह्मणून सिद्ध झाले आहेत. यांचे आचार विचार हिंदु धर्मानुसार होत आहेत व ते कट्टर सनातनी बनले आहेत अद्यापि यांचे संबंध क्षत्रियांशीं होत असतात.

राज्यपद्धति.

गोंडी राजसभेंत एक दिवाण पुरोहित व एक कवि राहात असे. दिवाण अंतर्गत व्यवस्था पहात असे. पुरोहितास धार्मिक कार्याशिवाय मुख्य प्रधानाचें काम करावें लागे. सैन्याची व्यवस्था राजाकडे असून तो स्वतः युद्धांत हजर होत असे. राज्याचा पुष्कळसा भाग जहागिरदारांत विभागिला होता. जरुर पडेल त्या वेळीं ठरलेल्या शिपायानिशीं जहागिरदार लोक राजास मदत करीत. या सदोष पद्धतीमुळें कधीं कधीं हे हाताखालचे लोक स्वतंत्र होऊन जात. राजाची प्रशंसा करणें हें राजकवीचें आद्य कर्तव्य होतें. लिहिण्याचें काम विशेषेंकरून ब्राह्मण कायस्थ जात करीत असे. त्यांस वंशपरंपरेनें राजदरबारांतील मानसन्मान मिळत असे.

गोंडीराज्यें.

उत्तरेकडे मंडला व मठा येथें गोंडांचीं राज्यें होतीं व नर्मदा नदीच्या कांठून गोंडांची वसती होती. मध्यप्रदेशांत देवगड येथें एक गोंडांचें राज्य होतें. हें राज्य प्राचीनकाळीं मोठ्या भरभराटीस आलें होतें. देवगड आतां अगदीं मोडकळीस आलेलें असून तेथें आतां प्राचीन राजधानीचीं चिन्हें किल्ला, परकोट, तळें, विहिरी, महाल व इमारतींचे व देवळाचे अवशेष दिसत आहेत. नागपूर हें खेडें होतें त्या वेळीं देवगड भरभराटींत होतें. बैतुल जिल्ह्यांत खेरला येथेंही गोंडांचें राज्य होतें. तसेंच दक्षिणेंत चांदा (चंद्रपूर) येथेंही गोंडांचें राज्य होतें. हीं गोंडांचीं राज्यें मोंगल बादशाहीच्या पूर्वीं वसलेलीं होतीं. त्या वेळचे गोंड स्वतंत्र आणि शूर होते. ते सुधारलेले नसून त्यांस कलाकौशल्य अवगत नव्हतें तरी मंडला, देवगड, खेरला, चांदा आणि बस्तर येथील जुन्या इमारतींकडे पाहतां त्यांनीं आपली बरीच सुधारणा करून घेतली होती असें दिसतें. मुसलमानांनीं दक्षिणेंत प्रवेश करतांच गोंड राजांस जिंकून अंकित केलें. याच संधीस कित्येक गोंडराजांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला. दक्षिणेंत वरंगळ येथें राजपूत गोंडांचें एक संस्थान होतें तेंही मुसलमानांनीं नाहींसें केलें.

नागपूर आणि त्याचे आसपासचा प्रदेश ह्यांचा समावेश प्राचीनकाळीं गोंडवनांत होत होता. इ. स. च्या सोळाव्या शतकांत देवगड येथें गोंड लोकांनीं आपलें राज्य स्थापित केलें. देवगड

येथील राजवंशाच्या कनिष्ट शाखेंतील जाटबा नायक राजगोंडानें भिवगडच्या टेंकडीवर एक किल्ला बांधला व तेथें राहून त्यानें छिंदवाडा आणि नागपूर या प्रदेशांत आपला अंमल बसविला. जाटबा व त्याच्या वंशजांनीं ह्या प्रांतांत पुष्कळ किल्ले बांधले होते ते आतां मोडकळीस आलेले आहेत. जाटबाच्या नंतर कित्येक पिढ्यांनीं बख्तबुलंद नामक गोंड राजानें देवगडचें राज्य मोठ्या भरभराटीस आणिलें. तो मोठा शूर होता. त्यानें आसपासच्या राजांबरोबर लढून आपलें राज्य वाढविलें. त्यानें दिल्लीचा बादशहा औरंगजेब याजशीं राजकारण लढवून तेथील दरबारांत आपला प्रवेश केला. औरंगजेबानें त्यास मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. हा फार दक्ष राजा होता. यानें प्रजेच्या हिताच्या पुष्कळ गोष्टी केल्या. दूर दूर ठिकाणाहून यानें उत्तम कारागीर आणून त्यांची राज्यांत वसाहत केली. शेतकऱ्यांस उत्तेजन देऊन पडीत जमिनींची लागवड करविली. ह्याच बख्तबुलंदानें नागपूर शहर वसविलें व त्याचा वंशज चांदसुलतान ह्यानें ह्या शहरा सभोंवार परकोट बांधून त्याची सुधारणा केली व हें शहर त्यानें आपली राजधानी केलें. चांद सुलतान इ. स. १७३९ त वारला. बख्तबुलंद याचा दासीपुत्र वलीशाह यानें चांद सुल्तानाचें राज्य बळकाविलें. चांद सुलतानाच्या विधवेनें रघोजी भोंसले यांस वऱ्हाडातून आपले मदतीस बोलाविलें. चांद सुलतानास बुऱ्हाणशाह व अकबरशाह असे दोन पुत्र होते. रघोजीची आणि वलीशाहाची लढाई होऊन तींत वलीशाह मारला गेला आणि बुऱ्हाणशहा व अकबरशहा आपल्या बापाच्या गादीवर बसले. नंतर रघोजी वऱ्हाडांत परत गेला. थोड्याच दिवसांत ह्या दोघा भावांत

कलह उद्भवला व परस्परांत लढाया होऊं लागल्या.

इ. स. १७४३ त बुऱ्हाणशहानें रघोजीस पुनः आपल्या मदतीस बोलाविलें. व त्याच्या मदतीनें त्यानें अकबरशहाचा पराभव केला. अकबरशहा नागपुराहून हैद्राबादेकडे पळून गेला. व तेथें त्यास कोणी विषप्रयोग केल्यामुळें तो मरण पावला. या वेळीं रघोजी वऱ्हाडांत परत न जातां नागपुरांतच राहिला व बुऱ्हाणशहाचा सर्व राज्यकारभार करूं लागला. बुऱ्हाणशहा फक्त नांवाचा राजा राहिला. रघोजीनें जरी त्याचें राज्य बळकाविलें तरी त्याची सर्व राजचिन्हें कायम ठेवून त्याच्या निर्वाहार्थ राज्याचें कांहीं उत्पन्न लावून दिलें. राजा ही पदवी बुऱ्हाणशहाच्या वंशजास अद्यापही आहे. पेशव्यांनीं सातारच्या राजांस जसें नांवाचें राजे करून ठेविलें होतें तीच अवस्था नागपूरच्या गोंडराजांची केली. भोंसल्यांच्या वंशांत नवीन राजास गादीवर बसवावयाचा समारंभ करावयाच्या वेळीं अथवा कांहीं महत्वाच्या प्रसंगीं तो समारंभ गोंड राजांच्या हातानें करविला जात असे. म्हणजे नवीन राजास गोंडराजाच्या हातून तिलक लावून राज्यधिकाराचीं चिन्हें व पोशाख दिले जात असत. राज्य बळकाविल्याचा आरोप आपणांवर येऊं नये व लोकांनीं आपणास जुलमी म्हणून दोष देऊं नये या हेतूनें रघोजीनें ही युक्ति केली होती. गोंडराजांस नामधारी राजे ठेवण्यांत रघोजीचा एक मतलब असावा. त्यावेळीं मराठशाहींत जे मांडलिक संस्थानिक होते ते सर्व पेशव्यांचे आश्रित असून, हें संस्थान आपण स्वतः संपादन केलें आहे असें दाखविण्यांतही रघोजीचा हेतू असावा.

कर्नाटकावरील स्वारी.

शाहू छत्रपतींनीं आठ सुभ्यांची सनद सेनासाहेबांस दिल्यावर रघूजीराजे यांचा अंमल नागपुराहून सुरू झाला. यावेळीं कर्नाटकामध्यें बरीच गडबड चाललेली होती, कर्नाटकाचा बहुतेक भाग मुसलमान अंमलाखालीं होता. अर्काट, शिरें, कडाया, कर्नूल व सावनूर येथील नबाब सामर्थ्यवान होते. त्रिचनापल्ली व तंजावर येथें स्वतंत्र हिंदू राज्यें होतीं. इ० स० १७३६ मध्यें त्रिचनापल्लीचा राजा मरण पावला. त्याच्या वारसांत तंटे उद्भवले. मयताची राणी एका पक्षास होती. तीस मदत करण्यासाठीं नबाब दोस्तअल्लीनें आपला जांवई चंदासाहेब यास त्रिचनापल्लीस पाठविलें. चंदासाहेबानें राणी व इतर वारस यांस बाजूस ठेवून आपण त्रिचनापल्ली बळकाविली; व फ्रेंचांचें आपणांस सहाय्य मिळावें ह्मणून, तंजावरच्या राजाच्या ताब्यांतील कारिकल हें बंदर फ्रेंचांस मिळवून दिलें. यावेळीं तंजावरच्या राज्यामध्येंहि रण माजलें होतें. छत्रपतींचे बंधु व्यंकोजीराजे मरण पावून त्यांचा मुलगा तुकोजी हाहि इ. स. १७३८ त निवर्तला. त्यास बाबासाहेब व शाहुजी असे दोन औरस पुत्र असून, प्रतापसिंग या नांवाचा एक अनौरस पुत्र होता. तुकोजीच्या पश्चात् बाबासाहेब गादीवर बसला. पण तो लौकच मरण पावला. त्यास संतति नसल्यामुळें शाहुजी गादीवर बसला. पण सर्व सत्ता सय्यदखान या नांवाच्या लष्करी अधिकाऱ्याच्या स्वाधीन होती. ह्या सय्यदखानानें सिधोजी नांवाच्या

सऱ्याच एका इसमास गादीवर बसविलें. यामुळें शाहुजीनें फ्रेंचांची मदत मागितली. त्यांनीं कारिकल बंदर, करकनगढी किल्ला व कांहीं गांवें देण्याचें कबूल करवून घेऊन आपली फौज कारिकलवर पाठविली. इकडे शाहुजीनें सय्यदखानासच वश करून गादी मिळविली, व फ्रेंचांस तोंडघशीं पाडिलें. तेव्हां हातची शिकार गेलेली पाहून फ्रेंचांस वाईट वाटलें. उलटपक्षीं शाहुजीशीं उघडपणें लढण्यास त्यांस धाडस होईना. इकडे चंदासाहेबास फ्रेंचांस खुष करण्याची ही संधि आयतीच सांपडली. त्यानें आपण होऊन कारिकल जिंकून फ्रेंचांचे ताब्यांत देण्यासाठीं कारिकलावर फौज पाठविली. तेव्हां शाहुजीनें कारिकलच्या बचावासाठीं आपली फौज रवाना केली. तिकडून फ्रेंचांची फौज आली; व तिनें कारिकल जिंकिलें. तेव्हां निरुपाय होऊन पाहिला करार पाळण्यांत आला. पण इतक्यांत त्याची गादी जाऊन, प्रतापसिंह गादीवर आला; आणि त्यानें चिदंबरचा करार पार पाडिला.

आपल्या भाऊबंदांस झालेल्या त्रासामधून मुक्त करण्यासाठीं शाहू छत्रपतींनीं रघूजीराजे व फत्तेसिंग राजे भोंसले यांस कर्नाटकच्या स्वारीवर जाण्यास आज्ञा केली. तेव्हां रघूजी राजे वऱ्हाडांत आले; व त्यांनीं आपल्या प्रांतांचा बंदोबस्त करून समागमें सरदार रघूजी करांडे, कृष्णाजी आटोळे, नऱ्होजी जाचक, शिवाजी केशव टाळकुटे यांसह पन्नासहजार फौज घेऊन हैदराबादचे जिल्ह्यांतून निघाले; व तंजावर मुक्कामीं इ. स. १७३२ मध्यें फत्तेसिंग राजे भोंसले यांस सामील झाले. रघुजी भोंसल्यांनीं दोस्तअल्लीबरोबर लढून त्यास व त्याचा मुलगा हसनअल्ली यास रणांगणावर ठार मारलें. त्याचा दिवाण

मीर आसद यास कैद केलें; लढाईंत मोठमोठे अधिकारी कामास आले. ही लढाई दमलचरीच्या खिंडींत ता० २० मे सन १७३९ मध्यें झाली. ह्या लढाईचा परिणाम कर्नाटक प्रांतीं फारच भयंकर झाला; व रघूजी राजांच्या पराक्रमाची सर्वांस दहशत बसली. + मराठ्यांनीं सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केलें. त्यांजपुढें आतां कोणाचा टिकाव लागत नाहीं, असें लोकांस वाटूं लागलें. सफदरअल्ली वेलोरच्या किल्ल्यांत पळाला. चंदासाहेबानें आपलें जडजवाहीर पांदेचरीस पाठविलें. पांदेचरीचा फ्रेंच गव्हर्नर डुमास यास धास्ती वाटूं लागली.

इतक्यांत मराठ्यांनीं अर्काट घेतलें. पण नबाबाची सर्व संपत्ति व कबिला पांदेचरीस गेल्याचें समजतांच रघूजीराजांस मनस्वी क्रोध आला. याचवेळीं नबाब दोस्तअल्लीचा कारभारी मीर आसद जो रघूजी राजांच्या ताब्यांत होता—त्यानें आपल्या मालकाच्या वतीनें रघुजी राजांशीं सल्लयाचें बोलणें लाविलें. तें रघुजी राजांनीं मान्य करून त्यास बंधमुक्त केलें; आणि त्याच्या मध्यस्तीनें सफदरअल्लीशीं तह केला. (आगष्ट स० १७४०) त्यांतील आशय येणेंप्रमाणें—सफदरअल्लीस मराठ्यांनीं कर्नाटकचा नबाब ह्मणून कबूल करावा. त्यानें मराठ्यांस एक कोट रुपये हप्त्याहप्त्यानें द्यावे; चंदासाहेबास हांकून देण्यासाठीं मराठ्यांस आपल्या फौजेचें साह्य द्यावें. आणि पूर्व किनाऱ्यावरील हिंदु राजांचे जे मुलुख इ. स. १७३६ नंतर इतरांनीं बळकाविले असतील ते ज्याचे त्यास परत करावे.

+ ब्रिटिश रियासत पृष्ठ ४७२.

चंदासाहेबाचे दौलतीस व कुटुंबास फ्रेंचांनीं आश्रय दिल्या-वरून रघूजीराजे संतप्त झाले होते. त्यांनीं फ्रेंच गव्हर्नरांस एक पत्र पाठविलें. तें पत्र पाहतांच, त्यावेळीं मराठे किती सामर्थ्यवान होते व त्यांचा पाश्चिमात्य लोकांवर किती दरारा होता हें स्पष्टपणें निदर्श-नास येईल. पत्राचा सारांश खालीलप्रमाणें:—

" आमच्या महाराजांनीं तुह्मांस पांदिचरी येथें राहण्याची परवानगी दिली, त्यास ४० वर्षें होऊन गेलीं. हल्लीं आमची फौज ह्या बाजूस आली असतांही तुह्मांकडून कांहींच मजकूर कळला नाहीं. तुह्मीं आमच्या दोस्तीस पात्र आहां; आपला शब्द कधीं मोडणार नाहीं, व आपले करार बरोबर पाळाल, अशी आमची खात्री होती. म्हणूनच त्यांनीं तुम्हांस हा मुलुख राहण्यास दिला. याबद्दल दरसाल खंडणी देण्याचें तुम्हीं कबूल केलें असून, अद्याप पावेतों कांहींच भरणा केला नाहीं. शेवटीं महाराजांस आपली फौज ह्या बाजूस पाठविणें भाग पडलें. इकडचे मुसलमान लोक गर्वानें फुगून गेले होते. त्यांचा चांगलाच समाचार ह्या फौजेनें घेतला आहे, हें वर्तमान तुम्हांस कळलेंच असेल; आम्हीं कळविण्याची जरूर नाहीं. हल्लीं जिंजी व त्रिचनापल्ली हे किल्ले घेऊन त्यांचा बंदोबस्त करावा असा महाराजांचा आम्हांस हुकूम आहे. हा हुकूम अंमलांत आणणें आम्हांस प्राप्त आहे, तुमची वर्तणूक व महाराजांनीं तुम्हांवर केलेली मेहेरबानी लक्षांत आणिली, म्हणजे ही खंडणी तुम्हीं भरीत नाहीं हें योग्य नाहीं. आम्हीं तुम्हांवर मेहेरबानी करितों, आणि तुम्हीं आमच्या विरुद्ध वागतों. तुम्हीं मुसलमानांस आपल्या जागेंत आश्रय दिला हें योग्य आहे काय? शिवाय, त्रिचनापल्ली आणि तंजावर येथील दौलतीच्या

पेट्या, हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे जें कांहीं तेथें हातास लागलें, तें सर्व कुटुंबांतील मुलांमाणसांसुद्धां चंदासाहेबानें पांदिचरीस नेऊन तुमच्या जवळ ठेविलें आहे, ही गोष्ट योग्य आहे काय? तुम्हांस आमच्याशीं दोस्ती ठेवावयाची असेल, तर वरील झाडून सारी दौलत चंदासाहेबाच्या मुलांमाणसांसुद्धां तुम्हीं आमच्या हवालीं करावी. ती ताब्यांत घेण्याकरितां स्वार पाठविले आहेत. तुम्हीं हें न ऐकल्यास, आम्हांस जबरदस्तीनें तें सर्व घ्यावें लागेल; व चाळीस वर्षें न भरलेली खंडणीहि जबरदस्तीनें घेऊं. वसईची काय स्थिती झाली, तें तुम्हीं ऐकलेंच असेल. हल्लीं आमच्याजवळ येथें मोठी फौज असून तिचा खर्च चालला पाहिजे. बऱ्या बोलानें तुम्हीं आमची मागणी कबूल न केल्यास, तुम्हांपासून वसूल कसा करावा हें आम्हीं जाणून आहों. थोड्याच दिवसांत आमचें आरमारहि इकडे येऊन दाखल होणार आहे; म्हणून या प्रकरणाचा निकाल सत्वर झालेला बरा. ह्या पत्रांत मागितल्याप्रमाणें चंदासाहेबाचें कुटुंब व मुलें, तसेंच हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे सर्व ताबडतोब आमच्याकडे पाठवून द्याल अशी आशा आहे."

ह्या पत्रावरून रघूजीराजांचा मुत्सद्दीपणा, धाडस व दरारा स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतो. कर्नाटकामध्यें मुसलमानांनीं जो भयंकर कहर गुदरला होता, त्यास रघूजीराजांच्या स्वारीनें आळा पडला, हिंदुराजांस धैर्य उत्पन्न झालें व मुसलमानांस धडकी भरली; आणि त्यांस सहाय्य करणाऱ्या फ्रेंचांसहि रघूजीराजा आतां काय करतो काय नाहीं! याचा विचारच पडला. रघूजीराजांचें धमकीचें

पत्र जाताच फ्रेंचांचें धाबें दणाणलें. त्यांनीं चंदासाहेबांस आश्रय दिला होताच. आतां त्यास रघूजीराजांच्या स्वाधीन केल्यास आपणांकडे फारच कमीपणा येऊन, पुढें मराठे गेल्यानंतर मुसल्मान त्याचें उट्टें काढल्याशिवाय रहावयाचे नाहींत, कारण फ्रेंचांचें वास्तव्य त्याच लोकांमध्यें असून त्यांजशीं त्यांचा नेहमींचा संबंध होता. त्यामुळें फ्रेंच गव्हर्नरानें कांहीं लीनतेचें, कांहीं दपटशाहीचें, कांहीं मुत्सद्दीपणाचें असें पत्र पाठविलें.

फ्रेंचांस दपटशा देऊन आपला कार्यभाग उरकून घेण्याचा रघूजीराजांचा विचार होता. पण तो साधत नाहीं असें पाहून त्यांनीं एकदम त्रिचनापल्लीस वेढा घातला. मराठ्यांची अवहेलना करणारा जो चंदासाहेब त्यास पादाक्रांत केलें कीं आपलें कार्य झालें, हा विचार करून नेटानें युद्ध आरंभिलें. चंदासाहेबानेंहि निकरानें लढण्याची शिकस्त केली. त्यानें आपला भाऊ बडासाहेब यांस सैन्य घेऊन मदतीस बोलाविलें. तो मदुरा सर करावयास गेला होता. तेथून तो चंदासाहेबाच्या मदतीस येत आहे असें ऐकतांच, रघूजी राजांनीं त्याजवर वीस हजार फौज पाठवून मार्गांतच बडासाहेबास टक्कर दिली. तींत बडासाहेब पडला व त्याचें सैन्य सैरावैरा पळून गेलें. रघूजी राजांनीं बडासाहेबाचें प्रेत मोठ्या समारंभानें चंदासाहेबांकडे पाठवून दिलें. हा त्रिचनापल्लीचा वेढा तीन महिने सुरू होता. शेवटीं ता. २१-३-१७४१ रोजीं चंदासाहेबानें निरुपाय होऊन किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन करून आपणहि स्वाधीन झाला. त्यांनीं चंदासाहेबांस कैद करून साताऱ्यास पाठविलें.

चंदासाहेब स्वाधीन होतांच, रघूजीराजांनीं फ्रेंचांकडे खंडणीचा तगादा सुरू केला. मागील बाकीबद्दल ६० लाख रुपये, पुढें दरसाल खंडणी देण्याचें वचन, व चंदासाहेबाचीं मुलें स्वाधीन करणें, ह्या तीन गोष्टींचीहि मागणी केली. फ्रेंच गव्हर्नर डुमास यानें त्यास दाद दिली नाहीं. त्याबरोबर रघूजीराजांनीं आपली १६००० फौज पूर्व किनाऱ्यावर पाठविली आणि माहीत्वरहि कांहीं सैन्य रवाना केलें. याचवेळीं रघूजीराजांनीं आपला वकील पांदेचरीस पाठविला. त्याचा डुमासनें फारच सत्कार करून रघूजी राजांबरोबर कायमचा स्नेह व्हावा म्हणून विनंति केली; व वकील जातेवेळीं फ्रान्समधील उत्कृष्ट दारूच्या बाटल्या रघूजीराजांस नजर म्हणून पाठविल्या ती दारू रघूजी राजांच्या कुटुंबास इतकी आवडली कीं, त्यांच्या आग्रहावरून आणखी दारूची मागणी त्यांनीं केली. त्याबरोबर डुमासनें आणखी दारूच्या ३० बाटल्या पाठविल्या व सल्ला मसलतीचीं पत्रें रवाना केलीं. अखेरीस ह्या दारूच्या बाटल्यांनीं रघूजीराजे व फ्रेंच यांचा तह होऊन मैत्री + झाली.

पेशवे व भोंसले यांचें वितुष्ट.

ह्याप्रमाणें कर्नाटकामध्यें विजय संपादन करून रघूजी भोंसले सेनासाहेब सुभा यांची स्वारी साताऱ्यास आली. त्यावेळीं बाजीराव पेशवे मरण पावले असून, त्यांच्या जागीं कोणास नेमावें यासंबंधीं चर्चा सुरू होती. रघूजीराजे प्रथमपासूनच बाजीराव पेशव्यांच्या विरुद्ध होते. कर्नाटकामध्यें स्वारीवर जाण्यापूर्वीं रघूजीराजांनीं प्रयागा-

+ सर देसाई कृत ब्रिटिश रियासत पृष्ट ४७८.

पर्यंतचा मुलुख लुटून तेथील सुभेदार सुजाखान यास ठार मारलें होतें. हा रघुजीचा उत्कर्ष बाजीराव बल्लाळ पेशवे यांस सहन झाला नाहीं. म्हणून त्यांनीं आबाजी कावळे यांजला रघूजीराजांचें पारिपत्य करण्यासाठीं फौजेसह रवाना केलें. पण रघूजीराजांनीं त्या फौजेशीं सामना देऊन तिला पळावयास × लाविलें. ह्या प्रकारामुळेंच उभयतांचें सूत नव्हतें. तो डाव मनांत ठेवून रघूजी भोंसल्यांनीं पेशवाईचें पद बाजीराव बल्लाळ यांचे पुत्र बाळाजी बाजीराव यांस न देतां बाबूजी नाईक बारामतीकर यांस द्यावें ह्मणून खटपट चालविली पण त्यांच्या ह्या खटपटींस यश आलें नाहीं.

१ रघूजींची सेनासाहेब सुभा अशी नेमणूक झाल्यावर बाजीराव पेशव्यांशीं त्यांची तेढ उत्पन्न झाली. इ. स. १७३८ सालीं बाजीरावास निजामाशीं झुंज द्यावी लागली तेव्हां त्यानें रघूजीस मदतीस बोलाविलें. वऱ्हाडावर स्वारी होण्याचा संभव आहे या सबबीवर रघूजींनीं मदतीस जाण्याचें नाकारलें. पेशव्यानें लिहिलें, विनंति केली, धमकी पण दिली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. जेव्हां भोपाळ येथें निजामाशीं निकराची लढाई झाली तेव्हा रघूजींनीं संधि साधून नर्मदेच्या पलीकडे अलाहाबादपर्यंत मोहीम चालविली व तेथील सुभेदार सुजाखान यांस ठार करून पुष्कळ लूट आणिली. या अनाधिकारी कृत्यानें बाजीरावास राग आला व त्यानें निजामास जिंकल्यावर रघोजीस जेरीस आणण्याचें योजिलें.

× नागपूरके भोंसले पृष्ठ १२.

1 विल्सचा नागपुरचा १८ व्या शतकांतील इतिहास.

वऱ्हाडांत एक लुटारु टोळी धाडण्यांत आली; परंतु तिचा पराभव झाला. इतक्यांत नादिरशहानें दिल्लीवर चाल केल्याची बातमी येतांच बाजीरावानें हा नाद सोडून दिला. यासंबंधीं ग्रँटडफ म्हणतो.

"१ ब्राम्हणी वर्चस्वाचा मत्सर वाटून रघूजीनें साताऱ्च्या शाहू राजांस आपल्या ताब्यांत आणून क्रांति घडवून आणण्याचा विचार केला, किंवा शाहू राजांस संमति नसल्यामुळें त्यांचा दत्तक बनून मराठी राज्य संपादण्याच विचार त्याचे मनांत आला असावा. अशी योजना अंमलांत आणण्यासाठीं रघूजीस पुष्कळ संकटांस तोंड द्यावें लागलें, कारण पेशव्यांचा विरुद्धपक्ष अस्तित्वांत होता, तरी पण बाजीरावाचे मित्र व आश्रित हे सदोदित राजासंनिध राहत असत. त्यांचेवर राजाचा विश्वास मात्र नव्हता. तसेंच रघूजी किंवा दमाजी गायकवाड यांचा ब्राम्हणाशिवाय कोणताहि व्यवहार चालत नसे. रघूजीनें ठरल्याप्रमाणें बाजीरावास मदत न करतां अलाहाबाद प्रांत लुटल्यामुळें उभयतांत बेबनाव झाला होता. पेशव्यांचें म्हणणें कीं, नर्मदेच्या उत्तरेस खंडणी घेण्याचा अधिकार रघूजीस नाहीं. म्हणून त्यानें १७३८ सालचे अखेरीस रघूजीस ताळ्यावर आणण्याचा निश्चय जाहीर केला. इराणी लोक दिल्लीस आल्यावर तात्पुरती तडजोड झाली; परंतु त्यांचा लढा अखेर तसाच राहिला. व स्वहितनाश होईल या भीतीनें ते उघड लढाई करूं शकले नाहींत. याचा परिणाम असा झाला कीं योजना अस्तित्वांत आल्या व मराठा साम्राज्य वाढीस लागलें पण त्याची सत्ता

---

१ विल्सचा नागपूरचा अठराव्या शतकांतील इतिहास

चिरस्थायी झाली नाहीं. दुर्दैवानें या गोष्टीबद्दल पुरावा सांपडत नाहीं, पण बाजीराव व रघूजी यांची भेट होऊन ते पुनः मिळाले हें खास. "

× इसवी सन १७४० मध्यें बाजीराव निवर्तल्यावर पेशवे-पदासाठीं रघूजींनीं दुसरा उमेदवार उभा केला होता; परंतु त्यास यश न येतां बाजीरावाचा मुलगा बाळाजी हाच विजयी झाला. रघूजीनें या ऐवजीं लष्करी विजय संपादन केले. लगतच्या देवगड येथील राजगोंड संस्थानांत त्यांनीं हात घातला होता व त्या पलीकडे कटकपर्यंत स्वारी केली होती. अलाहाबादेवर स्वारी झाली तेव्हांच गढा मंडल्याचें स्वामित्व त्यांजकडे आलें. कर्नाटकावर एक मोठी मोहिम चालविली व दिवाण भास्करपंत यांनीं छत्तीसगढचें राज्य घेतलें व बहार प्रांतावर स्वारी केली. सातारच्या नामधारी राजा-पासून बाळाजीनें नर्मदेच्या उत्तरेस कर वसूली व खंडणीचा हक्क संपादिला होता. रघुजी कर्नाटकांत व भास्करपंत बहार प्रांतांत असल्याची संधि साधून बाळाजीनें गढामंडल्याचें राज्य बळकाविलें. हा प्रांत भोंसल्यांचे राज्याचे मध्यभागीं असल्यामुळें रघूजींनीं दीर्घ परिश्रम घेऊन त्यावर पुनः अंमल बसविला.

पेशव्यानें रघूजीच्या पूर्वेकडील स्वारीस अडथळा आणला. बंगाल, बहार ओरीसा येथील नबाब अलीवर्दीखान यानें भास्कर-पंताचा पराजय केला. माळव्याची सुभेदारी देण्याचें कबूल करून बादशहानें बाळाजीस आपल्याकडे ओढलें. बाळाजीनें मुर्शिदाबादेस

× विल्सचा नागपूरचा अठराव्या शतकांतील इतिहास पृष्ठ ११

कुच केलें व बंगाल्यांत रघूजी आल्यावर त्यास पराजित करून वऱ्हाडप्रांताकडे परतविलें. रघूजी झपाट्यानें परतल्यामुळें बाळाजीच्या मनांत दहशत बसली. आपण दूर असल्यामुळें रघोजी गायकवाडाशीं संगनमत करील अशी त्याला भीति वाटली. रघूजीस तोंड द्यावें किंवा बंगालप्रांत स्वाधीन करावा या शिवाय उपाय नव्हता. सन १७४४ मध्यें बाळाजी व रघूजी यांच्यामध्यें गुप्त तह झाला रघोजीकडे बंगालप्रांत रहावा व दोघांनींहीं परस्परांच्या कारभारांत ढवळाढवळ करूं नये असें ठरलें. वऱ्हाडपासून कटकपर्यंत व लखनौ, पाटणा, दक्षिण बंगाल व बहार या प्रांतापासून खंडणी वसूल करण्याचा अधिकार रघूजींकडे देण्यांत आला. व पेशव्यांच्या राज्याची दक्षिण व पूर्व सीमा नर्मदा, सोन व गंगानदी पर्यंत ठरविण्यांत आली.

दत्तकासंबंधी खटपट.

इ० स० १७४५ मध्यें * देवगडच्या गादीवरील वारशासंबंधीं तंटा उपस्थित झाल्यामुळें बंगाल्यांतून रघूजीस परत यावें लागलें. चांद्याच्या राजाचा यांत संबंध होता. रघूजींनीं हात घालून देवगढ व चांदा हीं दोन्हीं राज्यें ताब्यांत घेतलीं. याच वेळीं रतनपुरचा राजा पदच्युत करण्यांत आला व त्यानंतर आठ दहा वर्षांत सबंध छत्तिसगढ, संबल्पूर हीं राज्येंही हस्तगत केलीं व तेथील राजे मांडलिक झाले. सन १७४९ मध्यें शाहू राजा मरण पावल्यावर रघूजीस सातारा येथें ब्राह्मण पक्षाविरुद्ध क्षत्रिय पुढारी या नात्यानें बोलाविण्यांत आलें. रघोजी तेथें गेल्यानें इष्ट तोच परिणाम झाला. त्याची स्वतःची आकांक्षा वय जास्त झाल्यानें व प्रत्यक्ष मिळालेल्या अनुभवानें खुंटली. रघोजींचा मुलगा मुधोजी यास शाहू महाराजास दत्तक देण्याची खटपट जोरांत चालू होती व जरी मध्यंतरी दुसऱ्या शिवाजीचा मुलगा रामराजा हा थोरले शिवाजी महाराजांचा प्रत्यक्ष वारस असल्याचा शोध लागल्यानें ती फलद्रूप झाली नाहीं तरी पण बाळाजी पेशव्यानें रघूजीस आपलेंसें करून घेतलें. रघूजींकडून नामधारी रामराजाचा गादीवरील वारसा मान्य करवून त्यास पुण्यास रवाना केला व या कामगिरीबद्दल व्हाड गोंडवन व बंगाल या प्रांताच्या त्यास नवीन सनदा दिल्या.

---

* बिलसकृत नागपूरच्या अठराव्या शतकांतील इतिहास पृष्ठ १२

रघूजी बरोबर आलेले मराठे

कर्नाटकावरील स्वारी संपवून श्रीमंत रघूजी राजे भोंसले सेनासाहेब सुभा हे ज्या वेळीं नागपुरास येऊं लागले, त्यावेळीं त्यांनीं आपल्याबरोबर बरेच मराठे आणिले. कारण, मराठ्यांची खरी मर्दुमकी दृष्टोत्पत्तीस येण्यास त्यांस ही लढाई ह्मणजे एक अवर्णनीय लाभच असें ह्मणावयास हरकत नाहीं. कर्नाटकांत जें सैन्य गेलें होतें त्यांत राजाकडील, पेशव्यांकडील, प्रतिनिधीकडील, फत्तेसिंग भोंसल्यांकडील व इतरहि मराठे सरदारांकडील शिपाई गडी होते. त्या सर्वांची मर्दुमकी अनायासेंच रघूजी राजांनीं पाहिली होती. ह्मणून त्यांनीं शौर्यवीर्यसंपन्न मराठ्यांचीं घराणीं बरोबर आणिलीं. प्रथम ज्यावेळीं रघूजीराजे वऱ्हाडांत आले, त्यावेळीं त्यांनीं आपल्याबरोबर कोणती मंडळी आणिली होती त्याचा तपशील या मागें दिला आहे. त्यांपैकीं मराठ्यांचीं घराणीं ह्मणजे बाबाजी घाडगे झुंझारराव, सभाजी शिर्के, जानराव गुजर, नरोजी जाचक, आनंदराव वाघ, त्रिंबकराव कान्होजी मोहिते व इतर ह्या सर्वांचे वंशज आज नागपुरांत व आसपास आहेत. ह्या मंडळीखेरीज कर्नाटकाच्या स्वारीवरून परत येतांना जी शहाण्णव कुळांच्या मराठ्यांचीं घराणीं इकडे आणिलीं त्यांपैकीं कांहीं नांवें खालीं देत आहों.

देहगांव जि० सातारा येथील नाईक निंबाळकर रिसालदार, लिंबुदचे काकडे, बारामतीचे काटे, लोणीचे भापकर, निमसाकरचे रणनवरे, मसूरचे माने, फुलंब्राचे घाडगे, चंदीचंदावरचे भोंसले, सासवडचे जगताप, कोरेगांवचे बर्गे, तरडगांवचे गायकवाड, देऊरचे

कदम, लिंबुटी माहुलीचे जाचक, कुडाळ जिल्हा सातारा येथील दत्ताजी शिंदे व खंडेराव शिंदे, या खेरीज मोहिते, खंडागळे, बागल, जाधव, बाबर, साळुंखे, चोर, खळतकर, चव्हाण, पवार, नलोडे, किरदत, बारवकर, भांडवलकर, खराडे, यादव, शिर्के, काटकर, वीर, जगदळे, घारगे, निकम, पाटोळे, इंगळे, पोळ, पाटणकर, सनस, मानुलकर, देवकर, भोइटे वगैरे आडनांवांची शूरमंडळी राजांबरोबर आली. त्यांनीं बंगालवरील स्वाऱ्यांत अवर्णनीय पराक्रम केलेला आहे. पण दुर्भाग्यानें त्यांच्या स्वतंत्र मर्दुमकीचीं कागदपत्रें अस्तित्वांत नसल्यामुळें नाइलाज आहे. आज ह्या वरील घराण्यांतील वंशज नागपूर, वर्धा, रायपूर, धमतरी, चांदा, भंडारा, जबलपूर, वऱ्हाड, बिलासपूर वगैरे जिल्ह्यांत कोणी मोकासदार, तर कोणी मालगुजार आहेत. कित्येकांस पोलिटिकल पेन्शनेंहि मिळत आहेत. आमच्या माहितीप्रमाणें खळतकर ह्या घराण्यांतील श्री. रा. सा. भाऊसाहेब खळतकर व त्यांचे इतर भाऊबंद नागपूर जिल्ह्यांत आहेत. घाटगे झुंझारराव यांचे वंशज श्री. दाजीसाहेब घाटगे ऑनररी मॅजिस्ट्रेट हेहि नागपूर जिल्ह्यामध्यें आहेत. दत्ताजी शिंदे यांचे पुत्र खंडेराव शिंदे यांचे वंशज श्री. बापुसाहेब शिंदे हे नागपुरास असून ते पोलिटीकल पेन्शनर आहेत. त्यांच्या पूर्वजांकडे मौजा पिपरीनजीक हिंगणघाट हा गांव मोकासाहि होता. देहगांव नाईक निंबाळकर यांचे वंशज नागपूर जिल्ह्यामध्यें असून त्यांचें साताऱ्याकडील जहागिरींचें उत्पन्न त्यांस अद्यापहि मिळत आहे. नरोजी जाचक यांचे वंशज वर्धा जिल्ह्यामध्यें आहेत, गुजर-घराण्यांतील श्रीमंत सरदार 'व्यंकटराव गुजर व श्रीमंत यशवंतराव गुजर हे एका घराण्यांतील दोन शाखांचे वंशज अस्तित्वांत असून

त्यांजकडे बरीच गांवें मोकाशांचीं चालत आहेत. श्री. अहिलोजीराव अहीररावाचें एक प्रमुख घराणें असून त्यांजकडेहि बरींच गांवें चालत आहेत. याखेरीज झेंडेवाले नाईकांचें घराणें, लोणारचें नाईक घराण्याचे वंशज श्रीमंत गणपतराव नाईक मापारी, देशमुखांपैकीं श्रीमंत माणिकराव भोसले वगैरे बरीच घराणीं नागपुरांत आहेत. भोंसल्यांच्या बंगालवराल स्वारीच्या वेळीं जे मराठे स्वारीवर गेले होते, त्यांपैकीं बरींच घराणीं रायपूर जिल्ह्यामधील धमतरी येथें आहेत. जगताप, बाबर, गायकवाड, किरदत वगैरे बऱ्याच घराण्याचे मराठे येथें मालगुजारी गांवें खरेदी करून आहेत. हे मध्यप्रांतामध्यें आलेले मराठे बहुतेक सातारा, पुणें, कर्नाटक, तंजावर वगैरे भागाकडील आहेत. बुलढाणा व वऱ्हाड भागांतील-ही बरींच मराठ्यांची व ब्राह्मणांचीं घराणीं येथें आलेलीं आहेत. ही सर्व मंडळी व राणोजी भोंसले यांचे भाऊ संताजी भोंसले व कान्होजी भोंसले यांसहि महाराजांच्या परवानगीनें रघूजी राजे आपल्याबरोबर * घेऊन आले. सेनासाहेब सुभे साताऱ्याहून निघाले त्यावेळीं शाहू महाराजांनीं त्यांस "सरदेशमुखीचे बाबदीची व मोकाशाची गोंडवण झाडी तहत कटक याची + माफी करून दिली." साताऱ्याहून येतांच रघूजी राजांनीं देवगडच्या राजवंशापैकीं अकबरशहा एलीचपूरच्या नबाबाकडे पळून गेला होता, त्याच्या स्वयंपाक्यास वश करून घेऊन त्यास जेवणांत विष घालून ठार मारविलें. त्यामुळें त्याचा हिस्सा बुऱ्हाणशहानें

---

* नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ ४०.

\+ ,, ,, ,, पृष्ठ ४१.

रघूजी राजांस संतोषानें दिला. नंतर आस्ते आस्ते बुऱ्हाणशहासहि पेन्शन करून दिलें. आणि आपण नागपूरचे राजे झाले.

बंगालची परिस्थिती

रघूजीराजे हे कर्नाटकामध्यें स्वारीवर असतांच त्यांच्या हुकमानें त्यांचे सेनापति भास्करपंत कोल्हटकर समागमें वीस हजार फौज घेऊन स्वारीवर गेले होते. सदर स्वारीचा वृत्तांत सादर करण्यापूर्वीं बंगालच्या परिस्थितीचें थोडक्यांत वर्णन केल्यास तें अप्रयोजक होणार नाहीं.

येथवर आम्हीं रघूजीराजांचें चरित्र कथन केलें आहे. त्यावरून रघूजीराजे भोंसले हे किती महत्वाकांक्षी होते याची सहजच कल्पना होऊं शकते. त्यांच्या पराक्रमाची नुसती सुरुवात देखील इतक्या तडफेनें झालेली आहे कीं, ती सूक्ष्मपणें अवलोकन करणारास आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं.

प्रथम शाहू छत्रपतींची मर्जी सांभाळून त्यांनीं आपलें क्षात्रतेज त्यांच्या नजरेस आणिलें व सेनासाहेब सुभ्याचें पद संपादन केलें. तदनंतर देवगडच्या गोंडराजांचें राज्य अनेक छल, भेद करून मिळविलें. कर्नाटकामध्यें अश्रुतपूर्व पराक्रम करून सर्वांस चकित केलें. इतक्या योग्यतेस पोहोंचतांच त्यांनीं बाजीराव पेशव्यांच्या वंशजांकडे पेशवेपद न जाऊं देण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न साधला असता, तर रघूजीराजांकडे त्यावेळच्या सर्व मराठे

मंडळाचें पुढारीपण सहजच आलें असतें. कारण तो काळच असा होता कीं, ज्या मराठ्याच्या अंगीं अलौकिक धैर्य, कर्तृत्व-शक्ति, उद्योगाची आवड व स्वार्थत्यागपूर्वक कार्य करण्याची धमक असेल तो साहजिकच पुढें येत असे. रघूजीराजांच्या अंगीं हे सर्व गुण होते. म्हणूनच त्यांनीं सर्व मराठ्यांचें पुढारीपण मिळविण्याचा दांडगा प्रयत्न चालविला होता. बाबुजी नाईक बारामतीकर यांस पेशवेपद देण्याचा व्यूह मोडकळीस आलेला पाहून ते धैर्यगलित झाले नाहींत. त्यांनीं दुसरा एक महत्वाचा डाव टाकला. शाहूमहाराजांस पुत्रसंतति नसल्यामुळें त्यांनीं आपणास + दत्तक घ्यावें म्हणूनहि प्रयत्न केला. तोहि फसला. तेव्हां त्यांनीं आपलें सर्व बुद्धिबळ बंगालच्या स्वाऱ्यांकडेच खर्च केलें. व तेथें अचाट पराक्रम करून अगणित संपत्ति मिळविली, आणि मराठ्यांच्या इतिहासामध्यें आपलें नांव अजरामर केलें. असो.

यावेळीं बंगाल प्रांताची स्थिति फारच चमत्कारिक होती. बंगालच्या नबाबाच्या गादीसंबंधानें अनेक झगडे उपस्थित झालेले होते. मोंगल बादशहांचें वर्चस्व झुगारून देऊन जो तो स्वतंत्र होण्याची तयारी करीत होता. औरंगजेबाच्या पश्चात् जे बादशहा सिंहासनावर आले त्यांचा दुबळेपणा पाहून त्यांचेच सुभेदार बादशाही सत्तेस जुमानीनासे झाले. मराठ्यांची उत्तर हिंदुस्थानांतील सत्ता दिवसें दिवस वृद्धिंगत होऊं लागली. दक्षिणच्या

+ कित्येक ठिकाणीं आपल्या पुत्रास दत्तक घेणेबद्दल त्यांनीं प्रयत्न चालविला होता असें आढळतें.

सहा सुभ्यांकडून चौथाई वसूल करण्याची सनद मराठ्यांनीं मिळविली. तसेंच विजापूर, कर्नाटक, हैद्राबाद, तंजावर, त्रिचनापल्ली, गोंडवण, वऱ्हाड वगैरे भागीं मराठ्यांनीं जो मुलुख संपादिला होता त्याचीहि सनद त्यांनीं मिळविली. गुजराथ माळवा आणि इकडील भागीं गायकवाड व कंठाजी कदमबांडे धुमाकूळ घालूं लागले. पेशव्यांनीं माळव्याचा बराच भाग काबीज केला होता. राहतां राहिला बंगालप्रांत. तिकडे रघूजीराजांचा मोर्चा फिरला.

या बंगाल प्रांतांवर पूर्वींपासून पेशव्यांचा डोळा होता. माळवा व बंगाल हे दोन्ही प्रांत आपणांस मिळावे अशी त्यांची इच्छा होती; परंतु रघूजीराजांस छत्रपतीकडून बंगाल प्रांतांत चौथाई वसूल करण्याबद्दलची सनद मिळाल्यामुळें पेशवे थोडावेळ स्तब्ध राहिले. व त्यांनीं माळव्याचें राजकारण शेवटास नेण्याचा कृतसंकल्प करून त्या दृष्टानें प्रयत्न आरंभिला. रघूजीराजांस पेशव्यांचा डोळा बंगालप्रांतावर आहे याची पूर्वींपासूनच माहिती होती. म्हणून त्यांनीं होतां होईल तितक्या त्वरेनें बंगालचें राजकारण शेवटास नेण्याचा कृतसंकल्प करून कर्नाटकच्या स्वारीवर असल्या वेळींच आपले सेनापति भास्करराम यांस बंगाल प्रांतावर स्वारी करण्यास हुकूम सोडला; व त्या हुकमाप्रमाणें भास्करपंत वीस हजार स्वार घेऊन निघाले.

भास्करपंत व नबाब अलीवर्दीखान

भास्करपंताच्या स्वारीच्या वेळीं बंगालचा सुभा अलिवर्दीखान हा होता. तो प्रथम बंगालचा नवाब सरफराजखान याजकडे स्वाराच्या एका तुकडीवर होता. आस्ते आस्ते त्यानें सेनापतीचें पद मिळविलें, व शेवटीं बहार प्रांताचा सुभेदारी प्राप्त होतांच त्यानें आपला धनी जो सरफराजखान त्याशीं खुसपट काढून लढाईचा प्रसंग आणिला, व त्या लढाईंत सरफराजखानास मारून बंगालच्या नबाबाची गादी मिळविली. नंतर त्यानें मुर्शीदकुलीखान नांवाचा सुजाउद्दीनाचा जांवई ओरिसा प्रांताचा सुभेदार होता त्याला तेथून हांकून दिलें. अशा प्रकारें अलीवर्दीखानानें बंगाल, बहार व ओरिसा या तिन्ही प्रांताची सुभेदारी मिळविली. ज्यावेळां अलिवर्दीखानानें ओरिसा प्रांताच्या सुभेदारास हांकून लाविलें त्यावेळीं त्या सुभेदाराचा दिवाण मीर हबीब हाहि भयानें पळून गेला होता. थोडेसें स्थिरस्थावर होतांच तो अलीवर्दीखानाकडे आला; व त्यानें त्यास चाकरीसहि ठेविलें. पण मीर हबाब अलिवर्दीखानाचा मनापासून द्वेष करीत असे. तोच ह्या रघूजीराजांच्या बंगालच्या स्वारीच्या मुळाशीं होता. त्यानें गुप्त पत्रव्यवहार करून रघूजीस बंगाल प्रांतांतील संपत्तीची लालुच दाखवून स्वारी करण्यास उत्तेजन दिलें.

रघूजी भोंसले कर्नाटकाच्या स्वारींत असतां (मार्च १७४१) त्याचा सेनापति भास्करराम वऱ्हाडांत होता, त्याच्याशीं मीर

हबीबनें कारस्थान करून उरसा प्रांत परत घेण्यासाठीं त्याची मदत मिळविली. त्या सालच्या पावसाळ्यांत रघूजी साताऱ्यास छत्रपतीची रजा घेऊन नागपुरास आल्यावर, त्याच्या संमतीनें भास्कररामानें उरसावर स्वारी करण्याची कामगिरी स्वीकारिली.

ओरिसा प्रांत हस्तगत करून नबाबानें तेथील सुभेदारीवर आपला जांवई सैयद अहमदखान याची नेमणूक केली. पण तो प्रजेस फारच त्रास देऊं लागल्यामुळें त्यानें त्यास कैद केलें. व तेथें कांहीं दिवस स्वतः राहून प्रांताचा बंदोबस्त केला. यावेळीं त्यास बराच त्रास सहन करावा लागला. कित्येक ग्रंथकार असें लिहितात कीं, ओरिसा प्रांतावर स्वारी करावयास ज्यावेळीं नबाब निघाला त्यावेळीं त्यानें २५ हजार सैन्य बरोबर नेलें होतें. पण तेथें शांतता स्थापित झाल्यावर त्यानें २० हजार सैन्य मुर्शिदाबादेस पाठविलें व आपणांबरोबर फक्त ५ हजार सैन्य ठेविलें होतें. त्या सैन्यासह नबाब आस्ते आस्ते मुर्शिदाबादेकडे जात असतां मिदिनीपुरीं त्याचा तळ होता. तेथें त्यास दुतांना बातमी दिली कीं, "पंचकोट पर्वताच्या खिंडींतून रघूजी भोंसल्याचे वीस हजार स्वार भास्करराम पंडिताच्या आधिपत्याखालीं चौथाईचा हक्क वसूल करण्यासाठीं येत आहेत." हें वर्तमान ऐकून तो अंतःकरणीं भयभीत झाला. पण त्यानें आपल्या माणसांस तसें दाखविलें नाहीं. उलट "कायरे, कोठें आहेत तुझे ते काफर? जेथें त्यांची खोड आह्मांला मोडतां येणार नाहीं, असें स्थान पृथ्वीवर कोठें असल्यास सांग" असें विनोदात्मक उद्गार काढूं लागला.

त्यानें ताबडतोब आपला तळ मेदिनीपुराहून बर्द्वानकडे हालविला. पण मराठे अती धूर्त होते. बर्द्वान हें मोठं शहर असल्यामुळें तो तेथें आलाच पाहिजे अशी त्यांनीं अटकळ करून नबाब येण्यापूर्वीं तेथें जाऊन, लूट केली; व ते एका बाजूस तळ देऊन स्वस्थ बसले. नबाब येतांच तोहि दुसऱ्या बाजूस थांबला. व आपल्या मदतीसाठीं त्यानें पत्रें देऊन जासूद रवाना केले. मराठ्यांनीं नबाबावर ताबडतोब हल्ला केला नाहीं. प्रथम "दहालक्ष रुपये चौथाईची बाकी" पाठवा ह्मणजे आम्हीं चालते होऊं ह्मणून निरोप दिला. पण नबाब मदतीच्या आशेनें स्वस्थ बसला होता. त्यानें मराठ्यांची ही मागणी नाकारली. त्याबरोबर लढाईस सुरवात झाली. मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या लढाईशीं नबाब अपरिचित होता. त्यामुळें मराठे केव्हां भ्याल्यासारखें दाखवून पळत, व पुनः उलट खाऊन लढत. त्याचा अर्थ त्यानें असा केला कीं, मराठे आपणांस भिऊन आहेत; तेव्हां त्यांजवर एकाएकीं हल्ला करण्यास हरकत नाहीं. असा निश्चय करून दुसरे दिवशीं पहाटे छापा घालण्याचा त्यानें बेत केला. पण त्यापूर्वींच मराठ्यांनीं नबाबाच्या सैन्यावर हल्ला करून त्याची दुर्दशा उडविली. नबाब पळून बर्द्वानच्या रस्त्याला लागला. ह्या लढाईंत नबाबाचें सर्व सामान व मुबलक लूट मराठ्यांस मिळाली. त्या रात्रीं नबाबानें वाटेंतच मुक्काम केला, पण त्यांस एखादा डेरा किंवा तंबूहि मिळाला नाहीं; त्यास थंडी वाऱ्यांत कुडकुडावें लागलें.

दुसऱ्या दिवशीं नबाबानें मीर खैरउल्ला नांवाचा एक सरदार व बर्द्वानचा राजा यांस भास्करपंडितांकडे वकील म्हणून

पाठविलें; व दहा लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. त्यावर भास्करपंडितानें निरोप पाठविला कीं, "आम्हीं प्रथमच दहा लक्ष रुपये घेऊन मुकाट्यानें जाऊं पहात होतों पण आपण तें ऐकिलें नाहीं. आतां आपला कोंडमारा होऊन रसद बंद झाल्यामुळें पेचांत सांपडल्यावर दहा लक्ष रुपये द्यावयास तयार झालां तरी आतां दहा लक्षाची गोष्ट विसरा. एक कोट रुपये व जवळचे सर्व हत्ती पाठवा, ह्मणजे आम्हीं येथें क्षणभरहि थांबत नाहीं."

ही गोष्ट नबाबास पटली नाहीं. त्यानें मुस्तफाखान नांवाच्या आपल्या एका अफगाण सरदाराची गोड भाषणानें स्तुति केली, व आपल्या सहाय्यार्थ अफगाण लोकांसह मनापासून झटण्याबद्दल त्यास विनंति केली. हा मुस्तफा नबाबाचा द्वेष करीत असे, त्यामुळें त्यास त्याच्या अफगाण सैन्याचें पाहिजे तसें साहाय्य होत नसे. ह्मणून केवळ मतलब साधण्यासाठीं यावेळीं नबाबानें त्यांस "भाई" ह्मणून संबोधिलें; व तो शूर, कडवा पण भोळा सरदार ताबडतोब त्यांस वश झाला. उजाडतांच त्यानें व नबाबानें सैन्याचा व्यूह रचून सभोंवतीं तोफा व आंता खजिना आणि जडजवाहीर ठेवावयाचें आणि मुर्शिदाबादेस निघावयाचें, व पहिला मुक्काम कटवा येथें करावयाचा, ह्याप्रमाणें बेत ठरविला. पण मराठे बारगीर त्यांच्या बारशास जेवलेले होते. नबाब आपल्या सैन्याची रचना करण्यापूर्वीच त्यांनीं त्याच्या छावणीवर तोफांची सरबत्ती केली. यावेळीं मुस्तफाखान व त्याचे अफगाण लोक खरोखरच मोठ्या शौर्यानें लढले. ह्या संधीचा फायदा घेऊन

नबाब कटव्याच्या मार्गाला लागला; पण त्याचें सर्व सामान आणि खजिना मराठ्यांच्या स्वाधीन झाला. त्यामुळें मुसलमान सैनिकांना झाडांचापाला व कोंवळें गवत खाऊन जठराग्नि· शमवावा लागला! काया झांकण्याइतकी फाटकी चिंधी देखील फारच थोड्यांजवळच राहिली होती. कटव्याला गेल्यावर आपण ह्या हालांतून मुक्त होऊं असें नबाबास वाटत होतें. पण बरद्वान-पासून कटव्यापर्यंतचें सात कोसांचें अंतर कमी करण्यासच त्यांस ३ दिवस लागले; इतकें तें सैन्य जर्जर झालें होतें. ते कटव्यास येतात तों दुर्दैव त्यांच्यापुढें उभेंच होतें. मराठ्यांनीं नबाब येण्या-पूर्वींच कटव्यास येऊन लूट केली; व तेथील धान्यांच्या कोठारांना आग लावून दिली होती. त्यामुळें 'भुकेस कोंडा' ह्या न्यायानें मुसलमानांनीं 'जळलेले तांदूळ' खाऊन वेळ मारून नेली. नंतर त्यांनीं मुर्शिदाबादेस भाकरी भाजून आणून खाण्याचा यत्न चालविला.

ह्याप्रमाणें अन्नसामुग्रीचा पुरवठा होऊं लागतांच मुसल-मानांस हुरुप आला. पण यावेळीं पर्जन्यकाळ सुरू झाल्यामुळें मराठे परत नागपुरास येण्याची तयारी करूं लागले. तें मीरहबीब यास रुचलें नाहीं. यावेळीं मराठ्यांजवळ बरीच लूट होती. त्यामुळें घरीं जाण्यांत त्यांस आनंद वाटणें साहजिक होतें. पण अधिक लोभ दाखवून मीर हबीबनें त्यांस राखून घेतलें. त्यानें नबाबाचें राजधानीचें शहर मुर्शिदाबाद लुटण्याचा त्यांस सल्ला केला; आणि जगतशेट, मुराद अलीखान, राजा दुर्लभराम वगैरे श्रीमंत लोकांचीं घरें लुटून पुष्कळ लूट आणिली. एकट्या

जगत् शेटच्याच वाड्यांत २।—२॥ कोट रुपयांची लूट मराठ्यांस मिळाली असें इतिहासकार लिहितात.

प्रत्यक्ष आपल्या नजरे समोर आपली राजधानी लुटली जात असूनहि नबाब कांहींच करूं शकला नाहीं. कारण भास्कर-पंडिताची त्याच्या हालचालीवर सक्त नजर होती. कटव्याहून मराठ्यांचा डोळा चुकवून निसटण्याची संधि केव्हां मिळते हें नबाब, तसेंच मुस्तफाखान, डोळ्यांत तेल घालून पहात होते. अखेर तशी संधि त्यांस मिळाली. एके दिवशीं मराठे बारगीर गंगास्नान करण्यांत, देवपूजा करण्यांत कोणी स्वयंपाक करण्यांत निमग्न आहेत असें पाहून त्यांनीं त्यांजवर एकाएकीं छापा घातला, व त्यांस स्वयंपाकाचें साहित्य टाकून देऊन पळावयास लाविलें; अर्थात नबाबाचें सैन्य मुर्शिदाबादेस सुखरुप पोंचलें. नबाब मुर्शिदाबादेस जातांच मराठे पर्जन्यकाळ संपेपर्यंत कटव्यास राहिले. ही मराठ्यांची छावणी कटव्यापासून दाईहाटपर्यंत तीन कोस पसरलेली होती. अशा फुरसदीच्या वेळीं देखील मराठे स्वस्थ राहिले नाहींत त्यांनीं हुगळी शहर काबीज केलें, व दाईघाटावर नावांचा पूल बांधून भागीरथी नदीवरून पैलतीरास जाऊन एकेक प्रांत आक्रमण करण्याचा सपाटा आरंभिला. त्यांनीं बर्द्वान, मेदिनीपूर, बाळेश्वर बंदर हीं ठिकाणें काबीज केलीं. ओरिसा, राजशाही वगैरे जिल्ह्यांचा बराचसा भाग, तसेंच अकबरनगर व राजमहाल हे सगळे प्रांत मिळविले. यावेळीं नबाव अलिवर्दीखानाचा अधिकार फक्त मुर्शिदाबाद व गंगानदीच्या पूर्वतीरावरील कांहीं प्रांत या पुरताच राहिला होता.

ईस्ट इंडिया कंपनीनेसुद्धां यावेळीं मराठ्यांच्या धाकानें नबाबाची परवानगी घेऊन कलकत्ता शहराभोंवतीं एक मोठा खंदक खणणें सुरू केलें होतें. ह्या खंदकास अझूनहि "मराठा डिच" असें म्हणतात. हा खंदक शेवटीं अपुराच राहिला. खंदकाशिवाय हल्लींच्या सर्क्युलर रोडपासून काशीमबाजार कोठीपर्यंत जंगी कोट व त्याच्या चारी बाजूस बुरुज बांधण्याची परवानगी कंपनीनें नबाबाजवळून मिळविली; व तें काम तिनें पुरें केलें. दुसऱ्याला नबाब कधींहि परवानगी देताना!

मराठ्यांनीं नबबाला सळो का पळो केलें. त्यामुळें तो त्रासून गेला. त्यानें पुनः मदतीसाठीं याचना केली. त्याचा जांवई--अजिमाबादेहून पांच हजार फौज घेऊन नबाबाच्या मदतीस आला. त्यावेळीं नुसतीं वचनें देत न बसतां नबाबानें आपल्या सैन्यांतील मुख्य मुख्य सरदारांना मोठमोठ्या पदव्या दिल्या; व सैन्यास दहा लक्ष रुपये वाटून उत्तेजित केलें; आणि आश्विनमास लागण्यापूर्वींच तो मराठ्यांवर चालून गेला. यावेळीं मराठे निर्धास्त होते. ते दुर्गापूजेच्या उत्सवांत गर्क होते. अशाच वेळीं नबाबानें नांवाशींनावा बांधून एक पूल तयार केला. व त्याच्या साह्यानें आपले लोक गंगेच्या पैलतीरास उतरविलें. कांहीं सैन्य उतरल्यावर सैन्याच्या भारानें दोन नावा बुडाल्या. त्यामुळें त्याचे १५०० लोक पाण्यांत पडून बुडून मेले. तरीहि तो डगमगला नाहीं. त्यानें दोन तीन हजार लोकांनिशींच जाऊन मराठ्यांवर हल्ला केला. तो नवरात्राचा अखेरचा दिवस होता. मराठे बेसावध

होते, ते सामान टाकून पळाले. भास्करपंडितानें देवीची मूर्ति टाकून पलायन केल्यामुळें त्यांजवर हा ईश्वरी क्षोभ झाला असें कित्येकांचें म्हणणें आहे. मराठे पंचकोटाच्या पहाडी प्रदेशांतून चालले. नबाबानें त्यांचा पाठलाग केला. पण मराठ्यांची चपळ जात मुसलमानांच्या हातीं कशी लागणार? अखेर ते मेदिनीपुरच्या रस्त्यावर आले. तेथून ते ओरिसा प्रांतात शिरले व त्यांनीं त्या प्रांतांतील बंदोबस्त राखणारा सरदार मासूद यांशीं लढून त्यास ठार मारिलें. हें वर्तमान नबाबास समजतांच तो सैन्य घेऊन ओरिसा प्रांतांत आला. त्याजबरोबर हुगळी येथील भास्करपंतानें ठेविलेला सुभेदार शिवराव साठे यानें सामना दिला. पण तो नबाबाच्या हातीं लागला. त्याबरोबर भास्करपंडितानें उलट घेऊन अलिवर्दीखानाबरोबर जबरदस्त लढाई दिली. ह्यावेळीं मराठे 'मारूं किंवा मरूं' ह्या आवेशानें आपल्या विजयी भाल्याच्या फेकी करीत होते. पण दुर्दैव! मराठे नामोहरम झाले! हें वर्तमान इ० स० १७४३ मध्यें झालें. मीरहबीबनें मराठ्यांना वाट दाखवून दिलीं व थोडेंबहुत निभावून आणिलें. स. १७४२ च्या या सालचा दसरा २८ सप्टेंबरास होता. भास्करपंतानें स्वारीचा नाद सोडून घरचा रस्ता सुधारला. त्यानें मुर्शिदाबादेहून निकडीनें रघूजीकडे फौजेची मागणी केली. ही मागणी आल्यावर रघूजीनें हरतऱ्हा करून फौज उभारली; आणि दसऱ्याचे मुहूर्तानें म्हणजे ता० २८ सप्टेंबर रोजीं बंगाल्यांत भास्कररामाचे मदतीस जाण्याची सिद्धता केली.

भास्करपंत परत आल्यानें रघूजीला एकदम बंगाल्यांत जाण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. इकडे अलीवर्दीखानानें पेशव्याची विनवणी करून त्याजकडून रघूजीला शह बसविला. पेशवा यावेळीं माळवा व बुंदेलखंड या बाजूस फौज घेऊन होता; त्यानें बाबूजी नाईक व रघूजी यांजवर फौज पाठविली असावी; अथवा पेशव्याची फौज आपणांवर येण्यापूर्वींच त्याच्या प्रतिकारार्थ रघूजी आयती तयार असलेली फौज घेऊन पेशव्यावर गेला असावा. कारण आक्टोबर स० १७४२ त पेशवा व रघूजी ह्यांच्या जावळ व भंडाळे येथें दोन लढाया झाल्या. पुढें स० १७४३ सालभर पेशवा व रघूजी यांची झटापट चालून उभयतांची गोडी शाहूनें साताऱ्यास करून दिली. अर्थात् भास्करपंताच्या पराभवाचा वचपा काढण्यास त्या सालीं भोसल्यास, बंगालवर जातां आलें नाही. पंतानें पुष्कळ लूट आणिली होती; परंतु अपयश घेऊन आल्याबद्दल सर्व मंडळीस दुःख वाटत होतें.

रघूजीची बंगालवर मोहीम.

आपला सेनापति भास्कर पंडित अगणित लूट घेऊन आला पण अखेरीस पदरीं अपयश घेऊन आला, ही गोष्ट रघूजी राजांच्या मानी स्वभावास आवडली नाहीं. आजपर्यंतच्या कोणत्याच लढाईंत आपण अपेश मिळविलें नाहीं, आणि आज तें आपल्या पदरीं आलें याबद्दल त्यांस फारच वाईट वाटलें. क्रोधाच्या आवेशानें त्यांचे बाहु स्फुरण पावूं लागले. त्यांनीं ताबडतोब पुनरपि बंगालवर स्वारी करण्याचें ठरवून तिची तयारी केली. त्यांनीं नुकेंच लढून थकलेल्या लोकांच्या विश्रांतीचाहि विचार केला नाहीं. सदर स्वारींत मराठ्यांच्या कीर्तीस लागलेला कलंक साफ धुवून निघाला पाहिजे हीच महत्वाकांक्षा त्यांजपुढें होती. त्यांनीं कोणाचेंहि ऐकिलें नाहीं. सदर स्वारीचें अधिपत्य स्वतः स्वीकारून इ. स. १७४४ मध्यें तो बंगाल प्रांतीं निघाला.

रघूजी भोंसले चवताळून येत आहे असें ऐकतांच अलीवर्दीखान घाबरला. कारण रघूजी भोंसल्याबरोबर सामना देण्याचें त्याचें सामर्थ्य नव्हतें. पण तो धैर्यवान पुरुष होता. त्यानें यावेळीं मराठ्या मराठ्यांत फूट पाडून आलेलें संकट परभारेंच निवारण्याचा डाव मांडला. त्यानें दिल्लीच्या बादशहास मदतीसाठीं पत्र लिहिलें, व दिल्लीच्या बादशहानें बाळाजी बाजीराव पेशवे यांस "माळव्याची सनद" देण्याची लालूच दाखवून रघूजीचें पारिपत्य करण्यास सुचविलें. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांना माळ-

ण्याची सनद प्राप्त होण्याची ही सुसंधि गमावतां आली नाहीं. त्यांनीं शत्रूला साह्य देऊन केवळ स्वार्थासाठीं मराठ्यांबरोबर युद्ध केलें व त्यांचा पराभव केला. हें पेशव्यांच्या हातून त्यांच्या ब्रीदास अत्यंत लांछनास्पद असें कृत्य घडलें. ह्या प्रसंगासंबंधानें कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ही म्हण नानासाहेब पेशव्यांस लावावयास हरकत नाहीं. त्यामुळें रघूजीचा फार विरस झाला; व जें काम एका स्वारींत व्हावयाचें त्याच कामासाठीं त्यांस पांच स्वाऱ्या कराव्या लागून अवास्तव पैसा व मनुष्यबळ खर्च करावें लागलें.

रघूजी राजे भोंसले यांची स्वारी ओरिसामधून बंगालप्रांतीं आली. प्रथम त्यांनीं कटक येथील दुर्लभराम सुभेदार यास पकडलें. नंतर बारभाटीचा किल्ला लढून घेतला. त्यानंतर सबंध ओरिसाप्रांत मेदिनीपूर, हुगळी व बर्द्वान एवढा मुलूख हस्तगत केला. तो कटवा व बरद्वान यांच्या मध्यभागीं असतांच त्यास समजलें कीं बाळाजी बाजीराव पेशवे मुर्शिदाबादेस आले असून नबाबास साह्य करून आपणांवर चाल करून येण्याचा त्यांचा बेत आहे. हें वर्तमान समजतांच त्यांस अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं आपले सरदार संभाजी शिर्के व मानासिंग मोहिते यांस बाळाजी बाजीराव पेशव्यांकडे पाठवून पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. पण त्यांनीं तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. त्यावेळच्या कागदपत्रात असें लिहिलें आहे कीं, " ह्या काळीं रघोजी भोंसले यांनीं बाळाजी बाजीरावांशीं बोलणें केलें जेः—महाराजांची + आज्ञा व सनदा कटक बंगाल्यांत

+ नागपूरकर भोंसल्यांचें कागदपत्र

चौथाई व घासदाणा द्यावा. त्यास आपण आडवें यावें, आपसांत कलह करावा, हें नीट नाहीं. बल्के महाराजांनीं आपले नांवें आज्ञापत्र दिलें जे बंगाल वगैरेत आपली फौजहि न्यावी." सारांश आज्ञापत्राची नक्कल तेरावे नंबरामध्यें सनदेचे किताबींत आहे.

"सन ११४७ रा. बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसीजे:—सुभा प्रांत पटण व प्रांत बांध व रतनपूर व घमद बाघेलखंड व प्रांत बंगाल तहत पूर्व समुद्र हे प्रांत रा. रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांस फौजेचे बेगमीबद्दल मोकासे दिले असे. तरी तुह्मीं त्या प्रांतीं फौजा न पाठविणें. आपल्या सरदारांस ताकीद करून प्रांतांत उपद्रव लागू न देणें. मशारनिल्हे ह्या प्रांतीं जाऊन अंमल बसवितील. सुखी असा." या प्रकारें पेशजीच महाराजांचीं आज्ञापत्रें असतां; दुसरें, 'आमचीं नुकसानें कितीं जाहलीं याबर आपण आलांत,' ह्या भाषणाकडे नानासाहेब पेशव्यांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं. कारण त्यांस "माळव्याची सनद" पाहिजे होती, व ती रघूजीस बंगाल प्रांतांतून हांकून दिल्यावर बादशहाकडून मिळावयाची होती. नानासाहेब पेशव्यांनीं मुर्शिदाबादेस जाऊन नबाबाची भेट घेतली. त्याजवरून बहार प्रांताच्या चौथाईची रक्कम घेतली. व मौल्यवान नजर नजराणे घेऊन अलिवर्दीखानाच्या हातांत हात घालून नानासाहेब पेशवे रघूजी भोंसल्यांवर ससैन्य चालून गेले. पेशव्यांच्या सैन्याबरोबर नबाबाचें सैन्य चालूं शकलें नाहीं; तेव्हां पेशव्यांनीं त्याच्या सैन्यास मागें ठेविलें व आपण पुढें जाऊन कसबे जावळ व भंडाले परगणा व खटाव येथें रघूजीच्या

सैन्याबरोबर टक्कर दिली, आणि त्यास पिटाळून लाविलें. (आक्टोबर १७४४). पेशव्यांच्या स्वार्थवृत्तीनें आपला कार्यक्रम फसला हें पाहून रघोजी राजे परत नागपुरास आले; व श्रीमंत नानासाहेब पेशवे हे आपल्या कामगिरीचें वक्षीस-माळव्याची सनद-घावयास बादशहाकडे दिल्लीस गेले.

बंगालवरील आपल्या ह्या दुसऱ्या स्वारीचा असा विपरीत परिणाम होईल असें रघोजी राजांस वाटलें नव्हतें. केवळ व्यक्तिविषयक द्वेष अंतःकरणांत ठेवूनच आपला स्वार्थ साधण्यासाठीं शत्रूंशीं संगनमत करून, देशद्रोहाचें पातक शिरावर घेण्यास श्रीमंत नानासाहेब तयार होतील असें त्यांस मुळींच वाटलें नाहीं. नाहीं तर त्यांनीं पूर्वींच कांहीं तरी बंदोबस्त केला असता. शेवटीं त्यांनीं पेशव्यांच्या ह्या प्रकरणाची हकीकत श्री. शाहू छत्रपतीस निवेदन केली, व त्यांजकडून पेशव्यांचे कान उपटले. ह्या प्रकारामुळें श्री. नानासाहेबांवर छत्रपती बरेच दिवस रुष्ट झाले व त्यांनीं त्यांस बडतर्फ केलें. पण श्री. नानासाहेबांनीं शाहुमहाराजांचे जोडे उचलण्यापर्यंत नम्रता दाखवितांच त्यांचें अंतःकरण मऊ झालें, व त्यांनीं त्यांस पुनः मर्जीत घेतलें.

आम्हीं यापूर्वीं रघोजीराजांच्या स्वभावाचें जे वर्णन केलें आहे त्या स्वभावाप्रमाणेंच त्यांनीं याहि वेळीं आपलें वर्तन ठेविलें, पराजय व मानखंडना हीं सहन करणें त्यांच्या स्वभावाच्याविरुद्ध होतें. त्यांनीं पुनः सैन्याची तयारी केली; व बरोबर वीस हजार सैन्य देऊन भास्कर पंडितास बंगालवर स्वारी करण्यास रवाना केलें.

भास्करपंताचा खून.

ह्या स्वारीचा परिणाम फारच अनिष्ट झाला. अलिवर्दीखानास वाटत होतें कीं, आतां कांहीं रघोजी आपल्या वाटेस जाणार नाहीं. पण त्याचा हा भ्रम ताबडतोब दूर झाला. रघोजीची चिकाटी पाहून त्यास आश्चर्य वाटलें ! आतां आपली धडगत नाहीं. यावेळीं रघोजीच्या सैन्याबरोबर लढण्याचें आपणांस सामर्थ्य नाहीं. प्रजा त्रस्त झाली. मराठ्यांच्या भयानें गांवचें गांव ओस पडले. "ऐ एलोरे बोर्गी" 'बारगीर आलेरे आले' अशा आरोळ्या जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागल्या. तरवारी, तोफा, बंदुका, दारूगोळा मागील स्वारीच्या वेळींच खलास झाला; तेव्हां यावेळीं मराठ्यांबरोबर दोन हात करून जय मिळणार कसा ? याचा अलीवर्दीखानास विचारच पडला. शेवटीं तो आपल्या जातिस्वभावावर गेला. मराठ्यांशीं लढून आपला निभाव लागणें अशक्य आहे; तेव्हां त्याजशीं यावेळीं कावेबाजपणा करून कपटानें यश मिळविलें पाहिजे, अशी त्यानें आपल्या मनाशीं खूणगांठ बांधिली; व त्या दृष्टीनें प्रयत्न आरंभिला. त्यानें आपला सेनापति मुस्तफाखान यास आपले दगलबाजीचे विचार विस्तृत करून सांगितलें. मुस्तफाखान शूर, मुत्सद्दी व धूर्त होता. त्यास नबाबाचे हे निंद्य बिचार मुळींच पटले नाहींत. पण नबाबास त्याच्या लोभी स्वभावाची पूर्ण माहिती होती. त्यानें त्याचा शब्दानें, पदवीनें तसेंच इनामानें गौरव केला. त्याबरोबर त्याची वृत्ति पालटली. नंतर त्या दोघांनीं भास्कर

पंडितास सल्याच्या मिषानें बोलावून दगलबाजीनें कसें मारावयाचें तें ठरविलें; व त्याप्रमाणें मुस्तफाखानाला जानकीराम नांवाच्या दुसऱ्या एका सरदारास बरोबर देऊन सलोख्याचें बोलणें लावण्याकरितां भास्कर पंडिताकडे पाठविलें. समक्ष भेटीअंतीं भास्कर पंडिताच्या मनाचा कल लढाईकडे नाहीं हें त्या धूर्त सरदारानें काढून घेतलें; व विनाकारण रक्तपात करण्यांत अर्थ नाहीं, उभयपक्षीं सलोख्यानें वागल्यास दोघांचेंहिं कल्याण होईल, अशा अर्थाचें भाषण करून भास्कर पंडिताचें मन वळविलें; व नबाबाच्या डेऱ्यांत एकमेकांच्या भेटी होऊन तहाच्या अटी निश्चित कराव्या असें उभयपक्षीं ठरलें. भास्कर पंडित शूर खरा; पण फारच भोळा होता. शूरमाणसें बहुधा मनाचीं उदार व स्वभावानें भोळीं असतात. मुस्तफाखानाचीं गोड गोड भाषणें, त्याजकडून प्रत्यहीं येणारे नजराणे, नबाबाकडून आलेल्या भेटीच्या डाल्या इत्यादि प्रकारांवरून भास्कर पंडित चकले. त्यांचा ग्रह झाला कीं, खरोखरच नबाब तह करूं इच्छीत आहे. भास्कर पंडिताच्या भेटीनंतर घडलेलें सर्व वर्तमान मुस्तफाखाना कडून ऐकतांच नबाब आपलें सैन्य घेऊन भास्करपंडिताच्या छावणीपासून कांहीं अंतरावर मनकीरा येथें तळ देऊन राहिला. भेटीचा दिवस नक्की ठरला. त्यावेळीं मुस्तफाखान व जानकीराम यांजकडून दगा फटका न होण्यासंबंधानें शपथा घेवविल्या होत्या. मुस्तफाखानानें एका भरजरी रुमालामध्यें एक वीट बांधून बगलेंत ठेविली होती; व शपथ घेतेवेळी तिचा कुराण म्हणून त्यानें उपयोग केला. तसेंच जानकीरामानेंहि केलें होतें. त्यामुळें भास्कर पंडितास दगलबाजीची

कांहींच कल्पना आली नाहीं. भास्कर पंडिताच्या भेटीसाठीं नबाबानें उंच व भव्य डेरे उभारलेले होते; व त्यातील कित्येक डेऱ्यांत आपल्या सैन्याच्या निवडक तुकड्या ठेविल्या होत्या. नेमलेल्या वेळीं जानकीराम व मुस्तफाखान हे भास्कर पंडितास आमंत्रण करावयास गेले. त्यानीं आमंत्रणाचा स्वीकार केला, व तो निवडक फौजेसह नबाबाच्या डेऱ्याकडे निघाला, डेऱ्याच्या बाहेर नबाबाचें सैन्य पंडितजीस सलामी देण्याकरितां उभें ठेविलें होतें. भास्कर पंडिताची स्वारी येतांच त्यास सर्व फौजेनें सलामी केली. व तो खालीं उतरून आपल्या निवडक सरदारांसह डेऱ्यांत प्रवेश करिता झाला. त्याचें सर्व सैन्य छावणीच्या बाहेर राहिलें. यावेळीं भास्करपंडिताबरोबर निवडक व कर्ती माणसें होतीं. नबाब भास्कर पंडिताची मार्गप्रतीक्षा फारच उत्सुकतेनें करीत होता. भास्कर पंडित आंत येतांच नबाबानें त्याचें स्वागत केलें, व यातील भास्कर पंडित कोणते? म्हणून मराठ्यांकडील सरदारास विचारिलें. त्यांनीं पंडितजीकडे बोट दाखवितांच " कापर को मारो " असा शद्बोच्चार केला, त्याबरोबर लपून बसलेले नबाबाचे सशस्त्र सरदार पुढें झाले. व भास्कर पंडितावर तुटून पडले. कित्येकांनीं मराठे सरदारांवर हत्यारें चालविलीं. थोडा वेळ खडाजंगी होऊन सर्व मराठे सरदार मारले गेले. त्यांत जे सरदार मारले गेले. त्यांची यादी येणेंप्रमाणें:— १ भास्करपंत २ अलीकरवाल ३ यशवंतराव गुजर ४ निळकंठराव मेहिते ५ दाजिबा भोंसले ६ बापूजी महाडीक ७ शाहामतखा ८ मनाजी भोंसले ९ नारायण भोंसले १० संभाजी भोंसले ११ कृष्णराव निंबाळकर ११ बापूजी कदम १३ श्रीपतराव मेहेकर

१४ व्यंकटराव भांड १५ दाजिबा पाटणकर १६ बळवतंराव शिर्के १७ गोविंदराव शेलुकर, १८ सटवाजी जाधव १९ शिवाजी जामदार २० सुभानजीराव २१ नाना बक्षी २२ जोतिबा कारभारी हे सर्व मराठे सरदार मारले गेल्यावर नबाबाच्या लोकांनीं जयवाद्यें वाजविलीं. त्याबरोबर नबाबाच्या सैन्यानें मराठ्यांच्या सैन्यावर हल्ला केला. हा प्रकार पाहून मराठ्यांनीं छावणीचा रस्ता धरला. राघो गायकवाड या नांवाचा सरदार पहिल्यानें निघाला व त्याचें अनुकरण सर्वांनीं केलें. कटव्यास राहिलेल्या सर्व सैन्यास ही हकीकत कळतांच त्यांनींहि नागपुरचा रस्ता धरला.

बंगालवर चवथी मोहीम.

भास्कर पंडिताचा विश्वासघातानें वध झाल्याचें वर्तमान रघोजी राजांस समजतांच त्यांना फारच त्वेष आला. ह्या कृत्याचा नबाबावर सूड उगविल्याशिवाय स्वस्थ बसावयाचें नाहीं असा त्यानें कृतसंकल्प केला. रघोजी राजांनीं ताबडतोब बंगालवर स्वारी करण्याची तयारी केली. त्यांनीं आपला पुत्र जानोजी व दत्तक पुत्र मानाजी यांस बरोबर घेतलें. मराठे ओरिसा प्रांतांत कटक येथें येऊन पोंचले. अल्लीवर्दीखानाची तारांबळ उडाली. इतक्या त्वेरेनें रघोजी पुन्हा बंगालवर स्वारी करील याची त्यास कल्पनाहि नव्हती. त्यानें पुन्हां मराठे लोकांस भुलथापा देऊन वश करण्याचा प्रयत्न केला; व त्याप्रमाणें तहाचें बोलणें करण्यासाठीं रघोजीराजांकडे माणसेंहि पाठविलीं. यावेळीं रघोजीच्या मनामध्यें नबाबाचा पूर्ण उच्छेद करावयाचा होता. म्हणून त्यानें प्रथम कांहींच दाद दिली नाहीं. पण जेव्हां नबाबानें बादशहाकडून आलेल्या मुनामखां नांवाच्या एका तिऱ्हाईत सरदाराला मध्यस्त घातलें तेव्हां रघोजीनें अशक्य अशी अट घालून तहाची उडवाउडव केली. भास्करपंत व मारले गेलेले सरदार यांच्या जिवाची किंमत म्हणून तीन कोट रुपयांची त्यानें मागणी केली, पण त्यावेळीं नबाबाजवळ पैसा नव्हता. त्यामुळें त्यानें नाहीं असें उघड उत्तर न देतां चाळवाचाळव चालविली. ह्या प्रकारामुळें मराठे फसले. नबाबानें त्यांस गुळचट थापा देऊन झुलवीत ठेविलें. मराठ्यांस झुलवीत

ठेवण्यांत त्याचा मतलब होता. अफगाणांचा सरदार मुस्तफाखान यानें बंड केलें होतें. तें मोडण्याच्या प्रयत्नांत तो होता. शेवटीं एका चकमकीत मुस्तफाखान मारला गेल्याची बातमी कळतांच नबाबानें आपला रंग पालटला; व तहाचें बोलणें बाजूस राहून उलट उद्दामपणाची भाषा सुरू झाली. हें पहातांच रघोजी राजाला स्वतःचा भोळेपणा पाहून मनस्वी खेद झाला. त्यानें ताबडतोब लढाईची तयारी केली; व आस्ते आस्ते सभोंवतालच्या प्रांतावर स्वाऱ्या करून मेदिनीपुरापासून हिजिलीपर्यंत सगळा ओरिसा प्रांत व बरद्वानचा बहुतेक भाग काबीज केला. बाराभाटीचा किल्लेदार अबदुलअजीज हा रघोजीला शरण गेला. दुर्लभरामाला रघोजीनें पकडून कैदेंत ठेविलें होतें. पण नबाबानें त्याच्या मुक्ततेबद्दल तीन लक्ष रुपये दिल्यावर त्यास सोडून दिलें.

मुस्तफाखान मारला गेल्यावर त्याचे अफगाण लोक कोणी नायक नसल्यामुळें जिकडे तिकडे बंडाळी करीत सुटले होते. ते रघोजीस शरण आल्यामुळें त्यानें त्यांस पदरीं ठेविलें. अलीवर्दी-खानानें लढाईची तयारी चालविली होती. इ. स. १७४८ च्या पावसाळ्या नंतर अलीवर्दीखानानें मोठ्या फौजेसह मराठ्यांवर स्वारी केली. पाटण्याजवळ बांकीपूर येथें त्यानें आपल्या सैन्याचा तळ दिला. मुहिलीपूर येथें मराठ्यांची छावणी होती. शत्रु इतका जवळ आलेला असूनहि रघोजीस त्याची गंधवार्ताहि नव्हती. रघोजीला आपल्या शौर्याचा व निधड्या छातीचा गर्व होता. त्यामुळें शत्रु कोठें काय करीत आहे वगैरे गोष्टींची तो फारशी चौकशी

करीत नसे. शत्रु केव्हांहि चालून आला तरी आपण व आपले शिपाई त्याला सहज उडवूं असा त्यास आत्मविश्वास होता. ह्या आत्मविश्वासामुळेंच रघोजी फसला. मध्यरात्रीं नबाबाचें सैन्य येऊन ठेपतांच रघोजी चकीत झाला. पण तो विलक्षण धीराचा असल्या-मुळें मुळींच घाबरला नाहीं. त्याची हिंमत जबर होती. सैन्याची तयारी नसतांहि शत्रूला पाठ न दाखवितां मर्दासारखे दोन हात करूं, असा त्याचा कृतसंकल्प होता. तो धैर्यानें लढाईस उभा राहिला. अशा प्रकारें तयारी नसतांहि मराठ्यांनीं लढण्याची फारच शिकस्त केली. ह्या युद्धांत मराठ्यानीं अपूर्व शौर्य व युद्ध कौशल्य दाखविलें, ही गोष्ट मुसलमान इतिहासकारांनींहि कबूल केली आहे. शेवटीं या युद्धांत मराठ्यांना माघार घ्यावी लागली. अपजयामुळें रघोजीचें चित्त उदास झालें पण मीरहबीब यानें सल्ला दिल्यावर मकसुदा-बादेवर ते चालून गेले. तेथें अलीवर्दीखानाचा सरदार मोहरबजान यांजशीं लढाई झाली. इतक्यांत वर्तमान आलें कीं, गोंडराजाकडील दिवाण रघुनाथसिंह उलटला आहे. व देवगड प्रांतीं गोंडांचा उपद्रव फार आहे. हें वर्तमान समजतांच ते परत आले. त्यांनीं मागें कटक प्रांताचे सरहद्दीवर नरोजी जाचक यास ठेविलें.

रघुजीराजे भोंसले नागपूर मुक्कामीं येतांच त्यांनीं गोंडांच्या पारिपत्त्यास फौजा पाठविल्या; आणि स्वतः रघुनाथसिंगावर चाल करून त्याचें पारिपत्य केलें. तसेंच पाटणसावंगीचे मुक्कामीं गोंडां-बरोबर लढाई केली व त्यांचा पराभव केला. त्याप्रसंगी कित्येक गोंडांस पेवांत घालून जाळून मारिलें. इतका प्रकार झाल्यावर

त्यांनीं चंद्रपुराकडे कुच केलें. कारण चंद्रपूरच्या राजाचे गोंड शिपाई व खंडाईत तसेंच दहा हजारावर पठाण, यांनीं पुंडावा माजविला होता. तें ठाणें निळकंठशहा बळकावून होते. त्यांच्या पारिपत्यास रघोजी राजे येण्यापूर्वीं शिवाजीपंत टाळकुटे यांस रवाना केलें होतें; परंतु शिवाजीपंताचा कांहींच उपाय चालला नाहीं. नंतर रघोजीराजे आल्याबरोबर तिमाजी सखदेव यांच्या मदतीनें किल्ला घेतला; निळकंठशहाराजास तेथून काढून बल्लाळपुरास पाठविलें; व कृष्णाजी नारायण यांस चंद्रपूरचे सुभेदार केलें. खंडाईत मंडळीपैकीं केशवराव * बडनाईक, त्यांचे भाऊ उमाजी बडनाईक यांस आपल्या पदरीं ठेऊन उमरेड येथें नेमिलें.

ह्याप्रमाणें देवगड व चंद्रपुरचा बंदोबस्त केल्यावर रघोजीराजांचें चित्त पुन: बंगालकडे वेधलें. बंगाल प्रांतामधील झालेली नाचक्की त्यांस विसर पडूं देईना. एकसारख्या चार स्वाऱ्या करून कांहींच फळ न मिळाल्यामुळें त्यांस मनस्वी खेद होत होता. स्वारीस लागणारा अवाढव्य खर्च व मनुष्यहानि यांकडे लक्ष पुरवून हा नाद सोडून द्यावा असें त्यांस कधींहि वाटलें नाहीं. चारहि स्वाऱ्या मिळून त्यांस बराच लाभ झाला; परंतु अपयश आल्याचें त्यांस पदोपदीं जाचत होतें. अपयश पदरीं घेऊन स्वस्थ बसणाऱ्यांपैकीं रघोजी राजे नव्हते, हें त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट निदर्शनास येईल. "मारीन किंवा मरेन" पण अपशय घेऊन येणार नाहीं, ह्या त्यांच्या बाण्याची जितकी वाखाणणी करावी तितकी थोडीच आहे. असो.

---

* नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ ४५

पांचवी स्वारी

शेवटीं त्यांनीं इ० स० १७४८ मध्यें बंगालवरील पांचव्या स्वारीची तयारी केली. ह्या स्वारीवर रघोजी राजांनीं आपले पुत्र जानोजी + भोंसले यांस पाठविलें. त्यांचे समागमे तुळजाराम नांवाचा सरदार फौजेसह रवाना केला. मागील स्वारीच्या वेळीं रघोजी राजे माघारे येतांच अलीवर्दीखानानें मीरजाफर नांवाच्या सरदारास फौजेसह कटक प्रांतांतील मराठ्यांचीं ठाणीं काबीज करण्यास पाठविलें होतें. व त्याप्रमाणें त्यानें कांहीं ठिकाणें काबीज करून अंमलहि बसविला होता. इतक्यांत जानोजी भोंसले यांच्या स्वारीचें वर्तमान त्यास कळतांच तो बरद्वानकडे पळून गेला. जानोजी भोंसल्यांनीं कटक प्रांतांतील आपलीं ठाणीं पुन्हां हस्तगत केलीं; आणि मुर्शिदाबादेकडे मोर्चा वळविला. तिकडील प्रांतांत मराठ्यांनीं पुष्कळच लूट मिळविली, व लोकांस बराच उपद्रव दिला. ह्या बातम्या नबाबास वरचेवर कळूं लागल्या. त्यामुळें नबाब भांबावून गेला. मराठ्यांचा हा उपद्रव नाहींसा करण्यासाठीं त्यांजशीं तह केल्याशिवाय सुटका नाहीं अशी त्याची खात्री झाली. शेवटीं त्यानें रघोजीराजांकडे तहाचें बोलणें लावण्यासाठीं शेर बंदाजखान व बुलंदखां या नांवाचे दोन वकील नागपुरास पाठविले. वकिलांनीं फारच लीनपणानें रघोजीराजांस तहास राजी होण्याबद्दल विनंति केली. तेव्हां रघूजी राजांनीं वकिलांस स्पष्ट सांगितलें कीं, "जेव्हां क्रोड

+ नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ट ४५.

रुपये खर्चास देऊन बहुत फौजा पाठवाव्या तेव्हां तुम्हीं खंडणीचा ऐवज देणार, व त्यांतहि दगाबाजी करणार. तुमचा विश्वास काय? भास्करपंताबद्दल तुमचा मोबदला घेणें जरूर आहे" हें भाषण ऐकून वकिलांनीं समोपचाराचीं भाषणें करून भास्करपंताबद्दल निराळा मुलुख तोडून देण्याचें कबूल केलें, व कटक प्रांतास वेढा देवून तह ठरविला. याखेरीज मागील दोन वर्षांची खंडणी २५ लक्ष रुपये + नगदी देण्याचें ठरविलें. तहामध्यें खालील कलमें ठरविण्यांत आली :—

(१) नबाबानें बंगाल, बहार, व ओरिसा या तीन प्रांतांची चौथाई मराठ्यांस नेमानें देत जावी.

(२) मीर हबीब अलीनें परत अलीवर्दीखानाकडे जावें, व नबाबानें त्याला ओरिसाचा सुभेदार नेमावें.

(३) ओरिसा प्रांताचें उत्पन्न मीर हबीबनें मराठ्यांच्या सैन्याचे पगारासाठीं लावून द्यावें.

(४) मराठ्यांनीं पुनः त्रास न देण्याचें कबूल करावें, व नबाबानें त्याबद्दल त्यांना दरसाल १२ लक्ष रुपये द्यावे.

(५) बालेश्वर (बालासोर) जवळची सुवर्ण रेखा नदी ही बंगाल व मराठ्यांचें राज्य यामधील सरहद्द समजावी. मेदिनीपूर बंगालमध्यें द्यावें. या नदीच्या पलीकडे किंवा तींत मराठ्यांनीं पाऊल ठेवूं नये.

याप्रमाणें वरील पांच कलमें नक्की करून तीं नबाबाच्या मंजुरीसाठीं मुर्शिदाबादेस पाठविण्यांत आलीं; व तहाची वाटाघाट

+ नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ट ४६.

सुरू असल्यामुळें आपण नबाबाच्या मुलखांत उपद्रव करूं नये म्हणून जानोजी भोंसले यांस रघोजी राजांनीं पत्र पाठवून कळविलें.

शेवटीं उभयपक्षीं अटी मान्य होऊन तह ठरला. तह झाल्या-बरोबर रघोजी राजांनीं आपलें सैन्य बंगालमधून काढून नेलें. त्यानंतर मराठे नबाबाच्या आमदानीमध्यें बंगाल प्रांतावर चढाई करून गेले नाहींत. मराठ्यांनीं हा तह अक्षरशः पाळला याबद्दल नबाबासहि आश्चर्य वाटलें. सारांश रघूजी राजांची महत्वाकांक्षा अशा प्रकारें तडीस गेली. नबाब जेरीस येऊन चौथाई देण्याचें कबूल कर-तांच रघोजी राजांचें काम फत्ते झालें. स्वारीमधील अपयश त्यांस सहन होत नसे. कोणत्याहि कामांत यश येईपर्यंत ते चिकाटीनें प्रयत्न करीत; पण माघार घेत नसत. ह्या त्यांच्या अद्वितीय गुणामुळेंच ते मोठ्या योग्यतेस चढले. पेशव्यांची सत्ता विस्तृत असतांहि ते रघोजी भोंसल्यास वचकत असत. त्यावेळच्या मराठे मंडळीमध्यें रघोजी भोंसल्यासारखा निधड्या छातीचा वीर दुसरा कोणीहि नव्हता.

रघोजीराजांचे दुसरे चिरंजीव मुधोजी भोंसले हे देऊर मुक्कामीं रहात होते. तेथून ते नेहमीं सातार्‍यास शाहू महाराजांकडे येत असत. शाहू महाराजांच्या धाकट्या राणीच्या चुलत बहि-णीचे ते पुत्र असल्यामुळें साहजिक महाराज त्यांजवर लोभ करीत. महाराजांस पुत्र संतति नसल्यामुळें ते मुधोजीस दत्तक घेण्याचा विचार करूं लागले. ही बातमी ताराबाई साहेबांस कळतांच त्यांनीं शाहू महाराजांस विचारिलें कीं, तुम्ही मुधोजीस

दत्तक घेत आहां काय? तेव्हां शाहू महाराज म्हणाले, "वंशात कोणी नाहीं. आपले आप्ताचा मूल चांगला आहे, म्हणून हा विचार ठरविला + आहे." हें महाराजांचें उत्तर ऐकून ताराबाई साहेबांस राग आला; व म्हणाल्या, आपला प्रत्यक्ष वंश असतां दत्तक कशास पाहिजे? हें उत्तर ऐकतांच शाहू महाराजांची खात्री झाली कीं ताराबाई साहेबांनीं आपला नातू लपवून ठेविल्याची जी दाट वदंता आहे ती खोटी नाहीं, म्हणून त्यांनीं मुधोजीस दत्तक घेण्याचें तहकूब ठेविलें. इतक्यांत नबाब अलीवर्दीखानास जेर करून रघोजी भोंसल्यांची स्वारी साताऱ्यास राजदर्शनासाटीं आली. शाहू छत्रपतींनीं त्यांचा यथोचित् गौरव केला. मुधोजी बावांच्या दत्तक प्रकरणाची हकीगत ऐकून त्यांनींहि थोडासा प्रयत्न करून पाहिला. परंतु खुद्द वंश जिवंत असल्यामुळें त्यांचा नाईलाज झाला. शेवटीं, रघोजी भोंसल्यांनीं मुधोजी भोंसल्याच्या लग्नाचें निमित्त करून मुधोजी-सह देऊरास आले, व तेथें आल्यानंतर केदारजी मोहिते यांचा मुलगा मानसिंग मोहिते यांजबरोबर आपली मुलगी बाकाबाई हिचें लग्न लाविलें; आणि नागपुरास येतेवेळीं मानसिंग मोहिते यांस कुटुंबासहित बरोबर घेऊन आले. त्यानंतर लवकरच मुधोजी भोंसले हेहि आले.

रघोजीराजे भोंसले नागपुरांत आल्यानंतर त्यांच्या मागें (इ. स. १६७१) शाहू महाराजांचा काल झाला. हें ऐकून राजांस फारच दुःख झालें. छत्रपतींच्या गादीवर ताराबाई साहेबांचा

+ नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ ४७

नातू रामराजा यास बसविण्यांत आलें. यापुढील छत्रपतींच्या गादीवरील सर्व राजे केवळ बाहुल्याप्रमाणें होते. मराठा साम्राज्याची खरी सत्ता पेशव्यांनीं बळकाविली; व गादीच्या मालकास केवळ नामधारी राजे बनविलें. शाहू महाराजांच्या निधन कालापूर्वी जे प्रकार झाले ते अत्यंत शोचनीय असे होते. छत्रपती आजारी असतांना सकवारबाईनीं पेशव्यांची डाळ शिजूं न देण्याविषयीं केलेला उपक्रम कसा फसला? व नानासाहेब पेशव्यांनीं छत्रपतींच्या सहीचा कागद तयार करून राज्यापहार कसा केला? शेवटीं आपली काळीकृति उजेडांत न यावी म्हणून सकवारबाईस सती जाण्यास कसें भाग पाडलें; सकवारबाईस सती जाण्याबद्दल प्रोत्साहन देण्यासाठीं त्यांचे बंधु शिर्के यांस कसें आमिष दाखविलें. ताराबाईस तुमच्या नातवास गादीवर बसवितों असें आश्वासन देऊन आपल्या बाजूस कसें ओढून घेतलें? हें ऐतिहासिक सत्य निवेदन करण्याचें हें स्थळ नव्हे. पेशव्यांच्या मुत्सद्दीपणास इतर मराठे सरदाराप्रमाणें रघोजी राजेहि बळी पडले! रघोजी भोंसल्यांनीं राणीचे आप्त म्हणून कांहीं गडबड करूं नये म्हणून त्यांस कांहीं जहागीर वगैरे देऊन पेशव्यांनीं वश केलें. ते साताऱ्यास आल्यावेळीं पेशव्यांनीं रामराजाकडून वस्त्रें वगैरे देवूवन त्यांस पूर्णपणें संतोषित केलें; व आपला डाव साधला. साताऱ्याहून नागपुरास आल्यानंतर भोंसल्यांनीं लक्ष्मणराव खंडागळे यांचा मुलूख गिरड, मांडगांव, व पौनार वगैरे होता तो ते लढाईंत पडल्यामुळें आपल्या हस्तगत केला. + इतक्यांत गाविलगड किल्ल्याचें कारस्थान उद्भवलें. तेव्हां तो किल्ला स्वाधीन करून घ्यावा म्हणून त्यांनीं

+ नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ ५०

प्रयत्न चालविला. परंतु यावेळीं सेनासाहेब सुभ्यांची प्रकृति फारच बिघडली होती ! त्यामुळें त्यांनीं मुधोजीस तो किल्ला घेण्यासाठीं रवाना केलें. गाविलगड किल्ला लढाई न होतांच हस्तगत झाला, * पण त्यापूर्वींच रघोजीराजांचा अंत झाला. अशाप्रकारें हा वीर पुरुष जन्मभर लढायांचे व्याप सोसून शेवटीं फाल्गुन शुद्ध तृतीयेस (ता. १४ फेब्रुवारी सन १७५५) पोटदुखीच्या आजारानें निजधामास गेला. त्याच्या तेरा स्त्रियांनीं सहगमन केलें. त्यास एकंदर चार पुत्र होते. जानोजी व साबाजी हे धाकट्या स्त्रीचे, मुधोजी व बिंबाजी हे वडील स्त्रीचे. जानोजी धाकटीचा पण वयानें वडील होता. मुधोजीवर बाबासाहेबांची (रघूजीस बाबासाहेब म्हणत असत) मर्जी कमी होती. त्यांच्या मरण समयीं साबाजी व जानोजी हे जवळ होते. मुधोजी गाविलगड घेण्यास गेला होता. त्यानें तो गड सर केला. त्यास वाटेंतच ही बातमी कळली. तेव्हां त्यानें सुरजी अंजनगांवचे मुक्कामीं येऊन क्रिया केली. रघूजीचा कोन्हेर घराण्याशीं दाट संबंध होता. भास्करपंताचा खून झाला. त्यावेळीं त्याची स्त्री ताराबाई गरोदर होती. तिजला धरावें तों ईश्वर कृपेनें एका पठाणाचे बायकोनें डोली देऊन कोणास न कळत काशीस पाठविलें. तेथें तीस पुत्र झाला, त्याचें नांव काशीराव भास्कर—भास्करपंताची स्त्री ताराबाई इच्या नांवाने वऱ्हाडातील बंदोबस्त सुभा करून दिला होता, आपल्या बंधूच्या मृत्युमुळें कोन्हेरराम यांस अस्वस्थता उत्पन्न झाली होती. म्हणून ते गांवीं गेले होते. ते आपल्या मरण समयीं जवळ असावे असें रघूजीस वाटत होतें

* नागपूरकर भोंसल्यांची बखर पृष्ठ ५०

म्हणून त्यांनीं त्यांस पत्रेंहीं पाठविलीं होतीं. रघूजीनें मरतेवेळीं जानोजीस सेना साहेब सुभापद देऊन बाकीच्या मुलांस राज्यांत कांहीं वाटणी करून दिली होती. पण त्यांच्या पश्चात् भाऊबंदकी माजून राज्याचें बरेंच नुकसान झालें. या पुढील भोंसल्यांच्या गादीवर बसणाऱ्या एकाही पुरुषाच्या अंगीं पहिल्या रघूजीची धमक नव्हती हें निर्विवाद होय!

समाप्त

पुरवणी

रघोजी व बाजीराव यांची स्पर्धा.

(विल्स यांच्या ग्रंथावरून)

* रघूजींची सेनासाहेब सुभा अशी नेमणूक झाल्यावर बाजीराव पेशव्यांशीं त्यांची तेढ उत्पन्न झाली. १७३८ सालीं बाजीरावास निजामाशीं झुंज द्यावी लागली तेव्हां त्यानें रघूजीस मदतीस बोलाविलें. वऱ्हाडावर स्वारी होण्याचा संभव आहे या सबबीवर रघूजीनीं मदतीस जाण्याचें नाकारलें. पेशव्यानें लिहिलें, विनंति केली, धमकी पण दिली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. जेव्हां भोपाळ येथें निजामाशीं निकराची लढाई झाली तेव्हां रघूजीनीं संधि साधून नर्मदेच्या पलीकडे अलाहाबाद पर्यंत स्वारी चालविली व तेथील सुभेदार सुजाखान यास ठार करून पुष्कळ लूट आणिली. या अनाधिकारी कृत्यानें बाजीरावास राग आला व त्यानें निजामास जिंकल्यावर रघोजीस जेरीस आणण्याचें योजिलें वऱ्हाडांत एक टोळी धाडण्यांत आली, परंतु तिचा पराभव झाला. इतक्यांत नादिरशहानें दिल्लीवर चाल केल्याची बातमी येतांच बाजीरावानें हा नाद सोडून दिला. या संबंधीं ·/· ग्रँडफ म्हणतो.

"ब्रम्हणी वर्चस्वाचा मत्सर वाटून रघोजीनें साताराच्या शाहू राजास आपल्या ताब्यांत आणून क्रांति घडवून आणण्याचा

---

* विल्सचा नागपूरचा १८ व्या शतकांतिल इतिहास. ·/· ग्रँडफ १ पान ४७२–७३ पृष्ट १०

विचार केला, किंवा शाहू राजास संतति नसल्यामुळें त्यांचा दत्तक बनून मराठा राज्य संपादण्याचा विचार त्यांचे मनांत आला असावा. अशी योजना अंमलांत आणण्याचे कामीं रघूजीस पुष्कळ संकटांस तोंड द्यावें लागलें, कारण पेशव्यांच्या विरुद्धपक्ष अस्तित्वांत होता तरी पण बाजीरावाचे मित्र व आश्रित हे सदोदित राजासंनिध राहत असत. त्यांचेवर राजाचा विश्वास मात्र नव्हता. तसेंच रघूजी किंवा दमाजी गायकवाड यांचा ब्राह्मणाशिवाय कोणताही व्यवहार चालत नसे. रघूजीनें ठरल्याप्रमाणें बाजीरावास मदत न करितां अलाहाबाद प्रांत लुटल्यामुळें उभयतांत बेबनाव झाला होता. पेशव्यांचें ह्मणणें कीं नर्मदेच्या उत्तरेस खंडणी घेण्याचा अधिकार रघूजीस नाहीं. म्हणून त्यानें १७३८ सालचे अखेर रघूजीस ताब्यावर आणण्याचा निश्चय जाहीर केला. इराणी लोक दिल्लीस आल्यावर तात्पुरती तडजोड झाली; परंतु त्यांचा लढा अखेर तसाच राहिला व स्वहितनाश होईल या धास्तीनें ते उघड लढाई करूं शकले नाहींत. याचा परिणाम असा झाला कीं योजना अस्तित्वांत आल्या व मराठा साम्राज्य वाढीस लागलें पण त्यांची सत्ता चिरस्थायी बनली नाहीं. दुर्दैवानें या गोष्टीबद्दल पुरावा सांपडत नाहीं, पण बाजीराव व रघूजी यांची भेट होऊन ते पुनः मिळाले हें खास."

इ. स. १७४० मध्यें बाजीराव निवर्तल्यावर पेशवेपदासाठीं रघूजींनी दुसरा उमेदवार उभा केला होता; परंतु त्यास यश न येतां त्याचा मुलगा बाळाजी हाच विजयी झाला. रघोजीनें याबद्दल लष्करी विजय मिळविले. लगतच्या देवगड येथील राजगोंड संस्था-

नांत त्यानें हात घातला होता व त्या पलीकडे कटकपर्यंत स्वारी केली होती. अलाहाबादेवर स्वारी झाली तेव्हांच गढामंडल्याचें स्वामित्व त्याजकडे आलें. कर्नाटकावर एक मोठी मोहीम चालविली व दिवाण भास्करपंत यानें छत्तीसगडचें राज्य घेतलें व बहार प्रांतावर स्वारी केली. सातारच्या नामधारी राजापासून बाळाजीनें नर्मदेच्या उत्तरेस कर वसूल करणें व खंडणी बसविण्याचा हक्क संपादिला होता. रघोजी कर्नाटकांत व भास्करपंत बहार प्रांतांत असल्याची संधि साधून बाळाजीनें गढामंडलाचें राज्य बळकाविलें. हा प्रांत भोंसल्यांचे राज्याचे मध्यभागीं असल्यामुळें रघोजींनी दीर्घ परिश्रम घेऊन त्यावर पुनः अंमल बसविला.

पेशव्यानें रघूजीच्या पूर्वेकडील मोहिमेस अडथळा आणला बंगाल, बहार व ओरिसा येथील नबाब अल्लीवर्दीखान यानें भास्कररावाचा पराजय केला. इतक्यांत रघूजी कर्नाटकाहून परतला व भास्कररावाचा सूड घेण्याचा इरादा केला. माळव्याची सुभेदारी देण्याचें कबूल करून बादशहानें बाळाजीस आपल्याकडे ओढलें. बाळाजीनें मुर्शिदाबादेस कुच केलें व बंगाल्यांत रघोजी आल्यावर त्यास पराभूत करून वऱ्हाडप्रांताकडे परतविलें. रघूजी झपाट्यानें परतल्यामुळें बाळाजीच्या मनांत दहशत बसली. आपण दूर असल्यामुळें रघोजी गायकवाडाशीं संगनमत करील अशी त्याला भीति वाटली. यांचेशीं लढायचें किंवा बंगालप्रांत रघूजीचे स्वाधीन केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. सन १७४४ मध्यें बाळाजी व रघोजी यांच्यामध्यें गुप्त तह झाला. रघोजीकडे बंगालप्रांत राहावा व एकमेकांनीं

एकमेकांच्या कारभारांत ढवळाढवळ करूं नये असें ठरलें. वऱ्हाड-पासून कटकपर्यंत व लखनौ, पाटणा, दक्षिण बंगाल व बहार या प्रांतापासून खंडणी वसूल करण्याचा अधिकार रघूजीकडे देण्यांत आला. व पेशव्याच्या राज्याची दक्षिण व पूर्व सीमा नर्मदा, सोन व गंगा नदींनें मर्यादित करण्यांत आल्या. +

रघूजीच्या राज्याची वाढ

१७४५ मध्यें देवगडच्या गादीवरील वारसासंबंधीं तंटा उपस्थित झाल्यामुळें बंगाल्यांतून रघोजीस परत यावें लागलें. चांद्याच्या राजाचा यांत संबंध होता. रघोजींनीं हात घालून देवगड व चांदा हीं दोन्हीं राज्यें ताब्यांत घेतलीं. याचवेळीं रतनपुरचा राजा पदच्युत करण्यांत आला. व त्यानंतर आठ दहा वर्षांत सबंध छत्तिसगढ, संबलपूर हीं राज्यें हस्तगत झालीं व तेथील राजे मांडलिक झाले. सन १७४९ मध्यें शाहू राजा मरण पावल्यावर रघोजीस सातारा येथें ब्राम्हणपक्षाविरूद्ध क्षत्रिय पुढारी या नात्यानें बोलाविण्यांत आलें. रघोजी तेथें गेल्यानें इष्ट परिणाम झाला. त्यांची स्वतःची आकांक्षा वय जास्त झाल्यानें व अनुभवानें प्राप्त झालेल्या उपदेशामुळें मर्यादित झाली. जरी रघोजीचा मुलगा मुधोजी यास शाहू महाराजांस दत्तक देण्याची खटपट जोरांत चालू होती व मध्यंतरी दुसऱ्या शिवाजीचा मुलगा रामराजा हा थोरले शिवाजी महाराजांचा प्रत्यक्ष वारस असल्याचा शोध लागल्यानें ती फलद्रुप झाली नाहीं तरी बाळाजीनें रघोजीराजांस आपलेंसें करून

+ ग्रँटडफ भाग १ ला पृष्ठ ५०१–२०

घेतलें. रघोजीनीं रामराजाचा नामधारी गादीवरील वारसा मान्य करून त्यास पुण्यास रवाना केलें व या कामगिरीबद्दल वऱ्हाड, गोंडवन व बंगाल या प्रांताच्या नवीन सनदा मिळविल्या.

नंतर रघोजीनें मुलुख संपादन करण्याकडे आपला मोर्चा वळविला. ही कामगिरी केल्यावर त्यांच्या दीर्घ व कर्तबगारी आयुष्याची इतिश्री झाली. या वेळेस देशबांधवांत त्यांचा फार मोठा लौकिक वाढला होता. त्यांचे पुत्र जानोजी यांस बंगालवर स्वारी करण्यासाठीं कटकमध्यें पाठविण्यांत आलें. वर्षभर मराठे या प्रांतीं गेले नव्हते; परंतु आतां ते तेथील संपत्ति हस्तगत करण्याच्या बलवत्तर हेतूनें निघाले. १७५१ मध्यें निरुपायास्तव अलीवर्दीखानानें उत्तरेस बालासोर पर्यंतचा ओरीसा प्रांताचा भाग ताब्यांत दिला. बहार व बंगाल या प्रांताच्या चौथाई बद्दल १२ लक्ष रुपये ठरविण्यांत आले. दक्षिणेंत चालू असलेल्या कारस्थानामुळें रघोजीनें इतकी थोडी रक्कम घेण्याचें कबूल केलें. पेशवा व सलाबतजंग लढाईवर जातांच रघोजीनें गाविलगढ, नरनाला व माणिकदुर्ग हे किल्ले व त्या सभोंवतालचा मुलुख काबीज केला. आणि गोदावरी व पैनगंगा यामधील टापूवर खंडणी बसवून मोगलांचीं ठाणीं उठविलीं व त्या ऐवजीं स्वतःचीं बसविलीं. लगेच पैनगंगेच्या अलीकडे त्यांना फौज हटवावी लागली पण असें जरी झालें तरी ही राज्याची वाढ राजकीय व मुत्सद्दीपणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची झाली. गाविलगढ हा राज्याचा मुख्य किल्ला झाला व तो १८२२ पर्यंत यांच्याच वंशजांच्या ताब्यांत होता. फक्त १७७५ मध्यें निजामाकडे व

१८०३ मध्यें ब्रिटिशांकडे कांहीं काळ हा किल्ला राहिला. अशा प्रकारें राज्याचा कळस झाला असतां रघोजी १७५५ मध्यें दिवंगत जाहले.

या स्थळीं थोरले रघोजी यांनीं जो दर्जा मिळविला होता त्याचें परीक्षण करणें सोईस्कर होईल. हा दर्जा स्पष्टपणें समजण्यासाठीं वऱ्हाडांतील व त्याच्या पूर्वेकडील टापूतील दर्जांमधील फरक लक्षांत घेतला पाहिजे. भोंसले घराण्यानें वऱ्हाडांत राज्यत्वाचा हक्क केव्हांहि सांगितला नाहीं. आपल्या सैन्याचे खर्चासाठीं मोठमोठाल्या रकमा जमा करणें व मराठ्यांचे कर वसूल करण्याचे अधिकारानिशीं लष्करी अधिकारी या नात्यानें राहणें. हा अधिकार अंमलांत आणीत असतांना ते नांवाला पेशव्यांच्या नियंत्रणाखालीं होते व करांत असलेला निजामाचा हिस्सा ते नेहमीं नांवाला कबूल करीत असत. ह्या सुभ्यांना **दो अमली** म्हणत असत. महसुलाबाबतच्या कागदपत्रांत जमा केलेल्या कराची वांटणी केली आहे, त्यांत मराठ्यांच्या हिशाम शेंकडा ६० टक्के रक्कम आलेली आहे. भोंसल्यांनीं या प्रांतांत चोहोंकडे आपले अधिकारी व सैन्य ठेविलें होतें. ते अर्ध्यापेक्षां जास्त कर वसूल करीत व कर वसूलीच्या हक्काबावत ते आपसांत भांडत असत. पेशव्याकडे दिलेल्या कांहीं परगण्याखेरीज हा संबंध प्रांत निजामाच्या सत्तेखालीं नांदत होता व ही सत्ता मराठे कबूल करीत असत.

वऱ्हाडच्या पूर्वेकडील प्रांतांत रघोजीनें **राजाचा किताब** धारण केला. हा किताब सातारचे राजे व पर्यायानें पेशव्यांस

नांवालाच ! मात्र दुय्यम प्रकारचा होता. वास्तविक रघोजी स्वतंत्र व वेगळा सत्ताधीश होता. ऐतिहासिक सत्य असें आहे कीं देवगढ, चांदा, छत्तिसगढ व संबलपूर व निजामकडील वऱ्हाडप्रांत हे सर्व जुन्या मोंगल समाजाचे घटक होत व बुद्धिवादानें विचार केला तर दुसऱ्या प्रांताइतकेंच वऱ्हाडांतही स्वतंत्र राजाची पदवी लावणें दुष्कर व्हावयास पाहिजे होतें; परंतु औरंगजेब बादशहा वारल्यावर हीं दूरचीं राज्यें स्वतंत्र झालीं व निजाम खेरीज करून या सर्वांनीं बादशाहाचें नांवापुरतें स्वामित्वही झुगारून दिलें. तसेंच ह्या प्रांतांचे राजे भोंसल्यांशीं तोंड देण्यालायक व निजामासारखे बलवत्तर नसल्यामुळें १७४४ मध्यें बाळाजीनें पूर्वीं मान्य केलेल्या चौथाई बसविण्याचे हक्क किंवा स्वतंत्र स्वामित्वाचे हक्क त्या प्रांतांवर प्रस्थापित करण्यांत आले. या बाबतींत सर आल्फ्रेड लायल म्हणतात. "औरंगजेबाचे निधनानंतर वर्धा नदीपलीकडील प्रांतानें बंड केलें असावें. देवगडचा संस्थानिक स्वतंत्र झाला व चांद्याच्या मुल्याकडे नदीच्या पश्चिमेकडील वणी तालुक्याचा ताबा गेला. या दोघांचा रघोजीनें पराभव करून त्यांचीं राज्यें हिसकावून घेतलीं व तीं जिंकलेला प्रदेश या नात्यानें चालविलीं. वऱ्हाडचा भाग म्हणून या प्रदेशाचा कारभार हांकला नाहीं, कारण वऱ्हाडांत फक्त कराचा हिस्सा मिळत असे." तात्पर्य रघुजी व पेशवा यांना देवगड व चांद्याचीं राज्यें मराठा राज्यास जोडण्यास योग्य अशीं वाटलीं. व रघोजीच्या ताब्यांत आणखी पूर्वेकडील जो भाग आला त्यावरही स्वतंत्र स्वामित्वाचा हक्क सांगण्यांत आला. छत्तीसगढांत रायपूर व रतनपूरचे राजे सपशेल नमले. संबलपूरच्या नायकास खंडणी देण्यास

लाविलें. बराच काळपर्यंत ह्या राज्यावर पूर्ण नियंत्रण झालें नाहीं, कारण तो प्रदेश अवघड आकाराचा होता. ओरीसामध्यें रघोजीच्या किताबास बंगालच्या नबाबानें केलेल्या तहावरून मान्यता मिळाली होती.

पहिले रघोजी यांनीं आपल्या मरणापूर्वी मराठा साम्राज्यास नांवापुरतें अंकित असलेल्या राज्याचा पाया घातला होता. या राज्याचा विस्तार खालीं लिहिल्याप्रमाणें होता-

१ देवगड व चांदा येथील पूर्वीची राजगोंडांचीं राज्यें व त्यांच्या ताब्यांतील छोटीं संस्थानें

२ छत्तीसगढ (रतनपूर व रायपूर) चीं जुनीं रजपूत राज्यें व त्यांचे अंकित असलेले प्रदेश.

३ संबलपूरचे रजपूत संस्थान व त्यांचे ताब्यांतील प्रदेश.

४ ओरीसा हा मोंगल प्रांत व त्यांचे हाताखालील प्रदेश.

एवढ्या अफाट प्रदेशावर त्यानें कर वसूल करण्याचा स्वतंत्र हक्क प्रस्थापिला. बंगाल व बहार या प्रांतांकडून चौथाईच्या रुपानें १२ लाख रुपये दरसालची मागणी केली. वऱ्हाडांत गाविलगढ नरनाळा व माणिकदुर्ग हे तीन किल्ले व त्यांचे हुकमतीत असलेला प्रदेश आपल्याकडे ठेऊन या शिवाय वऱ्हाडांतील कराचा वसूल निजामाबरोबर दोअमली पद्धतीस अनुसरून वांटणी करून घेतला.

नागपूरच्या भोसल्यांना इंग्रज लेखकांनीं 'वऱ्हाडचे राजे' या नांवानें वारंवार उल्लेखिल्यामुळें आधींच अस्पष्ट असलेली परिस्थिति जास्त दुर्बोध झाली आहे. कारण कीं ज्या प्रांतांत

स्वतंत्र कर वसूलीचा हक्क व स्वतंत्र ताबा नव्हता अशा प्रांतावर राज्यत्वाचा हक्क त्या लेखानें प्राप्त करून दिल्यासारखें होतें. क्लाईव्हच्या कारकीर्दीत ही चूक इतकी उघड दिसत नाहीं. त्याचे खासगी सेक्रेटरी मि. मॉट यानें १७६६ मध्यें जी माहिती लिहून ठेविली आहे तींत जानोजीस नागपूरचा राजा असें ह्मटलें आहे. हेस्टिंग्जनें साबाजी किंवा मुधोजी यांस वऱ्हाडचा राजा या शिवाय दुसरें नांव दिलेलें नाहीं, व वऱ्हाडप्रांत बंगालप्रांताच्या दक्षिण व पश्चिमेकडील सीमेस लागून आहे असें त्यानें १७७४ मध्यें आपल्या टिपणांत लिहून ठेविलें आहे. हेस्टिंग्जचे वेळचा प्रसिद्ध भूगोलकार रेलवेनेंहीं ही चूक कायम ठेविली आहे. १७८५ मध्यें त्यानें असें प्रतिपादिलें आहे कीं " सम्राज्याच्या विभागांत ओरीसा व खानदेश या दरम्यान असलेल्या प्रदेशास निःसंशय वऱ्हाड प्रांत असें ह्मणतात. परंतु नागपूरच्या मराठ्यांच्या ताब्यांत शंभर वर्षेंपर्यंत जीं कित्येक विषम प्रकारचीं स्वतंत्र व मांडलीक राज्यें अर्धमध्यवर्ती नियन्मणाखालीं आलीं होतीं त्यांना एक असें कोणतेंही नांव नव्हतें. या बाबतींत सर आल्फ्रेड लायल यानें फार मागें असें लिहिलें आहे कीं " वऱ्हाडचा राजा हें नांव युरोपियनांनीं चुकीनें दिलें आहे. मराठा जेत्यांनीं राज्यत्वदर्शक नामाभिधान कधींच धारण केलें नाहीं. भोंसले सरदारांचा सर्वांत मोठा हुद्दा 'सेनासाहेब' हा सरकारी होता........ ...." त्यानें वऱ्हाडचा राजा ही पदवी केव्हांच लाविली नसावी."